# काँग्रेससह विरोधी पक्षाची लाचारी की मजबुरी ?

रविवार
आधुनिक केसरी
विश्वव्यापी मराठी दैनिक
रविवार, ६ ऑगस्ट २०२३

आधुनिक केसरी

**संसदेच्या अधिवेशनात दोन आठवडे काँग्रेस व इतर विरोधी पक्षाच्या गोंधळवीर सदस्यांमुळे बारा दिवस काम झालेले नाही. जनतेचे १२० कोटी रूपये वाया गेले! पण अचानकपणे गुरवारी दि. ३ रोजी लोकसभा शांत झाली. असा काय! मोदी सरकारने चमत्कार केला! कारण त्या दिवशी लोकसभेत राष्ट्रीय दिल्ली क्षेत्र दिल्ली दुरुस्ती विधेयक आणले लोकसभेच्या जी ९ विधयके संमत झाली. ते विरोधी पक्षांना देशाच्या, जनतेच्या हिताचे वाटलेले नाहीत! दिल्ली सरकारबाबत विधेयकावर चर्चा करण्यास मात्र तो उतावीळ दिसला. विरोधी पक्षाने २०२४ मध्ये मोदींना सत्तेतून घालविण्याचा चंग बांधलेला आहे! यात दिल्लीच्या जनतेच्याहितासाठी नव्हे, केवळ अनागोंदी कारभार करणारे केजरीवाल यांना वाचविण्यासाठी काँग्रेससह विरोधी पक्ष पुढे आला! हे देशाने पाहिले आहे. ही सत्तेसाठी लाचारी का मजबूरी ?**



राजकारणातील आघाडीबाबत विचारवंत विल्यम लेकर, लॉरेन्स सी. डॉड, ब्रॅडली रिचर्डसन यांनी लिहिलेल्या पुस्तकात म्हंटलेले आहे की, 'राजकारणात आघाडीचे करण्यामागे सत्ता घेणे, हाच मुख्य हेतू असतो. सत्तेसाठी पक्षाच्या मूलभूत तत्वे, संकल्पना गुंडाळून ठेववाव्या लागतात.. तसेच सत्तेची फळे चाखण्यासाठी सोयीनुसार धोरणात बदल करतात. सत्ता ही नशा असते. त्यासाठी इतर पक्षाशी आघाडी करुन सत्तेची नशा पूर्ण करतात. भारतात पुन्हा आघाडी सरकार आणण्याचा प्रयोग सुरु झाला आहे. यातून केंद्रात सरकार अस्थीर आणण्याचा हे एक कारस्थान आहे.यामुळे देशाला मध्यावधी निवडणुकीला सामोरे जावे लागले. केंद्रात सरकार स्थीर नसेल विकास कामांना खीळ बसते. आघाडीच्या नेत्यांना मर्जीप्रमाणे निर्णय घ्यावे लगतात! मग यातून मोठ्या प्रमाणात भ्रष्टाचार होतो. केंद्रात २००४ ते २०१४ मध्ये काँग्रेस आघाडीचे सरकार होते. हे आघाडी सरकार भ्रष्टाचारामुळे गेले. त्यानंतर २०१४ आणि २०१९ मध्ये केंद्रात भाजपाचे बहुमताचे सरकार आले. २०२४ सत्तेसाठी आघाडीच्या बाटलीतील फार्मूलाला तोच आहे.केवळ आय.एन. डी. आय. ए. असे दिले आहे.या इंडिया नावावरुन न्यायालयाने विरोधी पक्ष सर्वच नेत्यांना नोटीस दिली आहे. राजकारणात वैचारिक विरोध असावा,पण व्देष नसावा! पण गांधी परिवार व विरोधी पक्षाच्या नेत्याच्या मनात मोदी व्देष ठासून भरलेला आहे. आधुनिक गांधी यांनी शिक्षेत दिलासा दिला. यामुळे राजपूत्राचा पुनर्रजन्म झाला, पक्षात जीवदान आला असे म्हणत काँग्रेस उत्साहाचे ढोल बडवत आहेत.




कमलाकर जोशी
ज्येष्ठ पत्रकार, नांदेड
संपर्क क्र. 9422170850

राष्ट्रीय पक्षाच्या नेता बोलला ते शोभणारे नाही, अशी म्हटले. म्हणजेच गांधी बेताल बोलले हे खरे आहे! त्यावर काँग्रस पुरस्कृत पत्रकार लेखणी झिजवणार नाहीत! गांधीना दिलासा पहिल्या पानावर व मोदींचे भाषणाची बातमी आतील पानात. ही सुपारी पत्रकार म्हणतात! आघाडीतील प्रत्येक नेता भ्रष्टाचारात गुंतलेला आहे. त्यामुळे ते लोकशाही, घटना, बेकारी, महागाई या प्रश्नाची ढाल घेऊन लढणार आहेत! मग ५५ वर्षात लोकशाहीला गळा कोणी घोटला! तेंव्हा महागाई किती होती. बेकारी कमी करता का आलेली नाही. त्यांचे प्रश्न जनतेला मूर्ख बनविणारे आहेत! या नेत्यांना देशाची, लोकशाही, प्रश्नांची चिंता नाही. त्यांना सत्ता, पैसा, पक्ष जीवंत ठेवायाचा आहे. संसदेत विरोधी पक्षाने मणिपूर घटनेवर चर्चा करण्याची मागणी केली तो केवळ बहाणा आहे. यामागे भाजपा सरकारची बदनामी करणे, पंतप्रधान मोदी यांचा अवमान करणे हाच डाव आहे. विरोधी पक्षांनी लोकसभेत गोंधळ चालू असताना न विधयके संमत झाली. पण राष्ट्रीय राजधानी दिल्ली क्षेत्र दुरुस्ती विधेयक सभागृहात येताच चर्चा करण्यास तयार झाले ? यात राजकीय रहस्य दडलेले आहे. या आघाडीत परिवार नेत्यांना २०२४ पर्यंत एकमेकांचे हीत सांभाळावयाचे आहे.यातून दिल्लीचे केजरीवाल यांच्या भ्रष्ट कारभाराला संरक्षण देण्याची हमी राष्ट्रीय काँग्रेस पक्षाने घेतली दिसते आहे!

दिल्ली राज्याचा प्रश्न १९५२ पासून चर्चेत आहे. तर जनसंघ, भाजपा दिल्लीला स्वंतत्र राज्याची मागणी करत होता. आता २०१४ देशात काँग्रेसची सत्ता गेली व आता सत्तेसाठी भूमिका राजकीय पक्षाच्या भूमिका बदलल्या आहेत. देशाला स्वातंत्र्य मिळण्यापूर्वीच जुलै १९४७ मध्ये दिल्लीला स्वायत्तता देण्याचा प्रश्न निर्माण झाला होता. तेंव्हा पट्टभी सितारमैया यांची समिति नियुक्ती केली होती. देशाची राजधानी दिल्ली असल्याने आस्ट्रेलिया, कॅनडा,अमेरिका या राष्ट्राच्याधर्तीवर अथवा मिळती -जुळती प्रशासकीय व्यवस्था (गव्हर्नर) असावी,असे सूचित केले. त्यानुसार दिल्लीला मंत्रिमंडळ समूह असेल पण तो राज्यपालांची सहाय्यता व सल्ला घेवून काम करेल, जर त्यांच्यात मतभेद निर्माण झाले तर राष्ट्रपतीं त्याचे निराकारण करतील,असा समितीचा अहवाल होता.त्यास पंडित जवाहरलाल नेहरू,स.पटेल,व डॉ. आंबेडकर यांनी तर दिल्ली देशाची राजधानी असल्याने स्थानिक सरकार स्थापनेस विरोध केला.१९५२ मध्ये दिल्लीत पहिली वेळेस निवडणूक घेण्यात आली. काँग्रेसचे के. चौधरी ब्रह्मप्रकाश मुख्यमंत्री झाले. पण १९५६ राज्य पुनर्रगठण आयोग स्थापन करण्यात आल्याने दिल्लीची विधानसभा भंग करण्यात आली.या आयोगाने दिल्लीस राज्याचा दर्जा देण्याची शिफारस केली.तेंव्हा काँग्रेस संसद सूचिता कृपालानी यांनी विरोध केला होता.तर जनसंघाची आयोगाची शिफारशीला समंती दिली होती.काँग्रेस सरकारने याकडे दिल्ली प्रश्नाचडे गांर्भियांने पाहिलेले नाही.१९५७ मध्ये दिल्ली संस्था कायदा संमत केला.नंतर १९६६ महानगर परिषदअस्तित्वात आणली.१९७७ जनता पक्ष सरकार सत्तेत आले. दिल्लीच्या पाचव्या महानगर परिषदेत काँग्रेसने दिल्लीला संपूर्ण राज्याचा दर्जा देण्याचा प्रस्ताव मांडला होता. जनसंघ १९८० ते पासून दिल्लीला राज्याचा दर्जा मिळावा,यासाठी आंदोलन करत होता.या १९८७ मध्ये भाजपाचे हिरो मदनलाल खुराना होते. तसच वी.के. मल्होत्रा साहिबसिंग यांनी याच मागणीसाठी पुढाकार घेतलला होता. खुरानांना दिल्लीका 'शेर' म्हंटले जायचे! काँग्रेस सरकारने १९८७ मध्ये आर.एस सरकारिया समितीची ( बालकष्ण) स्थापना केली.समितीने दिल्लीला राज्य सरकार असावे, पण केंद्राचे नियंत्रण असावे, अशी शिफारस केली. त्यानुसार १९९१ मध्ये ६९ वी घटना दुरुस्तीव्दारे गेली.जीएनसीटीडी कायदा १९९१ समंत नियम करण्यात आले. त्यानुसार १९५२ मध्ये निवडणुकीव्दारे सरकार स्थापनेचा अधिकार मिळाला. १९९३ मध्ये भाजपाचे सरकार आले व दिल्लीला राज्याचा दर्जा मिळावा,यासाठी आग्रही होते.आज आम आदमी पक्ष तोच करत आहे. २००३ मध्ये लालकृष्ण अडवाणी यांनी दिल्ली राज्याचा प्रस्ताव आणला होता.त्यात २३९ ए.ए.आणि २३७ ए.बी.आय. कलम रद्दबातल करण्याचा प्रस्ताव होता.तो प्रस्ताव स्थायी समितीकडे पाठविला गेला.त्यावेळी भाजपाचा निवडणुकीत पराभव झाल्याने हा प्रस्ताव बाजूला पडला.२००४ ते २०१४ पर्यत काँग्रेसचे सरकार होते. तेंव्हा केंद्राने याकडे लक्ष दिले नाही.देशात नऊ केंद्रशासित राज्य आहेत. त्यात दिल्ली आहे.या राज्यावर केंद्राचे नियंत्रण असते,हे काँग्रेस पक्षाला माहित आहे.दिल्लीत १७ मार्च. १९५२ पासून चौधरी ब्रहम प्रकाश, गुरमुख निहाल, हे काँग्रेसचे १९९३ मध्ये मदललाल खुराना, साहिबसिंह वर्मा,सुषमा स्वराज्य, भाजपाचे तर १९९८ मध्ये काँग्रसच्या शीला दिक्षीत होत्या. आम आदमी पक्षाचा जन्म देशातील राजकारणात परिवर्तन व भ्रष्टाचार संपविण्याचे व्रतातून झाला. केजरीवाल यांनी तर' आपल्या मुलांची शपथ घेत आपण सरकार स्थापनेसाठी काँग्रेसची मदत घेणार नाही, असे म्हणाले होते, २०१३ च्या निवडणुकीत दिल्लीत आम आदमीचे आमदार अधिक प्रमाणात निवडून आले. पण पक्षाला बहुमत न मिळाल्याने केजरीवालने सरकार स्थापनेसाठी काँग्रेसची मदत घेतली. हे सरकार अल्पकाळच टिकले. पण २०१५ च्या निवडणुकीत आदमी पक्षाला बहुमत मिळाले. केजरीवाल दिल्लीचे मुख्यमंत्री झाले. जो माणूस मित्रांचा धोका देऊ शकतो, तो काँग्रेसचा विश्वासघात करणार नाही याची ग्यारंटी आहे काय ? दिल्लीत आमचे सरकार आले तरी गाडी, बंगला, सुरक्षा आदी सोयी घेतल्या जाणार नाहीत, अशी शपथ घेणारे केजरीवल आज सर्व सुख सुविधा घेत लोळत आहेत! तेंव्हा तर काँग्रेसचे सर्व चोर आहेत,त्यांना थेट जेलमध्ये टाका, असे म्हणत होते. आता त्यांना ते संत व सज्जन दिसत आहेत. देशातील राजकारणात सर्वात मोठा 'लबाड! खोटारडा, विश्वासघातकी नेता' म्हणून इतिहासात नक्कीच नोंद होईल. केजरीवाल दिल्लीत अंधाधूंद कारभार सुरू केला त्यामुळे उपराज्यपाल व त्यांच्यात संघर्ष होत आहे. दिल्ली सरकारकडून पैश्याची उधळपट्टी, भ्रष्टाचाराला प्रोत्साहन देऊ लागले. यातून पक्षाचे दोन मंत्री जेलमध्ये आहेत, त्या नैतिकता राहिलेले नाही.' नाक कापले तरी छिद्र आहे तरी स्वच्छ चारित्र्याचा बुरखा घालून इतर नेत्यांकडे मदतीची भीक मागत फिरले! इतकेच नव्हे ,त्यांनी दिल्लीत गुप्तचर विभाग स्थापन केला म्हणे! भ्रष्टाचारासाठी वरिष्ठ अधिकाऱ्यांवर दवाब, धमक्या देण्यात येत होत्या. यात सर्वोच्च न्यायालयात गेले. यात दिल्ली राज्य सरकारला सेवा व बदलीचे अधिकार दिले. केंद्रातील सरकारला या कायद्यात दुरुस्ती करण्याचा अधिकार आहे. त्यामुळे भाजपा सरकारला १९९१ च्या राष्ट्रीय राजधानी क्षेत्र दिल्ली कायदा नियमात दुरुस्ती करणारा अध्यादेश काढला. त्याबाबत कायदा करण्याचा प्रथम प्रस्ताव लोकसभेत दि.४ ऑगस्ट रोजी आणला गेला. भ्रष्ट परिवारवादी आघाडीत केजरीवाल आहेत. लोकशाही नावाने गळा काढणारे काँग्रेस व इतर पक्ष विधेयकावर चर्चा सहभागी झाले नाहीत. पण काँग्रेस इतर विरोधी पक्ष केजरीवाल वाचविण्यासाठी पुढे आला. त्यासाठी लोकसभेत शांत राहिले व चर्चेत भाग घेतला. ही समाधानाची बाब आहे. पण दिल्ली हे राज्य नाही, ते केंद्रशासित राज्य आहे, पण या कायद्याच्या नियमात दुरुस्ती केल्याने देशातील संघ राज्याच्या व्यवस्थेला धोका आहे, अशी विरोधक पक्ष भीती दाखवत आहे. तसेच वास्तविक विधेयक हे दिल्लीच्या नावाने आहे! त्याचा इतर राज्याचा संबंध येतो कोठे ? हा दुरुस्ती घटनाबाह्य आहे व तो संसदेला अधिकार नाही. मग काँग्रेसने ६९ वी घटना दुरुस्ती कशी काय केली ? देशात दिल्ली राज्याचा दर्जा प्रश्न १९५२ पासून आहे. पण केंद्र व राज्य सरकारात प्रशासनाच्या अधिकारावरुन वाद झाला नाही. मुख्यमंत्री केजरीवाल यांना दिल्लीत पूर्ण अधिकार असलेले राज्य हवे आहे. न्यायालयाचा निकाल येताच गुप्तचर विभागातील भ्रष्टाचाराच्या सफाई पळविण्याचा खटाटोप केला. संबंधित अधिकाऱ्याची बदलीचे काढले गेले. हे काँग्रेस व विरोधी पक्षाला मान्य आहे काय ? असे गृहमंत्री शहा यानी प्रश्न विचारला.तेंव्हा नेते आधीन रंजन गडबडले! आम्ही दिल्ली कायद्यातील दुरूस्तीला विरोध केला, असून अंग काढून घेतले! लोकसभेत हे विधेयक आवाजी मताने संमत झाले. आपली नामुश्की टाळण्यासाठी मत विभागणीपूर्वीच पळ काढला! महाराष्ट्रातील राष्ट्रवादी पक्षाच्या राजकन्या सुप्रिया सुळे ह्या परिवारवादी पक्ष बोलतांना 'मी शरद पवारांची मुलगी आहे, याचा अभिमान आहे. प्रत्येक मुलींला असाच होतो, पण त्यांना राजकारणात सोन्याचा चमचा घेऊन जन्मल्या पक्षात लगेच संधी मिळाली. सामान्य कार्यकर्त्याला पक्षाच्या सतरंज्या उचलाव्या लागतात. राष्ट्रवादी काँग्रसचे शरद पवाराची मनमानी व धृतराष्ट्राची भूमिका घेतल्याने पक्ष फुटला! तेंव्हा आधी पक्षाची काळजी घ्या! त्यात

भाजपा म्हणजे भ्रष्टाचाराची वाशिंग मशीन, तर राष्ट्रवादी काँग्रेसने भ्रष्टाचार लपविण्यासाठी मोठा फ्रिज ठेवला वाटत! सहकार विधेयक आले होते, त्यावर महाराष्ट्राच्या हितासाठी का तोंड उघडले गेले नाही ?त्यात शिवसेना खासदाराच्या वेगळ्या भूमिका दिसून आल्या राज्यसभेत हे दिल्ली विधेयक संमत होईल असे दिसतेय!. त्यानंतर केजरीवाल आघाडीतून बाहेर पडतील, असे शहा म्हणाले. तेंव्हा दिल्लीचे मुख्यमंत्री केजरीवाल मनमानी व भ्रष्ट कारभाराला लगाम घालणे आवश्यक होता. भाजपाने कायद्याच्या नियमात दुरुस्ती करणे गैर नाही, तो योग्यच आहे, असे मला वाटते.





आधुनिक केसरी

मग रामूने आपण बनवलेल्या वेगवेगळ्या वस्तू मुलांना दाखवल्या. मुलं मोठ्या कौतुकानं ते पाहत होती. कारखान्यात बनणाऱ्या वस्तूपेक्षा एखादा कारागीर जेव्हा हाताने वस्तू तयार करतो, तेव्हा त्याला किती मेहनत घ्यावी लागते याची जाणीव मुलांना ते पाहून झाली. राजेश आणि पिंकीच्या मनात खूप सारे प्रश्न होते. श्यामलाताई म्हणाल्या, 'बाळांनो, आता सगळं व्यवस्थित बघून घ्या. मग जाताना मी तुम्हाला आणखी छान छान माहिती देणार !' आपल्या छोट्याशा बागेत काम करण्यासाठी मग श्यामरावांनी त्याच्याकडून एक कुदळ, एक फावडे आणि एक विळा विकत घेतला. रामूलाही खूप छान वाटले. 'मुलांनो, झालं का तुमचं समाधान ? आता आपण दुसरीकडे जाऊ.' सोपानकाका म्हणाले. मग सगळेच सोपानकाकाबरोबर पुढे निघाले. राजेश आणि पिंकीला आता सोपानकाका आणखी काय दाखवतात याची उत्सुकता होती. सोपानराव मुलांना आपल्या गावात फेरफटका मारून आणत होते. श्यामराव आणि श्यामलाताई सोबत होत्याच. रामू लोहाराचे काम पाहून ते खाली उतरत असताना श्यामराव गमतीने पिंकी आणि राजेशला म्हणाले, 'हे लोहाराचे काम पाहताना मला लहानपणी शिकलेल्या दोन म्हणी आठवल्या बरं का ?' 'श्यामराव, आम्हाला पण जरा कळू द्या की तुम्हाला काय आठवलं ते ? हसत हसत सोपानराव म्हणाले. 'अरे श्याम, आपल्या वर्गाला त्या भागवत बाई मराठी शिकवायच्या, त्या आठवतात का ?' 'व्हय की. चांगल्या लक्षात हायेत त्या. मला शुद्धलेखन चुकले म्हणून त्यांनी दररोज दहा ओळी शुद्धलेखन लिहून आणायला सांगितलं होतं. आणि नाही लिहून आणलं तर त्या शिक्षा करायच्या.' 'पण सोपान अजूनही भागवत बाई भेटल्या तर तुला शुद्धलेखनावरून शिक्षा करतील बरं !' श्यामरावांनी असं म्हणताच हास्याचा स्फोट झाला. सगळेच त्यात सामील झाले. 'हां, तर मला आठवल्या त्या म्हणी त्यांनी सांगितलेल्या. भागवत बाई म्हणायच्या, 'संस्कार आणि परिस्थिती माणसाला घडवते. मुशीत जसे सोने उजळून निघते, तसाच परिस्थितीमुळे माणूस. रामू लोहाराच्या भट्टीत लोखंड जसं तावून सुलाखून निघालं.' श्यामराव म्हणाले. अरे वा, एकदम बरोबर.' सोपानराव म्हणाले. आणि दुसरी म्हण कोणती आठवली बाबा तुला ?' 'अरे सोपान, आपण कधी सोनाराकडे गेलो तर तो आपल्या छोट्याशा हातोडीचे फटके दागिने घडवताना मारताना आपल्याला दिसतो. पण आता पाहिले ना रामू लोहाराकडे.



समृद्ध प्राचीन वारसा



# आनंदी पहाट

## भावनांना फुलांचे गंध असतात

आधुनिक केसरी



विद्यावाचस्पती विद्यानंद
संपर्क क्र. 7709612655

भावनांच्या रंगांची उधळण सर्वात जास्त जर कोण करत असेल, तर ते म्हणजे माणसाचं मन. माणूस कधी कधी पूर्ण भरलेला असतो तर कधी पूर्ण रिता असतो. दोन्ही स्थितीत चंचलता असते. आणि या दोन्हींच्या मध्ये असते ते म्हणजे मानसिक स्थैर्य. ज्या व्यक्तीला सतत शुभ, सकारात्मक आणि आशावादी विचार करण्याची सवय असते; त्याचे मन नेहमी आनंदाने आणि उत्साहाने भरलेलं राहतं. अशा उत्साही मनाच्या व्यक्तीला नेहमीच यशप्राप्ती होत असते. कारण गुंतवणूक भावनांची आणि आनंद कोट्यवधींचा असतो. सकारात्मक, आशावादी आणि आनंदी विचार हीच यशस्वी होण्याची गुरुकिल्ली असते. जगातील सर्वांत अवघड गोष्ट म्हणजे विचार बदलणं. इतर गोष्टी केव्हाही बदलता येतात. आज आवडलेली गोष्ट उद्या फेकून देता येते. पण नवा विचार स्वीकारणे ही खूप मोठी गोष्ट आहे. आजचा दिवस नवा विचार स्वीकारण्यासाठी शुभ आहे. नव्या विचारांची नवीन पालवी फुटायला सुरुवात आजपासून व्हावी, अशाप्रकारच्या सकारात्मक विचारांनी दिवसाची सुरुवात करून पहावी. सकारात्मक विचारांमुळे आपल्याच मनाला प्रसन्न वाटायला सुरुवात होते. जोपर्यंत मनाला आशेचे पंख असतात, हृदयात ध्येयाचे वादळ असतं, अंतःकारणांत जिद्द असते, भावनांना फुलांचे गंध असतात आणि डोळ्यासमोर खुले आकाश असते, तेव्हा प्रत्येक क्षण विलक्षण ठरू शकतो. मनाला मनःपूर्वक मानलं, समजून घेतलं, मोकळं केलं, आनंदी ठेवलं, तंदुरुस्त ठेवलं, सकारात्मक विचारांमध्ये गुंतवलं आणि नकारात्मक विचारांपासून स्वतःला दूर ठेवलं कि फक्त यशच प्राप्त होत राहतं. संपूर्ण जग सुंदर आहे, फक्त तसं पाहायला हवं; प्रत्येक नातं जवळचं आहे, फक्त ते उमजायला हवं; प्रत्येक गोष्टीला अर्थ आहे, फक्त तसं समजायला हवं, प्रत्येक वेळेत समाधान आणि आनंद आहे फक्त तसं जगायला हवं.

# अपेक्षा....

आधुनिक केसरी

संस्कारधन



सौ.मंगला चौरे
संपर्क क्र. 9422711515

भाग.१०

किती छान शब्द आहे. खूप मोठेपणाने वापरतात सर्वजण. आम्हाला कशाचीही अपेक्षा नाही. तुम्ही जे द्याल ते आम्ही आनंदाने घेऊ. पण घेऊच.. असंच ना!!! अहो स्पष्ट सांगा ना काहीच नको ,देऊच नका ,करूच नका. आम्हाला सांगा आम्ही काही मदत करू शकतो का ?? असे संवाद नेहमीच आपल्या कानावर पडतात . दुसऱ्यापेक्षा आपल्याकडे काहीतरी कमी आहे आणि ते आपल्या जवळ असावं असं जेव्हा या छोट्याशा गरीब मनाला वाटतं तेव्हा अपेक्षा वाढत जाते . एखाद्याकडे भेटायला जाणे आणि त्यांनी आपल्याला चहा किंवा जेवण करावे ही अपेक्षा ठेवणे हे सारासार चूक आहे .ती अपेक्षा पूर्ण नाही झाली तर मनाला वेदना होतात. किंवा त्या व्यक्तीविषयी आपल्या मनात काहीतरी गैरसमज होतो. हे सगळं कशाने होते ?? तर अपेक्षा ठेवल्याने. पेक्षा बरे.... पण अपेक्षा नको. मुलांचे शिक्षण, नोकरी ,लग्न झालं पण आता एकच अपेक्षा .नातवंडाचं तोंड बघायचं . इतकं सगळं झालं ना चांगलं .. पण तरीही अपेक्षा आहेत. काहीच नाही झालं, त्यापेक्षा काहीतरी झालंय ना ?? अशी ही अपेक्षा फार लालची असते. ती सतत वाढत जाते .पण कमी होत नाही. अपेक्षांचं ओझं मनावर सतत बाळगले तर दडपण येतं .जे सुख मिळतं ते हिरावून घेतल्या जातं. वय वर्ष 50 झालं की बऱ्याच अपेक्षा स्वतःहून कमी कराव्यात. कारण आपला गृहस्थाश्रम संपलेला असतो. त्यामुळे पूर्ण अपेक्षा कमी नाही झाल्या तरी किमान 70 टक्के अपेक्षा कमी करत जीवनाची वाटचाल करूया. कारण अपेक्षा नसेल तर आनंद मिळतो .निरपेक्ष वृत्ती ठेवली तर मनाला समाधान नक्कीच मिळेल. अपेक्षा जरूर ठेवावी पण मला आज हे काम करायचं आहे ते काम मी पूर्ण करीलच. मला एखाद्या अनाथ आश्रमाला भेट द्यायची आहे. त्या मुलांसाठी मला काहीतरी खाऊ घेऊन जायचे आहे. अशा अपेक्षा ठेवाव्यात. त्यामुळे मनाला आनंद मिळतो समाधानही मिळते. जीवन जगण्याची नवी दिशा सापडते . बघा हे असं करून. मुलीचं नाव अपेक्षा ठेवताना देखील विचार करावा असं वाटतं .कारण तिच्याभोवती अपेक्षांच वलय निर्माण व्हायला नको. एक तर तिच्या अपेक्षा किंवा दुसऱ्यांच्या अपेक्षा. वराकडील मंडळी सुद्धा वधूपित्या कडे काहीतरी अपेक्षा बाळगून असतात. चांगल्या सहज मिळणाऱ्या अपेक्षा जरूर कराव्यात. अनावश्यक अपेक्षा समुद्रात टाकून देऊया....

# निरुपण


आधुनिक केसरी



डॉ. चन्द्रहासशास्त्री सोनपेठकर

देवि जानासि सर्वं त्वं प्रोक्तव्यं किं मयाम्बिके | दारिद्र्यदुःखनाशाय दुर्गां देवीं नमाम्यहम् || ५९ || हे देवी, हे अंबिके, तू सर्वच जाणतेस, मी काय सांगावे ? दारिद्र्यदुःख नष्ट करण्यासाठी मी तुला दुर्गा देवीला नमन करतो.

# घराघरात स्वर्वेद, मनामनांत स्वर्वेद, जनमनांत स्वर्वेद !



स्वर्वेद रचनाकार अनन्त श्री सद्गुरू सदाफल देवजी महाराज

पूर्ण ज्ञान के उदय में, कर्म भक्ति सब होय । बिना ज्ञान सब भ्रम है, धोखा जीवन सोय ।।२६।।(स्वर्वेद चतुर्थ मण्डल तृतीय अध्याय) ०४/०३/२६ मूळ भाष्याचा मराठी अनुवाद : पूर्ण ज्ञान झाल्यावरच कर्म वा भक्ती पूर्णरूपेण होत असते. ज्ञानाशिवाय जीवन सर्व भ्रम आणि अंधकारमय आहे.

संदर्भ : हा ग्रंथ तुम्हाला हवा असल्यास वॉट्सअॅप करा ८५५४८८३१६६.

# तुकाराम गाथा

आधुनिक केसरी

अवघें एके ठायीं । करूनि स्वाद त्याचा पाहीं । मजपाशीं आहे तें ही । तुम्हामाजी देतों ॥१॥
म्हणती बरवें गोपाळ । म्हणती बरवें गोपाळ । वाहाती सकळ । मोहरी पांवे आनंदें ।
खडकीं सोडियेल्या मोटा । अवघा केला एकवटा । काला करूनियां वांटा । गडियां देतो हरि ॥ध्रु.॥
एकापुढें एक । घाली हात पसरी मुख । गोळा पांवे तया सुख । अधिक चि वाटे । म्हणती गोड जालें ।
म्हणती गोड जालें । आणिक देई । नाहीं पोट धालें ॥२॥ हात नेतो मुखापासीं । एर आशा तोंड वासी
। खाय आपण तयासी । दावी वांकुलिया । देऊनियां मिठी । पळे लागतील पाठीं । धरूनि काढितील
ओठीं । मुखामाजी खाती ॥३॥ म्हणती ठकडा रे कान्हा । लावी घांसा भरी राणा । दुम करितो शहाणा
। पाठोवाठीं तयाच्या । अवघियांचे खाय । कवळ कृष्णा माझी माय । सुरवर म्हणती हाय हाय । सुखा
अंतरलों ॥४॥ एक एका मारी । ढुंगा पाठी तोंडावरी । गोळा न साहवे हरि । म्हणे पुरे आतां ।
येतो काकुलती । गोळा न साहवे श्रीपती । म्हणे खेळों आतां नीती । सांगों आदरिलें ॥५॥ आनंदाचे फेरी
। माजी घालुनियां हरी । एक घालिती हुंबरी । वाती सिंगें पांवे । वांकडे बोबडे । खुडे मुडे एक लुडे ।
कृष्णा आवडती पुढें । बहु भाविक ते ॥६॥ करी कवतुक । त्यांचें देखोनियां मुख । हरी वाटतसे सुख ।
खदखदां हांसे । एक एकाचें उच्छिष्ट । खातां न मानिती वीट । केलीं लाजतां ही धीट । आपुलिया संगें
॥७॥ नाहीं ज्याची गेली भुक । त्याचें पसरवितो मुख । अवघियां देतो सुख । सारिखें चि हरी म्हणती
भला भला हरी । तुझी संगती रे बरी । आतां चाळविसी तरी । न वजों आणिकां सवें ॥८॥


# देहाचे दहा प्रकार कोणते ?

आधुनिक केसरी



सौ. उज्ज्वला धर्माधिकारी
संपर्क क्र. 7588235646


स्थूलदेह, सुक्ष्मदेह, कारण, महाकारण हे चार पिंडाचे देह तर विराट, हिरण्यगर्भ, अव्यक्रुत, मूळप्रक्रुति हे चारब्रम्हांडाचे मिळून आठ देह होतात. चार देह पिंडाचे व चार देह ब्रम्हांडाचे हे झाले आठ देह, त्यात प्रक्रुति व पुरूष हे दोन मिळवले की झाले दहा देह तयार. (कालच्या लेखात दहा देहांचा विस्तृत विचार केलेला आहे) चार आत्मे जीवात्मा, शिवात्मा, परमात्म यालाच परमात्मा पण म्हणतात. व चौथा निर्मलात्मा असे आत्म्याचे चार प्रकार आहेत. आत्म्याचे लहानमोठा असे भेद नाहीत सगळे आत्म्ये एकच आहेत. आकाशाचे चार प्रकार कोणते. मठाकाश, घटाकाश, महदाकाश, चिदाकाश दिसायला वेगळे नाहीत.व सगळे आकाश वेगळे नाही मठाला व्यापलेले आकाश मठाकाश. चिदाकाश कोणत्याही उपाधी नसणारे मर्यादा नसणे म्हणजे चिदाकाश होय.



# नाम घेणाऱ्याच्या मागेपुढे मी उभा आहे

आधुनिक केसरी

गूढ शोधून काढण्याकडे मनुष्याची नेहमी प्रवृत्ती असते. कोकणामध्ये पाण्याचे झरे आढळतात. ते कुठून येतात हे कळत नाही. म्हणजे, केवळ दृश्यामध्ये असणाऱ्या गोष्टींचेदेखील मूळ आपल्याला उकलत नाही; मग जे अदृश्यच आहे त्याचे मूळ आपल्याला कसे कळणार ? मी बोलतो कसा, माझे मन कुठून येते, हे देहबुद्धीत राहणाऱ्यांना कळणे कठीण आहे. नामामध्ये जे स्वतःला विसरले त्यांनाच मी खरा कळलो. स्वतःच्या प्रपंचाचे कल्याण करून घेण्यासाठी तुम्ही माझ्याकडे येता. पण कोळसा जितका जास्त उगाळावा तितका तो काळाच होत जातो, त्याप्रमाणे प्रपंचामध्ये कसेही केले तरी दुःखच पदरात पडते. आपण समजून उमजून ज्या चुका करतो, त्यांचा दोष आपल्याकडे असतो. न समजता जी चूक होते त्याचा दोष नाही. प्रपंचाच्या आसक्तीने दुःखपरंपरा येते हा अनुभव दररोज येत असून आपण प्रपंचात आसक्ती ठेवतो, हा दोष नव्हे काय ? आपले कुठे चुकते ते पहावे आणि जे चुकते ते सुधारावे. प्रपंचात मनासारख्या गोष्टी कुठे मिळतात ? त्या मिळणे न मिळणे आपल्या हातातच नसते. मग अमुक हवे किंवा नको असे कशाला म्हणावे ? रामाचेच होऊन राहावे म्हणजे झाले ! जो रामाजवळ विषय मागतो, त्याला रामापेक्षा त्या विषयाचेच प्रेम जास्त आहे असे सिद्ध होते. मी तुमच्याकडे येतो, पण मला येण्यासाठी तुम्ही वाट मोकळी ठेवीत नाही. मी येण्यासाठी तुम्ही वाट मोकळी करा; म्हणजे, सतत नामस्मरणात राहा. मी कधीच कुणाबद्दल निराश होत नाही. जो मनुष्य म्हणून जन्माला आला त्याचा उद्धार होणारच. मला रामावाचून दुसरे जिवलग कोणी नाही. देहाच्या भोगांना मी कधी कंटाळलो नाही. तुम्ही भगवंताचे नाम घ्यावे यापलीकडे खरोखर



मला दुसरी कसलीही अपेक्षा नाही. रात्रंदिवस माझ्या माणसांना मी हेच सांगत असतो की, वाटेल ते झाले तरी भगवंताचे नाम सोडू नका. जो माझा म्हणतो, त्याला नामाचे प्रेम असलेच पाहिजे. जीवनामध्ये तुम्ही घाबरू नका, धीर सोडू नका, आणि घ्यायचे झाले तर नामच घ्या. माझा नियम असा आहे की, परमार्थाची एकही गोष्ट अशी असता कामा नये, की जी व्यवहाराच्या आड येईल. माझ्या गावी पैसा पिकत नाही. पण भक्ती मात्र खास पिकते. ज्याच्याजवळ भगवंताचे नाम आहे त्याच्या मागेपुढे मी उभा आहे. मी तुमच्याजवळ आहेच; तो कसा आहे याचा विचार तुम्ही करू नका. तुम्ही नुसते नाम घ्या, बाकीचे सर्व मी करतो. शुद्धीमध्ये नाम घेण्याची जबाबदारी तुमची आहे, मग झोपेत आणि बेशुद्धीत नाम घेण्याची जबाबदारी माझी आहे; ती मी सांभाळीन.

# सदगुरुंचा महिमा

आधुनिक केसरी



विनायक दि.पत्की
संपर्क क्र. ९४२२२४२५१७

खडीसाखर ठेवली म्हणजे मुंगळयांना आमंत्रण करावे लागत नाही ते आपोआप तिचा शोध काढीत येतात. तसे तुम्ही खडीसाखर बना म्हणजे संत तुमच्याकडे धावतच येतील. खडीसाखर बना म्हणजे संतांना आवडेल असे वर्तन करा. संतांना काय आवडते ? भगवंताचे अनुसंधान आणि अखंड नामस्मरण याशिवाय दुसरी कोणतीही गोष्ट त्यांना प्रिय नाही. म्हणून आपल्या हृदयामध्ये नामाची ज्योत अखंड तेवत ठेवा. सदगुरू तुमचा शोध घेत येतील आणि तुमच्यावर कृपेचा वर्षाव करतील.

प्रत्येकजण पोटाला खायला मिळावे म्हणून खटपट करीत असतो. परंतु आपल्या इच्छेप्रमाणे आपल्याला मिळते का ? नाही. म्हणून, सांगायचे कारण असे की, जर आपण विषयांकरिता इतके झटतो, तर देवाच्या प्राप्तीकरता श्रम करायला नकोत का ? आपण आपल्या मुलाला शाळेत घालतो, आणि तो न शिकला किंवा त्याला अभ्यास येत नसला, तर पुन्हा त्याच वर्गात त्याला बळजबरीने ठेवतोच की नाही ? क्रमशः

# निवडक सुभाषिते

आधुनिक केसरी

शोकस्थानसहस्त्राणि भयस्थानशतानि च दिवसे दिवसे मूढमाविशन्ति न पण्डितम् ॥ स्पष्टीकरण - हे जग अनेक बऱ्यावाईट गोष्टींनी भरलेले आहे. त्यामुळे जडबुद्धीचा मनुष्य हजारो गोष्टींची चिंता करीत बसतो. इथे भय आहे, तिथेही भय आहे, या कल्पनेने तो सदैव चिंताच करीत राहतो. त्याला पुरुषार्थासाठी पुढे पाऊल टाकावे, असे वाटतच नाही. शहाणा माणून मात्र असल्या गोष्टींची फिकीर न करता वेळ येईल तेव्हा पाहून घेईन, या धीराने काम करीत राहतो. शेवटी तोच विजयी होतो. शंकेखोर मात्र जिथल्या तिथेच राहतो.

पं. महादेवशास्त्री जोशी, पुणे

रविवार, ६ ऑगस्ट २०२३
⊙ किमत ५ रुपये | छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र)
⊙ मराठी ⊙ दैनिक
⊙ वर्ष - ०३ ⊙ अंक -१२
⊙ आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६

# आधुनिक केसरी

विश्वव्यापी मराठी दैनिक

● MARATHI ● DAINIK ● CHHATRAPATI SAMBHAJINAGAR (MAHARASHTRA) ● SUNDAY 6 AUGUST 2023 | adhunikkesari.com | Adhunik Kesari | ● YEAR-03 ● ISSUE-12 ● RNI : MAHMAR/2021/82566 ● PAGE-16 ● PRICE-5

## आधुनिक केसरी वॉच

# पावसाळी अधिवेशनात' बळीराजा 'चा जय हो..!

### सभागृहात आ. अमित झनक यांची चमक



राज्याचे माजी कॅबिनेट मंत्री लोकनेते स्व. सुभाषरावजी झनक यांनी आपली संपूर्ण कारकीर्द गोरगरीब व शेतकऱ्यांच्या समस्या सोडविण्यासाठी घालविली. त्यामुळे शेतकऱ्यांचे कैवारी म्हणून वाशीम जिल्ह्यात तसेच रिसोड तालुक्यात त्यांचा मोठा लवकिक होता. शेतकऱ्यांच्या विविध समस्या सोडविण्यासाठी सदैव तत्पर असणारे स्व. सुभाषराव झनक यांना जिल्ह्यातील सर्वसामान्य जनतेने ' बळीराजा ' ही सन्मानजनक उपाधी बहाल केली. त्यांच्या अकाली निधनानंतर त्यांचा वारसा पुढे सुरू ठेवण्याची जबाबदारी त्यांचे सुपुत्र रिसोड, मालेगाव मतदारसंघाचे विद्यमान आमदार अमित सुभाषराव झनक यांच्यावर पडली. शेती व शेतकरी यांच्यावर असलेली निष्ठा व गोरगरीब जनतेप्रती असलेला कणवळा ही झनक घराण्याची संस्कृती आणि राजकारणातून समाजकारण करण्याचे वडील स्व. सुभाषराव झनक यांच्याकडून मिळालेले बाळकडू, याच बळावर आज आमदार अमित झनक चमकदार कामगिरी करत आहेत. जनतेने बहाल केलेली ' बळीराजा ' उपाधी समर्थपणे पेलत आहेत. नुकत्याच संपलेल्या पावसाळी अधिवेशनात अभ्यासू आमदार म्हणून, पक्षाने त्यांची तालिका अध्यक्षपदी निवड केली होती. ही सन्मानजनक बाब केवळ रिसोड मालेगाव मतदार संघासाठीच नव्हे; तर वाशिम जिल्ह्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला आहे. परिणामी संपूर्ण जिल्ह्यात आमदार अमित झनक यांचा गौरव होत असून, पावसाळी अधिवेशनात बळीराजाचा जय हो..! झाला असल्याच्या भावना सर्वसामान्य लोक व्यक्त करीत आहेत.

१७ जुलैपासून सुरू झालेल्या राज्य विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाचा काल दि .४ ऑगस्टला समारोप झाला. या १९ दिवसांच्या कालावधीत चार दिवसाच्या सार्वजनिक सुट्ट्या वगळता सतत १५ दिवस अधिवेशनाचे कामकाज चालले. या १५ दिवसात आमदार अमित झनक यांनी आपल्या घराण्याची संस्कृती आणि मतदारांनी टाकलेला विश्वास यांच्याप्रती कर्तव्यनिष्ठा जोपासत, जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या विविध समस्या व इतर सार्वजनिक समस्या बाबतचे अभ्यासपूर्ण मुद्दे उपस्थित करत, वाशिम जिल्ह्याकडे सभागृहाचे लक्ष वेधले. त्यांच्या या लक्षवेधी कामगिरीमुळे जिल्हाभरातून आमदार झनक यांचे तोंडभरून कौतुक होत आहे.



वसंत खडसे
9373578429

अधिवेशनादरम्यान आ. अमित झनक यांनी जिल्ह्याच्या शैक्षणिक विकासात भर पडावी म्हणून, वाशीम येथे नियोजित असलेल्या केंद्रीय विद्यालयाचा महत्त्वपूर्ण मुद्दा उपस्थित करत, केवळ मान्यता मिळाली म्हणून भागत नाही. तर त्यासाठी जागा उपलब्ध करून देण्यात विविध अडचणी येत आहेत. त्यावर सरकारने तातडीने उपाययोजना करावी. तरच लवकरात लवकर केंद्रीय विद्यालयाचा मार्ग मोकळा होऊ शकतो. हे आपल्या मुद्देसूद विचारातून सरकारच्या निदर्शनात आणून दिले. शिवाय मालेगाव तालुक्यातील चिवरा येथील वैद्यकीय महाविद्यालयाच्या जागेचा मुद्दा सुद्धा तेवढ्याच पोटतिडकीने सभागृहात मांडला. जिल्ह्यातील काही तालुक्यात झालेली ढगफुटी सदृश अतिवृष्टी व त्यामुळे झालेले शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान आणि सार्वजनिक रस्त्यांची झालेली दयनीय अवस्था, यातून शेतकऱ्यांवर बेतलेल्या आपबीतीचे चित्र सभागृह उभे करून सत्ताधाऱ्यांचे लक्ष वेधले. शेतकऱ्यांना तातडीने मदत देण्याची विनंती केली. जिल्ह्याच्या औद्योगिक विकासाला चालना मिळावी व बेरोजगारांना जास्तीत जास्त रोजगार उपलब्ध व्हावा, या उद्देशाने रिसोड येथील एमआयडीसीचा अत्यंत महत्त्वाचा प्रश्न आमदार झनक यांनी प्रश्नोत्तराच्या तासात लक्षवेधी मध्ये उपस्थित केला. तद्वतच विदर्भातील प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना न्याय मिळवून देण्यासाठी विदर्भ बळीराजा कृती संघर्ष समिती गेल्या अनेक वर्षापासून सरकारसोबत झगडत आहेत. त्यांनी अनेक वेळा आंदोलने सुद्धा केली आहेत. मुंबई येथील आझाद मैदानावर झालेल्या आंदोलनादरम्यान सरकार पक्षाकडून एका प्रतिनिधी मार्फत सरकार सकारात्मक असल्याचे सदर कृती समितीस आश्वासन देऊन सुद्धा, आजपर्यंत कुठलाच ठोस निर्णय घेतला नाही. असा मुद्दा उपस्थित करून बळीराजा प्रकल्पग्रस्त कृती संघर्ष समितीच्या मागण्या रास्त असल्याचे सभागृहात ठणकावून सांगितले. आमदार झनक यांची कर्तव्यनिष्ठा व अभ्यासूपणा लक्षात घेऊन पक्षातर्फे त्यांना तालिका अध्यक्षपद देऊन एक प्रकारे त्यांचा सन्मान करण्यात आला आहे.

आमदार अमित झनक यांनी सभागृहात मांडलेले सर्व मुद्दे व लक्षवेधी प्रश्नांना त्यांच्या सहकाऱ्यांनी तर अनुमोदन दिलेच, पण अनेक सत्ताधारी आमदारांनी सुद्धा आपली मूक संमती दर्शविली असल्याचे चित्र अधिवेशनादरम्यान उभ्या महाराष्ट्राला पहावयास मिळाले आहे. त्यांचे सर्व मुद्दे व प्रश्न हे वास्तवाला धरून असल्यामुळे सरकारने सुद्धा आमदार अमित झनक यांच्या सर्व मागण्यांना सकारात्मक प्रतिसाद दिला. हा झनक घराण्याची सेवाभावी वृत्ती व सर्वांना सोबत घेऊन चालण्याची संस्कृती याचा विजय असल्याचे जिल्हावासीय बोलत आहेत.

# पाकचे माजी पंतप्रधान इम्रान खान यांना तीन वर्षांची शिक्षा

## पाच वर्ष निवडणूक लढण्यास बंदी

आधुनिक केसरी न्यूज


**कराची : पाकिस्तानचे माजी पंतप्रधान तथा पाकिस्तान तहरिक ए इन्साफ ( पीटीआय ) पक्षाचे अध्यक्ष इम्रान खान यांच्या अडचणी कमी होण्याची चिन्हे दिसत नाहीत. पाकिस्तानमधील जिल्हा सत्र न्यायालयाने इम्रान खान यांना तीन वर्षांची शिक्षा सुनावली आहे. तोशखाना प्रकरणात ही शिक्षा सुनावण्यात आली आहे.**



शिक्षा सुनावल्यानंतर लाहोर येथील जमान पार्क निवासस्थानातून इम्रान खान यांना अटक करण्यात आली आहे. न्यायालयाने इम्रान खान यांना १ लाख रुपयांचा दंड ठोठावला असून ५ वर्ष निवडणूक लढण्यास बंदी घालण्यात आली आहे. पाकिस्तामधील मुस्लीम लीग-नवाझ ( पीएमएल-एन ) पक्षाच्या नेतृत्वाखाली आघाडी सरकारने ऑगस्ट २०२२ मध्ये इम्रान खान यांच्यावर तोशखाना प्रकरणात गुन्हा दाखल केला होता. तेव्हा तोशखाना प्रकरण चर्चेत आले होते. पंतप्रधान असताना इम्रान खान यांनी त्यांना मिळालेल्या भेटवस्तूंची माहिती तोशखाना विभागाकडे उघड केली नाही. तसेच, या भेटवस्तू बेकायदेशीरपणे विकल्याचा आरोप इम्रान खान यांच्यावर करण्यात आला होता. पाकिस्तानमध्ये तोशखाना विभागाची १९७४ साली स्थापना झालेली आहे. लोकप्रतिनिधींना मिळालेल्या भेटवस्तू नियमाप्रमाणे या विभागात जमा करत माहिती देणे बंधनकारक असते. पण, २०१८ साली सत्तेवर आल्यानंतर इम्रान खान यांनी मिळालेल्या भेटवस्तूंची माहिती तोशखाना विभागाला देण्यास नकार दिला. माहिती दिल्यास अन्य देशांशी असलेल्या संबंधावर परिणाम पडेल, असा दावा इम्रान खान यांनी केला होता. त्यानंतर इम्रान खान यांनी पाकिस्तान निवडणूक आयोगाला पत्र लिहून मिळालेल्या भेटवस्तूंपैकी साधारण ४ भेटवस्तूंची विक्री केल्याचे कबूल केले होते. विक्री केलेल्या भेटवस्तूंची तोशखाना विभागाला उचित किंमत दिल्याचाही दावा इम्रान खान यांनी केला होता.

# प्राचार्य प्रतापराव बोराडे यांचे निधन

आधुनिक केसरी न्यूज



**छत्रपती संभाजीनगर :** महात्मा गांधी मिशनचे विश्वस्त तथा ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ प्राचार्य प्रतापराव बोराडे यांचे दीर्घ आजाराने निधन झाले आहे. शनिवारी काळी पावणे बारा वाजता त्यांनी अखेरचा श्वास घेतला. राष्ट्रवादीचे प्रमुख शरद पवार यांनी देखील ट्वीट करत प्रतापराव बोराडे यांना श्रद्धांजली वाहिली असून, दुःख व्यक्त केले आहे. विशेष म्हणजे प्रताप बोरडे आणि शरद पवार यांचे घनिष्ठ मैत्री होती. छत्रपती संभाजीनगरचा दौरा असला की शरद पवार आणि बोराडे यांची भेट ठरलेली असायची. ज्येष्ठ समाजवादी विचारवंत, महात्मा गांधी मिशनचे विश्वस्त, विद्या प्रतिष्ठान, बारामतीचे माजी प्रशासकीय अधिकारी, ऋषीतुल्य विद्यार्थीप्रिय व्यक्तिमत्त्व प्राचार्य प्रतापराव बोराडे यांचे छत्रपती संभाजीनगर येथे शनिवारी दुःखद निधन झाल्याची बातमी समजली. मागील पाच दशके प्रतापरावांचा आणि माझा स्नेह होता. आपल्या ज्ञानदानाने व उत्तम प्रशासकीय कौशल्याने त्यांनी अनेक शैक्षणिक संस्था नावारूपास आणल्या.राज्यातील अनेक परिवर्तनवादी संघटना व संस्था यांच्यासोबत त्यांचा संवाद होता. मराठवाड्याच्या सर्वांगीण विकासाच्या दृष्टीने ते आग्रही होते.आज त्यांच्या निधनाची बातमी ही मला वैयक्तिक वेदनादायी आहे. त्यांच्या कुटुबियांना व एमजीएम परिवाराला या दुःखातून सावरण्याची शक्ती मिळो. मराठवाड्याच्या शैक्षणिक आणि सामाजिक क्षेत्रात मोलाचे योगदान दिले होते. मराठवाडा साहित्य परिषदेच्या उभारणीमध्ये महत्त्वपूर्ण योगदान देणाऱ्यांमध्ये प्राचार्य प्रताप बोराडे यांचे महत्त्वपूर्ण योगदान दिले होते. मराठवाडा साहित्य परिषदेच्या वतीने देण्यात येणारा जीवनगौरव पुरस्काराने त्यांना 2020 साली गौरविण्यात आले होते. बोराडे हे दोन दशकाहून अधिक काळ जवाहरलाल अभियांत्रिकी महाविद्यालयाचे प्राचार्य होते. ते अभियांत्रिकीचे दुहेरी पदवीधर होते. त्यांचा विविध व्यावसायिक संस्थांशी संपर्क आणि संबंध होता.





# बा नेत्यानो... तुमचे भांडण संपलं असेल तर इकडे लक्ष द्या

## अळयायुक्त दूषित पाणी पिण्याची कोलाम बांधवांवर ओढावली वेळ

आधुनिक केसरी न्यूज

**धनंजय साखरकर**

**चंद्रपूर :** आपला महाराष्ट्र विकासाच्या उंच उंच भरारी घेत असल्याचे दावे नेते करीत असतात.विकासाची गगनभेदी उडान घेतलेल्या याच महाराष्ट्रात बघताच क्षणी ओकारी यावी असं अळ्याची गर्दी असलेलं पाणी पिण्याची दुदैवी वेळ ओढवली आहे. याकडे ना लोकप्रतिनिधी, ना प्रशासनाचे लक्ष गेलं. आदिम समुदायाची असली तरी ती माणसे आहेत, याचा विसर सरकारला झालाय. हृदयाच्या ठिकाणी रस्त्यावरील माती भरून विकासाचा गप्पा करणाऱ्या सरकारची नजर कोलाम बांधवांचा दुःखाकडे आता तरी जाईल काय ? हा खरा प्रश्न आहे. चंद्रपूर जिल्हाचा शेवटचा टोकावर असलेल्या जीवती तालुक्यातील रायपूर ( खडकी ) हे आदिम कोलाम समुदायचे गाव. गावाची ग्रामपंचायत तीन की. मी. लांब. गावाची लोकसंख्या जेमतेम 150. स्वातंत्र्याची 75 वर्षे उलटली मात्र गावाच्या चेहरा भक्कास अन उजाडच. पेसा क्षेत्रातील गट ग्रामपंचायत खडकी ( रायपुर ) अंतर्गत रायपुर गावाचा समावेश आहे.गावात समस्यांची गर्दी झालेली आहे.खरी समस्या शुद्ध पिण्याच्या पाण्याची.पाणी आणण्यासाठी गावकरी दीड कि.मी डोंगरात उतरून नाल्याचे पाणी आणतात.ग्रामपंचायतने डोंगराखाली नाल्यात असलेल्या विहिरीवर दोन वर्षापूर्वी सोलर बसवले होते.सोलरमुळे गावात पिण्याचे पाणी येते. मात्र जिथून हे पाणी येते त्या विहिरीतील पाण्यात अळ्या पडल्या आहेत. मागील दोन वर्षापासून या विहिरीत निर्जंतुकिकरणासाठी साधे ब्लिचिंग पावडरही टाकन्यात आलेले नाही. ही विहीर तुटलेल्या अवस्थेत आहे. विहिरीला कटगर नाही. सध्या या विहिरीत आंब्याचे झाड पडलेले आहे. पावसात सोलर चालत नाही. त्यामुळे गावकऱ्यांना पाण्यासाठी डोंगर चढ, उतार करावे लागते.

# नामस्मरण



कविता शिंगणे गायधनी
संपर्क क्र. 7588181500

आधुनिक केसरी

**धकाधकीच्या जीवनात आपण इतके व्यस्त होऊन जातो, खरं म्हणजे श्वास घेणे हे जर वेगळे काम असते तर बहुदा कोणाला श्वास घ्यायला वेळच मिळाला नसता. इतके आपण आपल्या कामांमध्ये सतत व्यस्त असतो. मनात आलेल्या बऱ्याच गोष्टी आपण करू शकत नाही अर्थात आपल्याला असे वाटत असते की मला वेळ मिळत नाही म्हणून मी ही गोष्ट करत नाही किंवा करू शकत नाही. पण खरेच आपण इतके व्यस्त असतो का....? एखाद्या गोष्टीसाठी वेळच काढू शकत नाही.... आपण काही वेळ काढू शकतो फक्त त्यासाठी दृढनिश्चय हवा. तो वेळ काढायला हवा दिवसभरातला.... पाच मिनिट का होईना पण भगवंताच्या जवळ बसायला हवे. आद्य कीर्तनकार, कीर्तनाचे प्रसारक, प्रचारक ,आद्य चरित्रकार, आद्य आत्मचरित्रकार विश्वसंत श्री नामदेव महाराज म्हणतात**

**काळ वेळ नसे नामसंकीर्तनी**
**उंच नीच योनी हेही नसे ॥१॥**
**धरा नाम कंठी सदा सर्व काळ**
**मग तो गोपाळ सांभाळील ॥२॥**
**कृपाळू कोंवसा सुखाचा सागर**
**करील उद्धार भाविकांसी ॥३॥**
**नामा म्हणे फार सोपे हे साधन**
**वाचे नाम घेणे इतुकेची ॥४॥ना.गा.११२९**


महाराज म्हणतात नामस्मरणासाठी काळ वेळेचे बिलकुल बंधन नसते. भगवंताशी बोलायला हवे त्याचे नामस्मरण करायला हवे .अगदी तुमची सर्व कामे आटोपल्यावर गादीवर बसल्यावर पाच मिनिटं डोळे मिटून शांतपणे भगवंताशी बोला. अहो भगवंताशी म्हणजे कोणाशी.... ? आपल्या स्वतःशी बोला.... आपल्या स्वतःच्या हृदयात डोकवून बघा.... तिथे विठ्ठल असतो ....तिथेच त्याचे नामस्मरण करा. किती साधा उपाय आहे. भागवतामध्ये भगवंताच्या जवळ जाण्यासाठी भक्तीचे नऊ प्रकार सांगितले आहेत आणि कलियुगात सर्वात समर्पक साधन म्हणून नामस्मरण ही साधीसुधी भक्ती करण्याचा एक मार्ग सांगितलेला आहे. हेच नामदेव महाराज या अभंगातून सांगत आहेत. समर्थ रामदास स्वामी म्हणतात,

**नित्यनेम प्रातःकाळी**
**माध्यानकाळी सायंकाळी**
**नामस्मरण सर्व काळी करीत जावे**

देवाचे नाव कोण घेते आहे हे सुद्धा भगवंत बघत नाहीत त्यांच्यापर्यंत फक्त त्यांचे घेतलेले नाव पोहोचलेले असते. शिवलीलामृता मध्ये चौथ्या अध्यायात एक गोष्ट आहे.... एक सहा वर्षाचा मुलगा रानात सापडलेल्या दगडालाच शिवपिंडी मानून शिवाचे नाव घेत असे. एक दिवस आई त्याला रागवून, फरपटत घरी घेऊन जाते. पण शंकर मात्र त्याला प्रसन्न होऊन त्याच्यासाठी स्पटिकाचे शुभ्र शिवलिंग निर्माण करतो आणि रत्नखचित स्वर्ण मंदिर निर्माण करून त्याला तिथे पूजा करायला देतो. तो मुलगा श्रीकर म्हणून प्रसिद्ध होतो आणि नंतर तोच श्रीकर पुढे नंदराजा म्हणून गोकुळी जन्म घेतो. म्हणजे बघा आपण अगदी नकळतपणे जरी देवाचे नाव घेतले तरी ते भगवंतापर्यंत पोहोचत असते. तो कुठल्या जातीचा आहे गरीब आहे की श्रीमंत आहे हे देखील भगवंत बघत नसतो .
तुकाराम महाराज म्हणतात

**सकळासी येथे आहे अधिकार**
**कलियुगे उद्धार हरिनामें ॥**
**ब्राह्मण क्षत्रिय वैश्य शूद्र**
**चांडाळाही अधिकार ॥**
**बाळें नारी नर**
**आदी करून वेश्याही ॥**

सांगा बरे.... कोण नाही घेऊ शकत देवाचे नाव.... ? देवाचे नाव घेण्यापासून कोणासही अडकाठी नाही. अगदी कुठलीही व्यक्ती देवाचे नाव प्रामाणिकपणे घेऊ शकते. पुढील चरणात नामदेव महाराज म्हणतात आपल्या कंठामध्ये सदैव नामस्मरण ठेवले तर गोपाळ आपला निश्चितच सांभाळ करतो. भगवंताला नामस्मरणापेक्षा काहीच प्रिय नाही जो त्याचे नाव नित्य घेतो त्याच्याकडे भगवंताचे सतत लक्ष असते. तो अशा भक्तांच्या मदतीला सतत धावून जातो. साक्षात श्रीशंकर हलाहल प्राशन केल्यानंतर जेव्हा अस्वस्थ झाले त्यांनी रामाचे नाव कंठात धारण केले त्यानंतर विष त्यांच्या शरीरात पसरले नाही असा नामाचा महिमा आहे. आपल्याला सगळ्यांनाच माहिती आहे महाभारतामध्ये पांडव हरिचे सतत स्मरण करीत असत. ते अज्ञात वासात असताना दुर्वास ऋषी त्यांच्याकडे जेवायला आले. हा खरंतर दुर्योधनाचा डाव होता. द्रौपदीने नुकतीच थाळी धुवून पालथी घातलेली होती आणि सूर्योदयानंतर ती थाळी काम करीत नसे. तेव्हा तिने श्रीकृष्णाचा धावा केला आणि



श्रीकृष्ण पांडवांच्या मदतीला धावून आले. हरिपाठा मध्ये म्हटलेच आहे की द्वारकेचे राणे पांडवा घरी खरं म्हणजे श्रीकृष्ण हे द्वारकेचे सम्राट होते आणि पांडव तेव्हा दारिद्र्य अवस्थेत अज्ञातवासात होते. तरी देखील नामस्मरणाचा महिमा इतका मोठा आहे की नामस्मरणामुळे पांडवांच्या घरी श्रीकृष्ण स्वतः धावून येत असत. नामदेव महाराज म्हणतात हा देव म्हणजे कृपा करणारा आहे. सुखाचा सागर आहे. भक्तांचा उद्धार करणारा आहे. सुखाचा सागर म्हणजे काय.... ? म्हणजे देव भावाचा भुकेला आहे. त्याला भक्ताकडून कशाचीच अपेक्षा नसते. आपण जरी मंदिरात भारंभार दान देत असलो तरी त्यातले भगवंतापर्यंत काहीच जात नसते. किंबहुना भगवंताला ते नको असते. पण डोळे मिटून शांतपणे मोठ्या भक्ती भावाने तुम्ही जर देवाचे नाव घेतले तर भगवंत भरभरून आपणास देत असतो. म्हणूनच कृष्णाच्या तुले मध्ये एक तुळशीचे पान देखील पारडे जड करून गेलेले होते. संपूर्ण आयुष्यभर शबरीने श्रीरामाची वाट बघितली.ती सतत नामस्मरण करत असे आणि श्रीरामाच्या केवळ दर्शनाने तिला मुक्ती मिळाली. तिचा उद्धार झाला.
आपला प्रपंच म्हणजे भवसागर आहे तो तरणे काही सोपे नाही. शेकडो विवंचना आपल्या मनाला जाळत असतात. चिता आणि चिंता एका अनुस्वाराचा फरक आहे. चिता एकच वेळा जळून आपले आयुष्य संपवते. पण चिंता मात्र दिवस-रात्र आपल्याला जाळत आपले आयुष्य कमी करत असते. अशा परिस्थितीत जर आपण भगवंताच्या नावाचा आधार घेतला तर हा भवसागर तरुन जाणे सोपे होऊन जाते. नामस्मरण केले की भगवंत आपल्यावर कृपा करतोच. तो त्याला यमयातना देत नाही. ज्ञानेश्वर माऊली म्हणतात हरी मुखे म्हणा हरी मुखे म्हणा पुण्याची गणना कोण करी. भगवंताचे नाव घेतले तर अगणित पुण्य आपल्या पदरी पडते. यज्ञादि कर्माने प्राप्त होणारी स्वर्गातील लोकांतरप्राप्ती म्हणजे पुण्य नव्हे. पुण्य या शब्दाचा अर्थ जयामध्ये नारायण। शुद्ध पुण्य ते एक । असे तुकाराम महाराज म्हणतात. म्हणून पुण्य कमवायचे असेल तर देवाचे नाव घेणे हा एक साधा सोपा मार्ग आहे. हात कामात, प्रपंचात अडकलेले असले तरी वाचेने म्हणजे तोंडाने देवाचे नाव घेत राहावे. नावात अलौकिक शक्ती आहे. मुक्तीचा एक सरल मार्ग आहे. दुःखात असो वा सुखात भगवंताचे नाव घेणे सोडू नये. कंठात त्याचे नाव धरले तर ते वाचेने बाहेर येते आणि अखंड नाम साधनेने पुन्हा वाचेतून कंठाकडे नंतर तिथून पश्यंति कडे आणि परत परावाणी मध्ये जाऊन स्थिर होते. परावाणी मध्ये जाणे म्हणजे जणू आपल्या श्वासावर भगवंताचे नाव कोरले जाणे. नाभीजवळ परावाणीचे सानिध्य असते. दृढनिश्चयातून ते सहज शक्य होते. असे म्हणतात अर्जुनाच्या श्वासोश्वासाबरोबरही श्री कृष्णाचे नाव ऐकू येत असे. निळोबा राय म्हणतात,

**सर्वकाळ पुण्याचीया राशी**
**हरिनाम आलिया जिव्हेसी**
**नित्य तप अनुष्ठानाच्या राशी**
**कोटी यज्ञासी लाभ झाला**

कोटी यज्ञातून जे फळ मिळणार नाही ते केवळ नामस्मरणाने मिळते आणि म्हणून हे इतकेसे छोटेसे दायित्व आपण घ्यायला हवे. आपल्या स्वतःच्या उद्धाराकरता. तुकाराम महाराज म्हणतात मुखी नाम, हाती मोक्ष ऐसी साक्ष बहुतांची भगवंताची आवड निर्माण झाली म्हणजे नाव विसरता येतच नाही आणि जेव्हा सतत आपल्या मना मधून, कंठा मधून, वाणी मधून त्याचे नाव घेतले जाते तेव्हा एक अवस्था अशी येते की आनंदाचे डोही आनंद तरंग.

# अंधश्रद्धा



प्रा. डॉ. पुरुषोत्तम जुन्ने
संपर्क क्र. ७५८८४२४२५४

आधुनिक केसरी

**मानसिक, बौद्धिक पंगूत्वातून अंधश्रद्धेचा जन्म होतो. माणूस म्हणून आपण पूर्ण नाहीत, आपल्या काही मर्यादा आहेत याची जाणीव जेव्हा कधी झाली असेल तेव्हापासून मानवी मन काहीतरी आधार शोधू लागले. या आधाराचा परिणाम पूर्णत्व प्राप्त करून घेण्यासाठी नव्हता तर एकप्रकारचे परावलंबित्व त्यात होते. एकीकडे विज्ञानाची प्रगती आणि अंधश्रद्धा अगदी समांतर चालू असल्याचे दिसते. आज विज्ञान बऱ्यापैकी विकसित होऊन सुद्धा मानवी मनातील सनातन भीती आणि त्याद्वारे निर्माण होणारे विविध क्रियाकलाप कमी झालेले नाहीत. कारण माणसाला अंतिम सत्य जोपर्यंत सापडणार नाही तोपर्यंत हे असेच चालू राहणार. मजेची बाब अशी की अंतिम सत्य वगैरे असे काही असत नाही.**

मुळात सत्याला कोणत्याही विशेषणाची आवश्यकता नसते. अंतिम सत्य, वैज्ञानिक सत्य वगैरे वगैरे जे आपण म्हणतो तसे काही नसते. सत्य हे सत्य असते, निर्भेळ असते. अलीकडे आपण असे म्हणत असतो की, धर्मामुळे माणूस अंधश्रद्धा जोपासत आहे. खरी गोष्ट अशी की, जेव्हा धर्म नामक कोणतीही व्यवस्था अस्तित्वात नव्हती तेव्हाही माणूस आपल्या धारणा बाळगून होता. आपल्या धर्मावरील टीकेचा सार म्हणजे धर्म ही काहीतरी अवैज्ञानिक, टाकावू स्वरूपाची गोष्ट आहे. कारण धर्माने माणसाला अंधश्रद्ध बनवले. ही आपली धारणा एकप्रकारची अंधश्रद्धा ठरते. जे सांत, सीमित आणि सापेक्ष आहे त्याचा शोध वेगवेगळ्या प्रकारे चालू असणारच; परंतु जे इंद्रीयगम्य नाही, मानवी बुद्धीच्या आवाक्यातले नाही त्याचे ज्ञान किंवा जाणीव मानवी मनाचा भाग बनते. मन अस्थिर आहे, चंचल आहे. मन किती चंचल असते हे प्रत्येकाला ज्ञात आहे. ते चंचल असण्यासोबतच चलाख देखील आहे. याच चलाखीतून अंधश्रद्धेचा जन्म झाला. त्यामुळे समाजातील विवेकसंपन्न मंडळींनी चुकीच्या धारणा दूर करण्यावर भर दिला पाहिजे. भारतीय संत परंपरेने हेच तर केले आणि सांगितले आहे. कारण संत म्हणजेच विवेक. संत तिथे विवेक असणे की जी, असे ज्ञानेश्वर महाराज त्यामुळेच म्हणतात. ह्या विश्व पसाऱ्यात अशा अनेक गोष्टी आहेत ज्या इंद्रयातीत आणि तर्काच्याही अतीत आहेत. या सर्व गोष्टीचे ज्ञान घ्यायचे तर अत्यंत विवेकी आणि सुसंस्कृत मनानेच त्याचा शोध घ्यावा लागेल. जीव, जगत आणि जगदात्मा हा संबंध सरळ रेषेत समजून घेता येणार नाही. मानवी बुद्धीला असणाऱ्या मर्यादा येथे उजागर होतात आणि त्यातूनच अंधश्रद्धा निपजते. आपापल्या रीतीने घटना, प्रसंग आणि संबंधाचा अर्थ काढण्यामुळे जो गोंधळ उडतो तो अंधश्रद्धेला खतपाणी घालण्याचे काम करतो. आपला




इतर इंद्रियातीत वस्तूंशी असणारा संबंध समजून सांगणे, त्याची काही निश्चित आचारसंहिता निर्माण करण्याचा उद्देश ठरवणे आणि तो संबंध सुधारणाविषयक दृष्टिकोन तयार करणे हे अत्यंत विवेकी, वैचारिक स्वरूपाचे कार्य सातत्याने समाजात झाले तरच अंधश्रद्धा दूर होऊ शकते. हा सर्व भाग विशेषत्वाने अध्यात्माशी निगडित असल्यामुळे सुधारकांची देखील मोठी अडचण होते. कारण आपले ऐहिक सर्व क्रियाकलाप राजकारणकेंद्री असल्यामुळे आणि राजकारणातून आपण विवेक घालवून बसल्यामुळे सत्य शोधनाचे मार्गच आपण बंद केले आहेत. राजकारण आणि अध्यात्म असा काही संबंध असतो असे जर कोणी म्हटले तर त्यावर चौफेर टिका होऊ लागते, ही आजची परिस्थिती आहे. परंतु नामदार गोखले यांच्यापासून ते विनोबांपर्यंत



सर्वांनीच राजकारणात अध्यात्म असावे, या विचाराचे होते. यात मग महात्मा गांधी, आचार्य जावडेकर आणि बरीच नावे आपणांस सांगता येतील. समाजात अंधश्रद्धा आहे, हे गृहीत धरून तद्विषयक कायदे देखील होतात, पण समाजात अंधश्रध्दा दशांगुळे उरतेच. त्याचे महत्त्वाचे कारण दंडविधानातून पायबंद घालता येत असला तरी मानसिकता बदलण्यासाठी खूप काळ जाऊ द्यावा लागतो. या काळात केवळ कायद्याचा प्रचार आणि प्रसारच पुरेसा नसतो तर आपल्या धारणा बदलण्याची प्रक्रिया चालू असावी लागते. प्रबोधनाच्या माध्यमातून आपण हे साधू शकतो. खरेतर आज आपण आधुनिक युगात वावरत असताना आणि विज्ञानाची वाढ झालेली असताना आपण आपली मूल्ये तपासून घेणे इष्ट ठरेल. पण अधिकाधिक अंधश्रद्धा वाढत असल्याचा सार्वत्रिक अनुभव आहे. अनेक प्रकारची भोंदू मंडळी अगदी छातीठोकपणे समाजात अंधश्रद्धा पसरवत असताना विवेकी मंडळी एकतर मूग गिळून गप्प तरी आहेत किंवा अत्यंत क्षीण आवाजात त्याविरोधात बोलत आहेत. अंधश्रद्धा धर्माच्या जोडीने पसरवत असल्यामुळे आपणासही भूमिका घेणे अवघड जात असल्याचा अनुभव विवेकवाद्यांना येतो. धर्म आणि अंधश्रद्धा या दोन्ही भिन्न बाबी आहेत. जोपर्यंत आपण धर्म, अध्यात्म, विज्ञान आणि अंधश्रद्धा याविषयी पूर्णपणे जागरूक होऊन विचार करणार नाही, तोपर्यंत समाजात, आपल्यात अंधश्रद्धा असणार. अंधश्रद्धा दूर करण्याचे जे अनेक मार्ग आहेत, त्यापैकी एक मार्ग आहे शिक्षणाचा. वैज्ञानिक, तर्काधिष्ठित आणि विवेकी शिक्षणाच्या माध्यमातून समाजातील अंधश्रद्धा आपण दूर करू शकतो. पण यात एक अडचण अशी की, शिक्षण देणे ही शासकीय प्रक्रिया असल्यामुळे आणि शासनप्रतिनिधी हे राजकारणातून येत असल्यामुळे कोण किती विवेकी आहे, हे तपासता येत नाही. म्हणून नामदार गोखले यांनी राजकारणात अध्यात्म असले पाहिजे, असे म्हणाले होते.अध्यात्म म्हणजे सर्वांभूती सहानुभाव. अध्यात्म म्हणजे विवेक. अंधश्रद्धा आणि विवेक एकत्र नांदू शकत नाहीत. महाराष्ट्रातील सर्व संत, समाजसुधारक यांचे कार्य आपण सर्वांनी एकदिलाने पुढे नेऊन मानव्यता पुढे नेण्यास मदत केली पाहिजे. श्रध्दा आणि अंधश्रद्धा यात अत्यंत अस्पष्टशी सीमारेषा असते. सामान्य माणसाचे दोलायमान होणे समजून घेणे विवेकी माणसाचे कर्तव्य समजून प्रबोधनाची सरिता अखंडपणे प्रवाहित ठेवली तरच समाजातील अंधश्रद्धा दूर होऊ शकते.

**(लेखक गोदावरी कला महाविद्यालय, अंबड जि. जालना येथे मराठीचे प्राध्यापक आहेत)**

हे पत्र संपादक, मालक, मुद्रक व प्रकाशक डॉ. प्रभू व्यंकटराव गोरे* यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लि., प्लॉट नं ए -३२, छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रीयल को-ऑप., सोसायटी, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर ४३१ ००५ (महाराष्ट्र) येथे मुद्रित करून प्लॉट नं. २०५, १३ वी योजना, जिजामाता कॉलनी, एन - २, सिडको, जि. छत्रपती संभाजीनगर (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. ( * पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे. या अंकात प्रसिद्ध झालेल्या प्रत्येक बातमी, लेख व जाहिरातींशी संपादक सहमत असतीलच असे नाही. सर्व वाद छत्रपती संभाजीनगर न्यायालयाच्या कक्षेत)आरएनआय : एमएएचएमएआर/२०२१/८२५६६, ई-मेल : aadhunikkesari@gmail.com, संपर्क : +९१ ९०७५७ १६७३९

Printed at Solapur Tarun Bharat Media Ltd., Plot No. A-32, Chhatrapati Sambhajinagar Industrial Co-op, Society, Station Road, Chhatrapati Sambhajinagar 431005 (Maharashtra) Plot No. 205, 13th Plan, Jijamata Colony, N - 2, CIDCO, Dist. Chhatrapati Sambhajinagar (Maharashtra) and published by editor, owner, printer, and publisher Dr. Prabhu Venkatrao Gore * (* According to the PRB Act, it is the responsibility of the editor. The editor does not necessarily agree with every news, article, and advertisement published in this issue. All disputes are within the purview of the Chhatrapati Sambhajinagar court.) RNI : MAHMAR/2021/82566, E-mail: aadhunikkesari@gmail.com, Contact : +91 90757 16739

# 'जीएसटी'मुळे आर्थिक स्थिती सुधारली

## मुनगंटीवार : आयसीएआय'तर्फे 'जीएसटी'वरील राष्ट्रीय परिषदेचे उद्घाटन

आधुनिक केसरी न्यूज




**पुणे :** वस्तू व सेवा कराच्या (जीएसटी) संकलनात महाराष्ट्राचा वाटा जवळपास २० टक्के आहे. दरवर्षी दोन लाख १७ हजार कोटी इतका जीएसटी महाराष्ट्रातून भरला जातो. त्यामुळे महाराष्ट्र खऱ्या अर्थाने देशाच्या अर्थव्यवस्थेचे इंजिन आहे. पाच ट्रिलियन अर्थव्यवस्थेसाठी सनदी लेखापालांचे योगदान मोलाचे असून, जास्तीस्त जास्त जीएसटी संकलित करण्यासाठी पुढाकार घेऊन सनदी लेखापाल भारतीय अर्थव्यवस्थेला सक्षम करण्याची जबाबदारी उत्तमरीत्या पार पाडत आहेत, असे प्रतिपादन राज्याचे वने, मत्स्योत्पादन व सांस्कृतिक कार्य मंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी केले.

दी इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाउंटंट्स ऑफ इंडियाच्या (आयसीएआय) जीएसटी अँड इनडायरेक्ट टॅक्सेस कमिटी आणि 'आयसीएआय पुणे' यांच्या संयुक्त विद्यमाने 'वस्तू व सेवा कर (जीएसटी)' वर आयोजित दोन दिवसीय राष्ट्रीय परिषदेच्या उद्घाटनप्रसंगी मुनगंटीवार बोलत होते. जवळपास ४५० सीए सभासद या परिषदेत सहभागी झाले आहेत.

यावेळी 'आयसीएआय'च्या जीएसटी अँड इनडायरेक्ट टॅक्स कमिटीचे व्हाईस चेअरमन सीए उमेश शर्मा, केंद्रीय समितीचे सदस्य सीए चंद्रशेखर चितळे, विभागीय समिती सदस्य सीए ऋता चितळे, सीए यशवंत कासार, आयसीएआय पुणेचे चेअरमन सीए राजेश अग्रवाल, व्हाईस चेअरमन सीए अमृता कुलकर्णी, सचिव सीए अजिंक्य रणदिवे, सीए प्रणव आपटे, सीए मौशमी शहा, सीए सचिन मिणियार, सीए काशिनाथ पठारे आदी उपस्थित होते.

सुधीर मुनगंटीवार म्हणाले, "कर व्यवस्थेत सुलभता, सहजता आणण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात 'एक देश एक कर' अंतर्गत जुलै २०१७ पासून जीएसटी कायदा लागू करण्यात आला. या कायद्याच्या अंमलबजावणीत, तसेच त्यात सुसूत्रता आणण्यात सनदी लेखापालांनी सुरुवातीपासून महत्त्वाचे योगदान दिले. जीएसटी कौन्सिलच्या गेल्या ५० बैठकांतून अनेक सुधारणा करण्यात आल्या आहेत. जीएसटीनंतर प्रत्येक राज्याचे उत्पन्न वाढले असून, वाढीचा दर १४ टक्क्यांवर गेला आहे. राज्यांची आर्थिक स्थिती सुधारली आहे. पायाभूत सुविधांच्या उभारणीसाठी मोठ्या प्रमाणावर निधी उपलब्ध झाला आहे. करदाते, सनदी लेखापाल आणि सरकार यांच्या एकत्रित प्रयत्नातून देशाची अर्थव्यवस्था प्रगतीपथावर आहे. ब्रिटनला आपण मागे टाकले असून, लवकरच तिसऱ्या क्रमांकांची अर्थव्यवस्था होण्याचे आपले स्वप्न पूर्ण होईल. देशासाठी योगदान देणारा आणि आर्थिक विकासात भर घालणारा सनदी लेखापाल भारतीय अर्थव्यवस्थेचा कणा आहे, अशा शब्दात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आपले कौतुक केलेले आहे. तेव्हा आपण कर व्यवस्था अधिकाधिक सहज व सोपी करण्यात आणि कर संकलनात असेच योगदान देत राहावे," असे आवाहनही मुनगंटीवार यांनी केले.

जीएसटी कायद्यातील नवे बदल' याविषयी सीए उमेश शर्मा यांच्यासह इतर अनेक विषयांवर मार्गदर्शन सत्र झाले. सीए राजेश अग्रवाल यांनी स्वागत-प्रास्ताविक केले. सीए चंद्रशेखर चितळे यांनी वस्तू व सेवा करावरील परिषदेच्या आयोजनामागील भूमिका विशद केली. सीए मौशमी शहा यांनी सूत्रसंचालन केले. सीए यशवंत कासार यांनी आभार मानले.

# वैनगंगा दुथडी, गोसीखुर्दचे १५ दरवाजे एक मीटरने उघडले

आधुनिक केसरी न्यूज

**नागपूर :** भंडारा जिल्ह्यांसह गोसीखुर्द धरणाच्या पाणलोट क्षेत्रात पावसाने जोरदार हजेरी लावली आहे. त्यामुळे वैनगंगा नदी दुथडी भरुन वाहत असल्याने या नदीवरील गोसीखूर्द धरणाच्या जलसाठ्यातही वाढ होत आहे. गोसीखूर्द धरणाची पाण्याची पातळी नियंत्रित ठेवण्यासाठी धरणाचे १५ दरवाजे एक मीटरने उघडण्यात आले आहेत. शुक्रवारी ते अर्धा मीटरने उघडण्यात आले होते. या धरणांमधून सध्या ६२ हजार ९३५ क्युसेस पाण्याचा विसर्ग करण्यात येत आहे. मागील आठवड्यात जोरदार पाऊस पडल्यानंतर सर्वच्या सर्व ३३ दरवाजे उघडण्यात आले होते. त्यामधून जवळपास दीड लाखांहून अधिक क्युसेस पाण्याचा विसर्ग करण्यात आला होता. मात्र, त्यानंतर पाऊस थांबल्याने ३३ पैकी ३१ दरवाजे बंद करण्यात आले होते.

# वातावरणातील बदलामुळे डोळे येण्याचे प्रमाण वाढले

आधुनिक केसरी न्यूज

**संग्रामपूर :** बुलढाणा जिल्ह्यात संग्रामपूर तालुक्यातील वातावरणाच्या बदलामुळे डोळे येणे या आजाराच्या प्रमाणात वाढ होत असून हा आजार संसर्गजन्य आहे, त्यामुळे एकापासून तो दुसऱ्या व्यक्तीमध्ये पसरण्याची शक्यता असते.



वातावरणातील बदलामुळे डोळे येण्याचे प्रमाण वाढले, याबाबत तालुका आरोग्य अधिकाऱ्याचे याकडे साप दुर्लक्ष दिसून येत आहे. संग्रामपूर तालुक्यात गेल्या काही दिवसांत वातावरणात बदल झाल्यामुळे एका बाजूला सर्दी, खोकल्याने हैराण असतानाच डोळे येण्याचे प्रमाण खूप वाढत आहे. डोळ्यातून पाणी येणे, लाल होणे, डोळ्यांमध्ये खाज येणे, अशा पद्धतीची लक्षणे काही तालुक्यासह जिल्हाभर दिसून येत आहे त्यामुळे नागरिकांनी स्वतःच्या मनाने उपचार न करता डॉक्टरांचा सल्ला घ्यावा, असे आरोग्य तज्ज्ञांनी सांगितले आहे.

डोळे येणे हा आजार संसर्गजन्य आहे, त्यामुळे एकापासून तो दुसऱ्या व्यक्तीमध्ये पसरण्याची शक्यता असते. त्यामुळे या काळात डोळे येणाऱ्या व्यक्तीचा संपर्क टाळावा. डोळे येण्याच्या प्रकरणांत वाढ झाली असून गेल्या आठवड्यापासून या डोळे येण्याचे रुग्ण रुग्णालयात भरगच्च दिसून दिसत आहे. एकदा व्यक्तीला डोळ्याचा संसर्ग होऊन गेला आणि त्यांनी काळजी घेतली नाही, तर त्यांना पुन्हा डोळ्याचा संसर्ग होऊ शकतो. डोळे आल्यास ते स्वच्छ पाण्याने धुवावेत, तसेच डोळ्यांना सतत हात लावू नये. रुमालाने डोळे चोळत बसू नये. घरातील अन्य सदस्यांपासून लांब राहावे, तसेच ग्रामीण भागात लहान मुलांच्या रुग्णसंकेत वाढ होत आहे.

तालुका आरोग्य अधिकारी यांनी लक्ष न दिल्यास पोटाच्या आजारासह इतरही आजार फोफावण्याची शक्यता नाकारता येत नाही

१) डोळे आल्यावर आपण कापूर जाळून धूरी घ्यावी. यामुळे डोळ्यातील घाण बाहेर पडण्यास मदत होते.

२) एरंडेल तेल काजळासारखे डोळ्याला लावल्याने डोळ्यातील पु बाहेर पडण्यास मदत होते.

३) चांदीच्या स्वच्छ दागिन्यांना काहीवेळ पाण्यात ठेवावे व मग ते पाणी डोळ्यात थेंबभर टाकल्याने आराम मिळतो.

४) डॉक्टरांकडून डोळे स्वच्छ होण्यासाठी ड्रॉप्स दिले जातात त्यांचा नीट व न चुकता वापर करावा.

५) ग्रीन टीच्या वापरलेल्या बॅग थोड्यावेळ फ्रीज मध्ये ठेवून नंतर त्या डोळ्यावर ठेवल्याने थंडावा मिळतो.

६) डोळे आल्यावर सूर्यप्रकाशच नव्हे तर घरातील ट्यूबलाईटचा प्रकाशही सहन होत नाही त्यामुळे स्वच्छ गॉगल घालावा.

**डोळे येण्याला काय म्हणतात ? :** आता सर्वात महत्त्वाचा मुद्दा डोळे येणे याला इंग्रजीत काय म्हणावे. डोळे येण्याला शास्त्रीय नाव हे किरॅटोकंजायटिव्हिटिस असे आहे पण त्याचा अपभ्रंश होऊन आपण कंजेक्टीव्हायटीस असे म्हणू शकता. त्यामुळे जेव्हा तुम्ही बॉसला किंवा डॉक्टरांना याविषयी सांगाल तेव्हा मला डोळे आलेत यापेक्षा कंजेक्टीव्हायटीस झाला आहे असेही म्हणून बघा.

# प्रत्येकाने आयुष्मान हेल्थ कार्ड काढून घ्यावे : डॉ. राजपूत

आधुनिक केसरी न्यूज




**सोयगाव :** नागरिकांनी आयुष्यमान भारतचे डिजिटल हेल्थकार्ड, आभा, हे प्रत्येकाने काढून घेणे आवश्यक आहे या कार्ड द्वारे आपल्या आजारपणात याचे सहाय्य तर होईलच परंतु आपली संपूर्ण हेल्थ हिस्ट्री सेव्ह राहील जेणे करून भविष्यात कुठेही आरोग्याची अडचण आली तर उपचार करणाऱ्या डॉक्टरला तुमची आरोग्य विषयक तात्काळ याद्वारे माहिती मिळेल व उपचार करणे सोपे जाईल. यासाठी प्रत्येकाने आयुष्यमान भारतचे आभा कार्ड काढून घ्यावे, असे आवाहन सावळदबारा प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ व्ही पी राजपूत यांनी केले आहे. सध्या आजारपणात प्रचंड खर्च होतो व अचानक उद्भवलेल्या कठीण प्रसंगात आर्थिक व मानसिक तणाव प्रचंड वाढतो. अचानक आलेल्या प्रसंगात नातेवाईक गोंधळून गेलेले असतात अश्या परिस्थितीत मागील उपचार बाबतीत माहिती देणे शक्य होत नाही. अशा प्रसंगी आभा हेल्थ कार्ड हे आपला खूप मोठा मित्र बनून सोबत उभा राहतो. आभा कार्डमुळे आपल्या मागील आजारा संबंधित माहिती ही डॉक्टरला मिळते यामुळे तात्काळ योग्य उपचारकरण्यासाठी मदत मिळते. आभा हेल्थ कार्ड काढण्यासाठी सीएससी सेंटर आपले सरकार केंद्रात जाऊन कार्ड काढून घ्यावे, असे आवाहन वैद्यकीय अधिकारी डॉ. व्ही. पी. राजपूत यांनी केले.





महाराष्ट्र Business Katta













# हा प्रवास सुखाचा झाला



डॉ. विजय पांढरीपांडे
मो. 7659084555

आधुनिक केसरी

**ऑगस्ट २०२३ चे माझ्या आयुष्यात खास महत्व आहे. चार दशकापूर्वी ५ ऑगस्ट १९८३ रोजी मी उस्मानिया विद्यापीठात प्रोफेसर म्हणून रुजू झालो. यापूर्वी मी आयआयटी खरगपूर येथे होतो. एव्हढी मोठी संस्था सोडायचा निर्णय सोपा नव्हता. तिथेही फक्त सात वर्षात दोन पदोंनत्या मिळाल्याच होत्या. पण ३४ व्यावर्षी एकदम प्रोफेसरचे पद मिळणे ( तेही मुलाखतीला हजर न राहता! कारण त्यावेळी मी लंडनला परिषदेसाठी गेलो होतो.) तरीही माझ्या गुरूजनाच्या सल्ल्याने मी हे पद स्वीकारण्याचा निर्णय घेतला. तो निश्चितच चुकीचा नव्हता हे गेल्या चार दशकातील माझ्या शैक्षणिक प्रगतीच्या आलेखाने सिध्द केले.**

इथे आल्यानंतर माझ्या मायक्रो वेव्ह या स्पेशलायझेशनमध्ये आधुनिक प्रयोगशाळा उभारण्याचे. याक्षेत्रात प्राध्यापक, वैज्ञानिक, इंजिनिअर यांना कोर्सेस, वर्कशॉपमध्ये ट्रेनिंग देण्याचे महत्वपूर्ण काम माझ्या हातून झाले.यानिमित्ताने डीआरडीओ, इस्रो अशा संस्थेशी संबंध आला. त्याच्या अनेक प्रोजेक्टचे परीक्षण करण्यासाठी तज्ञ म्हणून काम करण्याची संधी मिळाली. म्हणूनच माझ्या मार्गदर्शनाखाली पीएचडी करणारे अर्धेअधिक या राष्ट्रीय प्रयोगशाळेतील वैज्ञानिक आहेत. डीआरदीओमध्ये तेथील वैज्ञानिकांच्या प्रमोशनसाठी तज्ञ म्हणून मी सर्वात जास्त तीन दशके काम केले. या प्रयोगशाळेचे अनेक प्रकल्प आमच्या विभागाला मिळाले. भारत सरकारच्या नेवीगेशन इलेक्ट्रॉनिक प्रकल्पसाठी दहा वर्षे काम केले. एकूण उस्मानिया विद्यापीठात आल्यापासून विविध क्षेत्रात संशोधन करण्याची संधी मिळाली.

उस्मानियातील आमचा इलेक्ट्रॉनिक विभाग या क्षेत्रात उत्कृष्ठ म्हणून प्रसिध्द असल्याने प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांचा दर्जाही उत्तम असे. त्यामुळे यूजी, पीजीला शिकवताना मजा यायची. आयआयटी सोडून आपण चूक केली असा पश्चाताप कधीच झाला नाही.

खरेतर इथल्या तेलुगू वातावरणात मी मराठी म्हणजे बाहेरचा, परका होतो. पण इथे मलाच नव्हे तर आमच्या कुटुंबाला हा परकेपणा कधी जाणवलाच नाही. माझ्याच विभागातून मुलगा इंजिनिअर झाला.मुलगी याच विद्यापीठाची पदवीधर. तर पत्नीने देखील याच विद्यापीठातून डॉक्टरेटसह तीन पदव्या मिळवल्या! मी ज्येष्ठ डीन या नात्याने पत्नीला पीएचडीसाठी पाचारण केले हा योगायोग! विद्यापीठाने, येणाऱ्या प्रत्येककुलगुरूंनी मला प्रशासनात, विविधपदांवर भरपूर संधी दिल्या.जॉईन होताच दोन वर्षात मला विभागप्रमुखांच्या खुर्चीवर बसावं लागलं. त्यानंतर दहा वर्षे मी सिनेटमध्ये होतो. इथे सिनेटच्या निवडणुका होत नाहीत. या मानाच्या पदावर थेट कुलगुरू नियुक्त्या करतात.



भारत सरकारच्या इलेक्ट्रॉनिक विभागतर्फे गुणवत्तावाढीसाठी एक जागतिक बँकेचा प्रकल्प सुरू झाला. यात आमच्या विभागाची निवड होण्याच्या प्रक्रियेत माझा सुरुवातीपासून सहभाग होता. या जागतिक बँकेच्या प्रकल्पावर काम करण्याचा अनुभव सर्वदृष्टीने समृद्ध करणारा होता. त्याचेच एक्स्टेंशन म्हणून आलेल्या स्विस डेवलोपमेट कॉर्पोरेशनच्या प्रकल्पाला भारतात साकारकरण्यासाठी महत्वपूर्ण भूमिका निभवण्याची संधी मिळाली. इलेक्ट्रॉनिक इंजिनियरिंगचा अभ्यासक्रम भविष्यकालीन उद्योग, गरजा लक्षात घेऊन आखायला हा,कार्यान्वित करायला हवा, ही आजच्या अक्रिडेशन, मानंकनाची संकल्पना आम्ही फार पूर्वी कार्यान्वित केली हे सांगताना अभिमान वाटतो.

आयआयटीत राहिलो असतो तर आपल्याच ज्येष्ठ शिक्षकाच्या छत्र छायेत राहावे लागले असते. या उस्मानिया विद्यापिठात माझे मला मोकळे आकाश मिळाले. स्वतःला सिध्द करता आले. विशेष म्हणजे यासाठी वरिष्ठांकडून प्रोत्साहन, सहकाऱ्यांकडून पूर्ण सहकार्य मिळाले. परप्रांतात असूनही अडचणी आल्या नाहीत.अडथळे जाणवले नाहीत. याचकाळात डॉ. कलाम यांचा दोन दशकाहून अधिककाळ सहवास लाभला. ते अनेकदा मीटिंगसाठी आमच्या विभागात यायचे. अनेक निवडसमितीत आम्ही एकत्र काम केले. त्यांच्याकडून ही बरेचकाही शिकता आले. तेउत्कृष्ठ टेक्निकल मॅनेजर होते. आपल्यासह कार्याची ते खूप काळजी घेत.प्रमोशनसाठी त्यांची बाजू उचलून घेत. त्यांचा एक वैज्ञानिक माझ्याकडे पीएचडी करत असताना ते अधूनमधून प्रगतीची चौकशी करीत. मी जेव्हा लवकर कामपूर्ण व्हावे म्हणून त्याला सुटी मंजूर करण्याची विनंती केली तेव्हा त्यांनी ताबडतोब सुटी दिली! माझे डीआरडीओच्या वैज्ञानिकाबरोबर केलेले संशोधन हेआधुनिक रडारप्रणालीशी संबंधित होते. जे संरक्षण क्षेत्राच्या सिक्रेट प्रकल्पावर आधारित होते. त्यामुळे पेपर्स, प्रबंध लिहिताना विशेष काळजी घ्यावीलागत होती.

या कालावधीत माझ्या कामाची दखल घेऊन अनेक मानसन्मान, पुरस्कार मिळाले ते वेगळेच.त्या मुळे जबाबदारी अधिक वाढली. पुढील महत्वाच्या प्रशासनिक जबाबदाऱ्या पारपाडताना जे यश मिळाले त्यात उस्मानिया विद्यापीठातील कारकीर्दीचा मोठा वाटा आहे. २००९ साली मी नियमाप्रमाणे कागदावर निवृत्त झालो एव्हढेच. त्यानंतर अतिथी प्राध्यापक, एमेरिट्स प्रोफेसर म्हणून काम केले. एका इंडस्ट्रीतर्फे त्या आधी करोडो रुपयांची ग्रँट मिळाली. त्यातून आधुनिक संशोधन केंद्र निर्माण करता आले. त्याचा मानद निर्देशक म्हणून विद्यापीठाच्या एकझिक्युटिव्ह कौन्सिलने खास नियुक्ती केली. १९८८च्यामाजी विद्यार्थ्यांनी चार आधुनिक प्रयोग शाळा बांधून दिल्यात. त्यांना शिक्षकाची नावे दिलीत. त्यात एक प्रयोगशाळा माझ्यानावानेबांधली. त्यात माझ्यासाठी कायमस्वरूपाचे ऑफिस देखील आहे! मी निवृत्त झालो, औरंगाबादला कुलगुरू म्हणून गेलो. पण विभागातील माझी रूम, माझ्या नावाची पाटी तशीच आहे अजूनही! असे भाग्य कुणाला लाभते. म्हणूनच मीउस्मानिया विद्यापीठाचा अत्यंतऋणी आहे. माझे एक पुस्तक मी या विद्यापीठाला अर्पण केले आहे. अजूनही अधूनमधून शिकवणे सुरूआहे. संशोधन सुरूआहे. गेल्याचवर्षीपूर्ण झालेले संशोधन सीमेवर सुरक्षेसाठी वापरल्या जाणाऱ्या आरडारप्रणालीशी संबंधितआहे. या प्रवासात घरच्या कुटुंबाची पूर्ण साथ मिळाली. त्या शिवाय हा प्रवास अशक्य होता. यायशा मागे माझ्याखरगपूर येथील बंगाली शिक्षकाचे, मार्ग दर्शकाचे मोठे योगदान आहे. या विद्यापीठाच्या सहकार्याची साथ तितकीच महत्वाची होती. उत्तम शिकविण्यासाठी विद्यार्थ्यांनी अप्रत्यक्ष भाग पाडले! हैदराबादमधील इतक्यावर्षात जुळून आलेल्या स्नेहीजनानी वेळोवेळी मदत केली. यासर्वाचे ऋण फिटता फिटणार नाही.

मला ऋणी राहायलाच आवडेल. आयुष्याच्या संध्याकाळी माणसाला अजून काय हवे असते ?

# मैत्री

आधुनिक केसरी

**वयाच्या प्रत्येक टप्प्यावर हवी हवी शी वाटणारी साथ म्हणजे मैत्री. मैत्रीचा जिव्हाळाही वयानुसार बदलत असतो. मैत्री कोणत्याही वयाची कोणत्याही वयासोबत होत असली तरी. त्या त्या वयाच्या टप्पा हा मैत्रीचे संबंध जास्त दृढ करणारा असतो, एकमेकांना समजून घेवून मदतीचा हात देणारा असतो. एकमेकांसोबत खेळायला सवंगडी हवा असतो तसाच एकमेकींच्या सुख आणि दुःखात आधार देणारा मैत्रीचा हात हातात असावा लागतो.**

बालपणीची मैत्री म्हणजे चिखलात मनसोक्त एकत्र खेळणे, कागदांच्या होड्या करून पावसात भिजत लहानच मोठे होणे, एकमेकांचा हात धरून शाळेत जाताना एक जण पडला की त्याला उचलून त्याच्या कपड्यांचा मातीने भरलेला डाग पुसत राहणे, पेन पेन्सिल चा झालेला पसारा सावरणे... हळूच कोवळ्या स्पर्शाने मित्राला ताप आला की पाहणे आणि सर आजारी आहे असं ओरडुन सांगणे. मैत्रीचा तोच हात हातात घेवून मोठे होत जाणे आणि मैत्री ल ही मोठे करताना मैत्री म्हणजे वयात आल्यावर एकमेकींची ओढणी सावरत, एकमेकांवर असलेल्या नाजरावर लक्ष ठेवणे, मैत्री म्हणजे चुकत असलेले पाऊल मागे घेण्यास सांगणे. कधी कधी मैत्रीत पण स्वार्थी पण येतो तो अनेकदा दिसतोही...

माणूस हा स्पर्धक होत चालला आहे त्यामुळे आपल्यापेक्षा पुढे असणारे किंवा पुढे जाऊ पाहणारे मैत्री ल खपत नाहीत. निर्मळ अशी मैत्री अचानक संपुष्टात येते. छोट्या छोट्या कारणास्तव छोटी छोटी भांडण मग ती कट्टी थोड्यावेळाने पुन्हा बट्टी तो अनुभव पुन्हा नाही. शाळा, कॉलेज संपले की मैत्रीचे धागे तिथेच सुटून जातात त्याच कट्ट्यांवर...

नवीन जागा नवीन मित्र मैत्रिणी नवीन मैत्री... विसरत काहीच नाहीत आपण पण सहवास संपतो ,संवाद कमी होतो. वयानुसार मैत्रीची गरज तिचा सहवास बदलत जातो. मनातले सांगायला हवी असते मैत्री, मनातली वेदना रिक्त करायला हवी असते मैत्री, कुठेतरी मस्त फिरून यायला हवी असते मैत्री. आता हे मैत्रीचं रोप हे झाड झालेलं असतं कधी सावली देत तर कधी अडचणीच्यावेळी आधार देत महिन्याचा पगार संपला की हक्कच एकच माणूस असतो तो म्हणजे मित्र. एक वेळी सख्खे नाही म्हणतील मदतीला पण हा मित्र जीवाची पर्वा करणार नाही पळत येईल एका हाकेत. असाच मैत्रीचा धागा विणून ठेवला जातो प्रत्येकाच्या आयुष्यात.

स्रीच जीवन तर मैत्री शिवाय अपूर्णच आहे. तिला मैत्री लागते शेजारी असणारी, बाजारात असणारी, ऑफिसमध्ये असणारी, स्टँडवर उभे राहिले तरी मैत्रीण लागते गाडीची वाट पाहताना सोबत होणारी. अगदी भाजी काय करायची पासून तर सणावाराला कोणती साडी घालायची इथपर्यंत जिवाभावाची मैत्रीण हवी असते. मैत्रीण ही एकच अशी व्यक्ती आहे जी बदलते खूप वेळा पण सोबत आयुष्यभर राहते. कितीही कामाचा डोंगर असुडेत आपण आजारी असलो



ना तर तिला तिकडे बेचैन होत आणि ती फोन करते नाहीतर भेटायला येतेच. तीच जवळची मावशी असते आपल्या पिलांची.

मुलगी वयात आली की ती आईची मैत्रीण होते. दोघींचं विश्व वेगळे होते काही दिवस तरी इतर मैत्रीचा थोडासा का होईना विसर पडतो कारण घरातच हक्कची जीव भावाची मैत्रीण मिळालेली असते. सारख्या उंचीची पण कमी वयाची ती तर एकमेव मैत्रीण असते सगळ्या गोष्टीत भागीदारी होणारी. एकमेकींच्या आवडीचे कपडे, आवडीचा स्वयंपाक, आवडीचा एखादे स्थळ फिरायला, आवडीचा सिनेमा, आवडीचा विरंगुळा दोघींचा. बापाचा ही मुलगा मोठा झाला की मित्र च होतो एकच नंबर ची चप्पल घेताना कौटुंबिक जबाबदारी वाटून घेताना त्यांच्या मैत्रीचे अनेक पैलू ठळकपणे घरात वास्तव्य करताना दिसून येतात. मैत्री गरीब श्रीमंत असा भेदभाव करत नाही तर हीच मैत्री सावरून घेते अनेक वादळ ना...! मित्रांचे ही काही वेगळे नाही त्यांच्या कित्येक संकटाना हातावर पेलण्याची ताकद त्यांच्या मित्रांच्यात असते. अर्ध्या रात्रीत उठून येईल असा एक तरी मित्र प्रत्येकाच्या आयुष्यात असतोच. मित्र लागतोच पार्ट्यात रंग भरायला, मित्र लागतोच डोळ्यातली काळजी ओळखायला, मित्र लागतोच सोबत लाडक्या लेकीला लग्न करून पाठवून दिल्यावर रात्री गळ्यात पडून रिक्त होयाला.

अनेक अशा गोष्टी असतात त्या रिक्त होण्यासाठी स्री ला ही मित्राची गरज असते आणि पुरुषाला ही एका मैत्रिणी ची गरज असते. हे एकच नात अस आहे जे निस्वार्थी आहे, निर्मळ आहे. त्याची परिभाषा च वेगळी आहे. हा नैसर्गिक समतोल ही असू शकतो जेव्हा बाईच बाईला समजून घेता येत नाही आणि पुरुषचे पुरुषाला कळत नाही ते मैत्रीला उमजून जातं. ही निखळ मैत्री स्वीकारणे ही काळाची गरज आहे. कारण संशय हे अनेक संकटाना दार उघडे करून देते .पण मैत्री ही मैत्री असते. तिच्या रंगात रंगून जाऊन आयुष्य सप्त रंगी करायचं असते.

सध्या मैत्रीचे वारे खूप वाहत आहेत. फेस बुक मैत्री, व्हॉटसअप ग्रुप मैत्री, भिसी मैत्री, अनेक मार्ग झालेत एकत्र येण्यासाठी ,सहवास मिळण्यासाठी... पण ह्या मुळे खरा संवाद, सहवास हरवत चालला आहे. न भेटता अनेक चांगले मैत्रीचे धागे जुळत आहेत .पण हे मृगजळ आहे हे ही विसरता कामा नये. कारण फसवणूक, अत्याचार, ह्याही घटना ह्याच अशा मैत्रीमुळे घडताना दिसत आहे. त्यामुळे बाल मैत्री, कॉलेज मैत्री, आणि म्हातरपणाची काठी म्हणजे मैत्री जो आभास नाही, भास नाही. ती साथ आहे, सोबत आहे, संगत आहे. जबाबदारीतून मुक्त झालो उतारवयात गप्पा करायला, आपल्याला वेळ देणारे पुनः फक्त मित्रच भेटतात. चश्मा लावून, काठी हातत्ता घेऊन आयुष्यावर बोलताना मित्र च आधार होत असतात शेवटच्या क्षणापर्यंत.

अगदी मृत्यू जवळ आला तरी मैत्रीचं असते सोबत सर्वांच्या अगोदर...

**सौ. स्वाती ठूबे,
औषध निर्माण अधिकारी,
जिल्हा परिषद, अहमदनगर**



# मुले म्हणजे मार्क्स देणारे मशीन नव्हे

आधुनिक केसरी

**सकाळी उठल्यापासून ते रात्री झोपेपर्यंत शाळा, अभ्यास, परीक्षा ट्युशन, होमवर्क अशा चक्रव्यूहात आजची मुले अडकली आहेत. त्यांना रोज प्रचंड अशा ताणतणावाला सोमोरे जावे लागतय. याचे ज्वलंत उदाहरण म्हणजे बीड जिल्ह्यातील एका विद्यार्थीनीचा अतिताणातून ऱ्हदयविकाराच्या तीव्र झटक्याने वर्गात झालेला मृत्यू होय. समस्त पालक वर्गाला प्रचंड मोठा धक्का देणारी ही घटना आहे.**

मुले आणि त्यांचे शिक्षण आज आपण कोणत्या मार्गाने घेऊन चाललो आहोत ? याचा गंभीरपणे विचार करण्याची वेळ आली आहे. ताणतणावाला सामेरे कसे जायचे हे मुलांना आपण शिकवतो का ? शाळेतील त्यांची शैक्षणिक प्रगती यावर पालक म्हणून आपले समाधान होते का ? हा खरा प्रश्न आहे.

सकाळी उठले की शाळा. शाळेतून आले की खाजगी क्लास. क्लासवरुन घरी आले की शाळेचा आणि क्लासचा होमवर्क तोही मध्यरात्रीपर्यंत. मुलांनी झोपायचे कधी. ? त्यांना विश्रांती नको का ? त्यांनाही मेंदू आहे. तोही थकत असेल .त्यांनाही कंटाळा येत असेल.पालक म्हणून आपण त्यांना समजून कधी घेणार आहोत की नाही ?

मुले म्हणजे मार्कस मिळवून देणारे मशीन नव्हे . हे आपल्याला कधी समजणार ? अशा अनेक मुलांचा जीव गेल्यावर ? खरं तर मुले हीच आपली संपत्ती आहे.तेच आपले सर्वस्व आहे.त्यांना असे गमावून कसे चालेल ?

मान्य आहे आजच्या काळात शिक्षणाला कमालीचे महत्त्व आले आहे. शिक्षणाशिवाय पर्याय नाही.

मेहनत घेतल्याशिवाय मुलांचे स्वप्न पूर्ण शकत नाही. करिअर होऊ शकत नाही. हे सगळं जरी खरं असले तरी अतिताणतणावाने मुलांना आपल्यातून जाऊ देणे कितपत योग्य आहे ? प्रत्येक मुलाला जन्मतःच काही नैसर्गिक क्षमता मिळालेल्या असतात.त्याचा कल आवड आणि क्षमता पाहून त्याला शिकण्यास प्रोत्साहन देणे हे पालक ,शाळा आणि शिक्षकांचे काम असते. शिक्षण घेत असताना मुलांवर अतिताणतणाव येणार नाही. मुक्त वातावरणात हसत खेळत शिक्षणाचा आनंद घेता यायला हवा.तरच त्याची शिक्षणातील रुची वाढेल.त्याच्या अंगी असणाऱ्या नैसर्गिक क्षमतांना पुरेपूर वापरुन हाती येणारे यश यावर पालक म्हणून आपण निश्चित समाधानी व आनंदी रहायला हवे.

आपल्या अपूर्ण इच्छा पूर्ण करण्याचे माध्यम म्हणून आपण मुलांचा वापर करतो. म्हणून त्यांच्यावर अपेक्षांचे ओझे लादले जाते. दुसऱ्या मुलांशी तुलना केली जाते. पाल्य मागे या जगात मागे राहतो काय अशी भीती पालकांना सतावत राहते. त्या भितीतून पालकांवर ताण येतो.तो ताण मुलांवर टाकला जातो. त्यामुळे मुले तणावाखाली वावरतात.त्यांना धड बोलण्याचे स्वातंत्र्य नसते. करिअरसाठी तुला मेहनत करावे लागेल हेही सतत ऐकावे लागते. प्रत्येक मूल हे वेगळे असल्याने प्रत्येकाची बौद्धिक क्षमता वेगवेगळी असते. त्यामुळे एकमेकांची तुलना करणे गैर ठरते. तसेच मुलांकडून अवास्तव अपेक्षा ठेवण्याचा विचारही चुकीचा असतो. खरं तर त्यांच्या समजून घेणे आणि त्यांना विश्वास देणे गरजेचे असते.

मुलांच्या अंगभूत क्षमतानुसार त्यांना शिकू देणे.त्यांना प्रोत्साहन देणे एवढेच पालकांचे काम असते.आणि अपयश आल्यावर खंबीरपणे पाठीशी उभे राहणे. त्यामुळे मुलांना आत्मविश्वास येतो.माझे पालक माझ्या पाठीशी आहेत.या आनंदाने मुलांना नवचैतन्य आणि ऊर्जा मिळते.त्यांची शैक्षणिक प्रगती भरारी घेत राहते.आणि व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास होतो.

**लक्ष्मण जगताप, लेखक शिक्षक आहेत.**

# तुका म्हणे प्राण घेतला या आशा



प्रा. डॉ. विठ्ठल जायभाये
संपर्क क्र. 9158064068

आधुनिक केसरी

**लेखक, कवी, विचारवंत एखादा विचार घेऊन स्वतः अस्वस्थ असतो, परिणामी त्याला स्वतःला झोप येत नाही. स्वतःच्या बरोबरीने तो आपला सभोवताल नित्य जागा ठेवण्यासाठी प्रयत्नरत असतो. त्यातूनच तो काहीतरी लिहितो, बोलतो आणि जागृती करत असतो. एवढेच काय तो आपल्या लेखणी आणि वाणीतून व्यवस्थेची लक्तरे वेशीवर टांगतो. एवढं धाडस तो करतांना त्याला व्यवस्थेचा मार देखील खावा लागतो, जीवानिशी जावे लागते. असे असले तरी तो त्याचे कार्य अहोरात्र करतच असतो. चांगला-वाईटाचा संघर्ष पूर्वापार चालत आलेला असतांना चांगुलपणाचा विजय निश्चित असतो. एवढे कळून सुद्धा माणूस पुन्हा पुन्हा चिंताग्रस्त, दुःखी होतांना पाहून अशा दुःखी, संसारी माणसाला उपदेशीत करतांना विविध दृष्टांत आणि त्याच्या जोडीने सिद्धांत सांगत आपले कार्य करत राहतात.**

त्यापैकी तुकोबांचा सर्प भुलोनी गुंतला नादा। गारोडिये फांदा घालीतसे। हिंडवोनि पोट भरी दारोदारी। कोंडोनी पेटारी आसे रया ॥१ ॥ तैसी परी मज झाली पांडुरंग। गुंतलो मी तो गा, सोडी आता। माझे मज काही न चलें से झाले। कृपा हे तूज न करिता ॥२ ॥
आमिषाने मीन लावियेला गळीं। भक्ष तो गीळी म्हणवोनी।
काढुनी बाहेरी प्राण घेऊ पाहे। तेथे बाप-माय कवण तया ? ॥३ ॥
पक्षी पिलीयां पातले आशा। देखोनिया फासा गुंते बळे।
मरण नेणे माया धावोनि वोरेसे। जिवीत्वा नाश जाली बाळें ॥५ ॥
गोडपणे मासी गुंतली लिगाडी। सांपडे फडफडी अधिकाधिक।
तुका म्हणे प्राण घेतला या आशा। पंढरी निवासा धाव घाली ॥६ ॥
(१०९२)

हा अभंग मोठा मजेशीर आहे. या अभंगाचे अवलोकन केल्यानंतर लक्षात येते की; आशा किती भयंकर आहे ? अत्यंत विषारी असलेला नाग सुद्धा आपल्यासमोर काहीतरी हलतेय हे पाहून त्याच्या नादाला लागतो, परिणामी गारुडी त्याला पेटाऱ्यात बंद करून त्याला दारोदर फिरवून सापाचा खेळ करतो, स्वतःचे पोट भरतो. त्याच्या जोडीला तुकोबाराय पाण्यात साम्राज्य करणारा, मुक्त संचार करणारा मासा आमिषापोटी गळासहित भक्ष गिळून टाकतो आणि तो स्वतः कोळ्याचे भक्ष्य होतो. त्यावेळी त्याला त्याचे आई-बाप कोळ्याच्या जाळ्यातून सोडवू शकत नाहीत. पारध्याचा दृष्टांत देतांना शिकारी घरट्याभोवती जाळे टाकतो, आणि घरट्यातील पिलांच्या आशेने घरट्याबाहेर मुक्त असलेले माय-बाप सुद्धा शिकाऱ्याच्या पाशात अडकतात. गोडपणाला भुलून माशी गुळावर बसते, गुळाचा आस्वाद घेते, परंतु गुळ खाता खाता खोल खोल फसत जाते. त्यानंतरची तिची वाढलेली फडफड-धडपड तिला आणखीनच गुळात आणखी खोलवर फसवत जाते. वरील चारही उदाहरणे देऊन तुकोबाराय स्वतःची अवस्था व्यक्त होतात. या आशेपायी माझी अवस्था गारुड्याचा पेटाऱ्यातील नाग, गळ गिळणारा मासा, जाळ्यात अडकलेला पक्षी आणि गुळात अडकलेल्या माशी सारखी झाली आहे. या आशेपुढे माझे काही चालत नाही. या आशेने भल्याभल्यांचा प्राण घेतला आहे. तेंव्हा, हे पांडुरंगा या आशेतून तूच आम्हाला मुक्त कर अशी आर्त-याचना करतात. तुकोबाराय आपल्या अवस्थेची स्वतःच कबुली देतांना आपला भोवताल सावध करतात. ज्याला आपण आपले आपले म्हणून त्यात अधिकचे गुंततो आणि आपला आपणच घात करून घेतो. ही एक प्रकारची आत्महत्याच! तेंव्हा आशा म्हणजे आत्मघातच! माणसाला हे सगळे कळत असून देखील तो त्यात खोलखोल बुडत जातो. त्यासाठी तुकोबाराय वारंवार पंढरीनाथाला मदतीला बोलावतात.

**तुकाराममनीती**
**भाग -63**

संसार आणि त्यातील विविध नातेसंबंध माणसाला कसे खोलखोल घेऊन जातात ? याचं सुंदर उदाहरण म्हणजे ज्यांना आपण आपले म्हणून चिकटून राहतो तेच आपली प्रतारणा करतात. वाजत गाजत घेऊन जातात आणि जाळून टाकतात. लग्न होईपर्यंत आई-पप्पा म्हणत मागेपुढे फिरणारा मुलगा-मुलगी एकदा आपल्या संसार चक्रात गुंतले की; आई-वडील दुय्यम होऊन आपला संसार प्रथम स्थानी येतो. हे चक्र सातत्याने सुरूच आहे. बौध्द दर्शन प्रतिपादन करतांना महात्मा सिद्धार्थ गौतम बुद्धांनी चार आर्य सत्य सांगत असतांना संसारात दुःख आहेच. त्यासाठी कोणत्याही गोष्टीला अति चिकटून बसने ही सर्वात मोठे घातक बाब आहे. माणूस स्वतःच्या शरीराला जास्त चिकटून बसतो, मात्र शरीर जीर्ण होत जाणार आहे. केस गळणार आहेत, दात पडणार आहेत, हातपाय थकणार आहेत. दिवसेंदिवस शरीर जीर्ण होत जाणार आहे. सगळी नातीगोती हळूहळू आपल्याला दुरावणार आहेत. असे असले तरी माणसाला यापासून सुटू वाटत नाही. श्रीमद्भगवद्गीतेतील 'जायतेऽस्तिवर्धते विपरिणमतेऽप क्षीयते विनश्यतीति' या प्रमाणे जन्म, वाढ, वृद्धत्व आणि शेवटी मृत्यु हे चक्र चालत आले आहे. त्यासाठी आपण दुःखाची अपेक्षा केली अथवा नाही केली तरी संसारात दुःख होणारच आहे. आपली आवडती व्यक्ती आपल्यापासून दुरावणार आहे. असे असले तरी हे सहन करण्याची शक्ती माणसाला ईश्वराने देणे आवश्यक आहे. त्यासाठी अनेकांनी सृष्टीला अथवा ईश्वराला प्रार्थना करतात. त्याप्रमाणे तुकोबाराय वारंवार प्रार्थना करतात.
त्यासाठी काळ कोणताही असो, प्रगत, अप्रगत, अवस्था गरीब-श्रीमंत असो जीवनात सगळेचजन आशाबद्ध असून त्यापासून



सुटका कोण करणार ? त्यासाठी जीवनात निरपेक्ष, निर्लोभ जीवन जगण्यासाठी प्रार्थना करणे अगत्याचे आहे. महान तपस्वी लोकसुद्धा आशाबद्ध जगतांना त्यांना संसार सुटत नाही. त्यासाठी प्रत्येकाने जीवनाकडून अती अपेक्षा ठेवू नये. इथे प्रत्येकजण स्वतःवर अतिशय प्रेम करतो. माकडीणीचा दृष्टांताप्रमाणे स्वतःच्या जीवावर बेतले की; आईसुद्धा आपले लेकरू पायाखाली घेऊन स्वतःचा जीव वाचवते. प्रत्येकाचा स्वतःचा एक स्वतंत्र शरीर संसार असून त्याला सुरक्षित करण्यासाठी प्रत्येकजण प्रयत्नरत आहे. कुणाच्याही स्वतंत्र संसाराला आव्हान मिळाले की; तो किंवा ती अस्वस्थ होते. हे सूर्यप्रकाशाएवढे सत्य आहे. याचे मूळ म्हणजे आशा! त्यासाठी कोणत्याही बाबीला चिकटून बसू नये.
वर्तमानात आपण सार्वांनीच याचा खोलवर विचार करून निरपेक्ष जीवन जगण्याचे ठरवले पाहिजे. कुणी कितीही श्रीमंत, जपीतपी, महंत अथवा कितीही महान असला तरी त्याला जीवनाची सर्व तत्वे लागू होतात. मानवी शरीरातील उर्जा अमर असली तरी शरीरमात्र सोडावेच लागणार आहे. 'कळतं पण घर गळतं' या म्हणीप्रमाणे इथे तुम्ही-आम्ही पण सारेच अनावश्यक विचार करून आणि नश्वर गोष्टींमध्ये आपला जीवन-विचार गुंतवून ठेवून, त्यासंबंधाने विचार करत असतो. त्याचा परिणाम म्हणजे विनाकारण आपल्यामागे माहित नसलेले दुर्धर आजार-रोग मागे लागतात. प्रत्येकजण सुखाच्या शोधात आहे.

सुखी माणसाचा सदरा शोधायला गेले तेंव्हा कळले की; एक माणूस सुखी-आनंदी आहे मात्र त्याला सदराच नाही. वस्तुत अथवा वास्तूत सुख मानावे लागते. सुख घडोघडी, क्षणोक्षणी आहे, फक्त ते जाणावे आणि मानावे लागते. माणूस मनाने आनंदी, शांत, संयमी, निरपेक्ष, निर्मोही इत्यादी गोष्टी सोबत घेऊन जीवन जगल्यास माणसाला विनाकारण व्याधी ग्रस्त करणार नाहीत. त्यासाठी सातत्याने संत आणि महान, त्यागी महापुरुषांचे विचार-जीवन समोर ठेऊन जगावे लागेल. त्यासाठी मी माझ्यासाठी ही तुकाराम नीती लिहितांना, चिंतन करतांना तमाम वाचक बंधू-भगिनींना विनम्रतापूर्वक विनंती करतो की; कृपया आपण सगळे मिळून आनंदाने जीवन जगण्यासाठी उद्याचा फार काही विचार न करता वर्तमान काळात आनंदी, शांत, प्रसन्न राहून आपले दैनंदिन जीवन आणि भोवताल सुगंधी, प्रसन्न, शांत करून तनामनाचे मंदिर केल्यास देवदर्शन करण्यास बाहेर कुठेही भटकत फिरण्याची आवश्यकता नाही. कुठेही देवदर्शनासाठी रांगेला लागून, धक्काबुकी करून, भांडणे करून स्वतःतील देव अशांत करण्यापेक्षा एकांती, शांत राहून देव आणि दर्शनाची अनुभूती घ्यावी! यासाठी वारंवार संतांच्या वचनाची साथसंगत करून जीवन कृतार्थ करावे. असे होणे म्हणजेच जगद्गुरू तुकोबाराय यांच्या महान चिंतनाचे आणि त्यांच्या छायेत बहरत असलेली ही तुकाराम नीतीचे निश्चितच सार्थक होईल यात तिळमात्र शंका नाही! जय तुकोबाराय!

# तारुण्याच्या उंबरठ्यावर



रंजना सानप
संपर्क क्र. ९०४९५४८३२३

आधुनिक केसरी


**कुठेतरी व्यक्त व्हायचं असतं थोडं मुक्त व्हायचं असतं. व्यक्त होण्यासाठी जवळचं कोणीतरी हवंहवंसं वाटतं. घरात ती मोकळीक संवादाची जागा कोणी घेऊ शकत नसतील तर नजर शोधत राहते ती पोकळी भरून काढण्यासाठी जवळचं कोणीतरी हक्काचं माणूस. मग मित्रांच्या गराड्यात हरवून जाते तरुणाई. आता तर सोशल मीडियाच्या वापरामुळे जगभरातील मित्रमैत्रीणी जवळ आले आहेत.**

कित्येक वेळ ती यांत्रिक, आभासी विश्वात रमून जातात. अगदी खाण्यापिण्याचही भान त्यांना राहत नाही.

ज्या वयात हातात पुस्तक असायला हवं ,भविष्य सुंदर करण्यासाठीची धडपड असायला हवी, कष्ट करायला शारीरिक दृष्ट्या तंदुरुस्त हवं ती जाणीव विसरून रात्रंदिवस त्याला वश झाल्यासारखी स्क्रीन समोर बसून राहतात.त्याचा शरीरावर मनावर घातक परिणाम होतो आहे हे लवकर त्याच्या लक्षातही येत नाही. काहींना तर कायमचे शारीरिक अपंगत्व मोबाईलच्या अतिवापराने आले आहे.
रमेशने अकरावीत कॉलेजमध्ये प्रवेश घेतला. सुंदर कॉलेज जीवन अनुभवत होता.वडिलांनी दिलेला भारी कंपनीचा नवीन मोबाईल हाती पडला होता. मित्र मैत्रिणी, दंगा, मस्ती असं सगळं मजेत चाललं होतं पण कोरोनाच्या संसर्गाने लॉकडाऊन जाहीर झाले. त्याला एकाकी वाटू लागले. मग मित्र मैत्रीणीशी संवाद रात्री उशिरापर्यंत मोबाईलवरून होऊ लागला. त्यानंतरचा रिकाम्या वेळत तो लोखंडी बेडच्या सळीवर आपले डोके ठेवून रात्रभर पिक्चर पाहत राहायचा .शेवटी काय! अतिची माती झाली. त्याच्या मानेतील शिरा गाठळल्या. हातपाय थरथर कापू लागले. दोन वर्षे तो अंथरुणाशी खिळून राहिला. अनेक औषध उपचाराने तो आता कुठे उभा राहतो आहे. त्याचे या कालावधीत शिक्षण पूर्णपणे थांबले. घरदार चिंतेत गेले. त्यांनाही आर्थिक आणि मानसिक ताण सोसावा लागतो आहे.
कित्येक मुले मोबाईल सफाईदारपणे हाताळतात.
पालकांनाही त्याचे कौतुक
वाटते. "मला जे जमत नाही ते माझ्या बाबूला जमते". हे आनंदाने सांगतात. पण ते काय पाहत आहेत याकडे मात्र दुर्लक्ष करतात. आणि जे नको तेच घडते.
. अनेक गोष्टी उमलत्या वयातच नजरेसमोर येतात. आणि ती जाणून घेण्याची उत्सुकता मनात जागी होते. त्या जगाचा अनुभव घ्यावा असं वाटायला लागतं. आणि उमलत्या,अजानत्या वयातच प्रेमाच्या जाळ्यात अडकून पडतात. ऑनलाईन क्लाससाठी मोबाईल दिला आणि पोर भलतच करून बसली. मुलाने तिला भुरळ पाडली अन ती प्रेमाच्या जाळ्यात ओढली. किती समजावलं तरी तिला कळतंच नव्हतं. शिकणं सोडून



तिचं फिरणं वाढलं होतं. पण आम्हाला हे उशिरा कळलं. तिच्या मार्कलिस्ट वरून हा प्रकार उघडकीस आला. पण वेळ निघून गेली होती.त्याच्या स्पर्श अनुभवण्याची वेडी ती झाली होती.एक दिवस अचानक घर सोडून निघून गेली. अशा अनेक घटना आपण आजूबाजूला अनुभवत आहोत.प्रेमाचा अर्थ समजून न घेताच वरवरच्या प्रेमाला भुलून आयुष्य बरबाद होते आहे. काही दिवसांनी चूक लक्षात येते कोणी तरी सावरावं असं वाटत असतं पण बहुतेक वेळेला ते होत नाही. त्याच्या चुकीच्या निर्णयाची शिक्षा आई वडील भोगत असतात.समाजात, नातेवाईकात वावरताना अनेक समस्यांना त्यांना तोंड द्यावे लागते. लेकरांना सगळ्या सुखसुविधा देऊन आपणच चूक केली की काय असं त्यांना वाटायला लागतं. मान खाली घालुन जगण्याची वेळ त्याच्यावर येते. अपराध काय आमचा ही भावना त्यांच्या मनात येत असते .मग या तरुणाईला प्रेम निभावण्यासाठी स्वतःलाच जगण्यासाठी धडपड करावी लागते. नाहीतर जगणंच नको असा चुकीचा निर्णयही ही तरुणाई घेऊन बसते.आणि हे प्रेम आयुष्यभर टिकेल शाश्वती देता येत नाही. आरोप, प्रत्यारोप होतात. मध्येच बंध तुटतात. मुलगी स्वावलंबी नसेल तर तिला अनेक समस्यांना तोंड द्यावे लागते. ती उघड्यावर येते. तिला घायाळ करण्यासाठी जागोजागी गिधाडे लपलेली असतातच. या सोशल मीडियाची भुरळ तर लहान थोर सर्वांनाच पडली आहे. संध्याकाळी घरट्यात परतल्यावर होणारी किलबिल आता कुठे ऐकूच येत नाही. घराच्या भिंतीही मुक्या झाल्यासारख्या वाटतात. शुभंकरोती म्हणून घेणारी आजीच आता कुठे फारशी दिसत नाही. बालमनाला अनेक प्रश्न पडलेले असतात. दिवसभरात घडलेलं बरंच काही सांगायचं असतं. शाळेत आज काय गंमत झाली. बाई काय म्हणाल्या ?मित्राने डब्यात काय आणले होते ?पण उत्तरे देण्यासाठी कुणाकडे वेळ नाही. सगळीच मोबाईलच्या जगात वावरत असतात.
त्याच्या प्रश्नांना उत्तरे देण्याऐवजी त्याच्याहातात मोबाईल देऊन बसतो.कार्टून, गोष्ट पाहता पाहता ते मुलाची जिज्ञासा जागी होती.आणि ते नवनवीन गोष्टींचा शोध घेऊ लागते. चांगल्या शोधात गेला तर ठीक पण चुकीच्या गोष्टीचा खूप वाईट परिणाम सर्वानाचभोगावा लागतो. वेळ निघून गेल्यावर मग
कारणांचा शोध घेत बसतात. तेंव्हा अनेक कारणं समोर येतात. ती सुधारण्यासाठी धडपड सुरू होते पण फारसा सकारात्मक बदल होताना दिसत नाही. त्यांना आवर घालताना ती अधिकच आक्रमक बनत चालल्याचा अनुभव येतो आहे.भिरभिरणाऱ्या मनाला अचानक वेसण घालणे आवडत फारसं आवडत नाही. मग काही वेळेला समुपदेशन करण्याची वेळही येऊन येते. या गोष्टी आपल्या कुटुंबात होऊ नयेत म्हणून योग्य वेळी सावध होऊयात. सोशल मीडियाचा वापर टाळणे शक्य नसले तरी काही ठराविक बंधने स्वतःवर लादून घेऊयात. वाहवत जाणाऱ्या तरूणाईला योग्य वेळी सावरायला हवे. नाहीतर भविष्यकाळ अनेक प्रश्न घेऊन उभा राहील. दोष कोणाचा ? याचे उत्तरच सापडणे कठीण होईल. अजून वेळ गेली नाही. चला तर आत्मशोधन करूयात.




# भारत कन्या

आधुनिक केसरी

**आजच्या एकविसाव्या युगातही महिला ठरते अत्याचाराचा बळी**
**पुणे,मुंबई,कोल्हापूर असो मणिपूर का कुस्करतात क्रूरपणे अशी कळी ?...**
**आईच्याच पोटी घेतला आहे जन्म याचे ही जातात कुत्री विसरून भान**
**माय,पत्नी,लेक त्या ठिकाणी पहाल तेव्हाच द्याल का आया बहिणींना मान..**
**पुरुषी जन्म म्हणजे नेमके काय हो ? प्रश्न विचारा निवांतपणे स्व मनाला**
**असे अत्याचार, बलात्कार करुनी तुम्ही काय अर्थ देतात तुमच्या जीवनाला ?....**
**वाकड्या नजरेने जर पाहिले तुमच्या पत्नीकडे,लेकीकडे तर विषारी नजर**
**ठेवाल का ? सहन कराल का ? सांगा करा आता जीवनात माणुसकी हजर...**
**महिला ही कोणाची तरी आई बहीणच ना ? तिला तुमच्या हवसेसाठी दिला का**
**जन्म ? घरातल्या आई, लेक, बहिणीला पहाल का कुढत रहाल ना मनातल्या**
**मनात आजन्म... महिलांनीच खोचा स्वतः चा हो पदर**
**असल्या नराधमांना जागेवर ठेचायला तेव्हाच यांच्या नांग्या बसतील जागेवर**
**लाजही वाटत नाही असे क्रूर वागतांना.. माणुसकी काळीमा फासून वावरतात**
**उजळ माथ्याने पुन्हा नीच हे जीवनात दुसऱ्या बकरीच्या शोधत सुटती लांडगे**
**का अशी कुत्री,जनावरे निडरपणे जगतात.. कायदे आता थोडे तरी बदललेच**
**पाहिजे जागेवर फाशी देवून,गोळ्या घालून ठार जेव्हा कराल असे नराधम तेव्हाच**
**जगेल भारतकन्या जीवनात जाणा याचे हो सार... महिला सक्षमीकरण नारे फक्त**
**कागदोपत्री यांना जागेवर ठेचायचा द्या तिला अधिकार पहा, होतो की नाही बदल**
**त्यांच्या विचारसरणीत होवू द्या असे पुरुषी नीचतेवर घणघाती प्रहार...**
**भारत माता रडून चालणार नाही जीवनात बांगड्या पुरुषांना घालण्यास बन**
**दुर्गामाता कराटे प्रशिक्षण घेवून जग बिनधास्त जीवनी**
**तूच आहे जननी, जन्मदात्री, अन् आदिमाता..**

सौ. प्रतिमा अरुण काळे, निगडी प्राधिकरण पुणे, ४४

# लोकशाहीमध्ये लोकांची किंमत काय..?



विनोद सदावर्ते
संपर्क क्र. 9130979300

आधुनिक केसरी

**भारतात सर्वगुणसंपन्न संपन्न असे संविधान असून ते चालवणारे मात्र गुणसंपन्न नसल्याने लोकशाही मध्ये लोकांचा विकास न होता निवडणूक आलेल्या लोकांचाच विकास होत आहे. नावाला जरी लोकशाही असली तरीही येथे लोकशाही व लोकांच्या मताला किंमत राहली नाही. लोकशाही मध्ये लोकप्रतिनिधी हे लोकांचे सेवक असतात. लोकांची सेवा करणे हे त्यांचे प्राथमिक व नैतिक कर्तव्य आहे. परंतु आज नैतिकता आणि प्रामाणिक पणा किती लोकप्रतिनिधी मध्ये दिसून येतो हा सुक्ष्म संशोधनाचा विषय झाला आहे.लोकशाही मध्ये लोकांचा विकास न होता लोकसेवकांचा विकास होत असेल तर हे प्रामाणिक पणाचे लक्षण आहे का? कष्ट करणारा, राबराब राबणारा शेतकरी, शेतमजूर काबाडकष्ट करूनही स्वतः च्या परिवाराचा उदरनिर्वाह कसा करावा म्हणून चिंतीत असतो.**

त्याच्या पोटाची खळगी वेळेवर भरत नाही. कित्येक लोकांना पौष्टिक अन्न मिळत नाही ही वास्तविकता आपल्याच देशात आहे. लोकसेवक निवडून आला कि त्याची संपती हजारो पटीने वाढते. कोणत्या लोकप्रतिनिधी कडे किती संपती आहे हे सर्व सामान्य लोकांना माहीती आहे. प्रतिनिधी यांची एकदम संपत्ती वाढण्यामागचे काय कारण आहे ? महागड्या गाड्या, महागडे घर, जमीन व इतर मालमत्तेमध्ये तेजीने वाढ होते. सर्व सामान्य लोकांना मात्र आयुष्यभर काबाडकष्ट करून ही घराच्या दोन खोल्या बांधता येत नाहीत, प्रत्येक ठिकाणी काटकसर करून आलेला दिवस मागे टाकावा लागतो. परंतु लोकप्रतिनिधी साठी हे उलट आहे. निवडून आले की लगेच त्यांचे मोठे घर होते, महागडी गाडी, चैनीच्या वस्तु घरात येतात. खरचं हे सर्व लोकप्रतिनिधी यांना मिळणाऱ्या पगारावर एवढे करणे शक्य आहे ? भारत हा धार्मिक व संस्कार मय देश आहे. त्यातल्या त्यात महाराष्ट्र विशेष संस्कारी राज्य आहे. माणसाला जगताना धर्माचा, माणुसकिचा आधार घ्यावा लागतो. जगताना आपल्यावर काही संस्कार आहेत हेही समोरच्या ला दाखवावे लागते. परंतु राजकारणात नेमके कोणते संस्कार आहेत हेच कळायला मार्ग नाही. केवळ राजकारणाला भांडवल बनवून नफा कमवण्यासाठी सर्व जन लोकसेवेचा व्यापार करत आहेत. लोकशाही मध्ये लोकांचा सर्वांगीण विकास होणे आवश्यक असताना येथे लोकप्रतिनिधी चा सर्वांगीण विकास होत आहे. सर्व सामान्य माणुस मात्र दैनंदिन गरजा पुर्ण करण्याच्या चिंतेनेच आयुष्य जगत आहे. दरवर्षी लाखो करोडो रुपयाच्या बजेट चा पाऊस पाडला जातो. त्या बजेट चा पैसा नेमका जातो कुठे हेच कळत नाही. कारण कधी दुष्काळ पडला तर शेतकऱ्यांना नुकसान भरपाई साठी पैसा नसते, शाळेच्या गुणवत्तेसाठी, रंगरंगोटी साठी पैसा नसते, रस्त्यावर खड्डे पडलेले असताना खड्डे बुजायला सरकार कडे पैसे शिल्लक राहत नाहीत. सरकारी दवाखान्यात गेलो तर स्वतः तर नसतेच पण बऱ्याच वेळी औषधी उपलब्ध नसते कारण औषधी खरेदी साठी सरकार कडे पैसा नसतो. लाखो करोंडो रुपयांचे दरवर्षी चे बजेट नेमकं जाते कुठे हा प्रश्न सर्व सामान्य लोकांना पडतो. परंतु बजेट चा पैसा नियोजित कामावर खर्च होत याचे लोकप्रतीनिधींना काहीच वाटत नाही. काही वेळा अनेक योजनेचे गाजर दाखवून अनेक टप्प्यामध्ये पुर्ण करण्याचा प्रयत्न केला जातो. जसे घरकुल साठी सरकार आर्थिक मदत करते परंतु ती तिन टप्प्यात आणि ते पैसे मिळण्यासाठी लाभार्थ्यांना चकरा मारून परेशान व्हावे लागते. प्रत्येक ठिकाणी अशीच परिस्थिती आहे. आपल्या संस्कारानुसार ग्रामीण भागातील आजही शेतकरी शेतमजूर कुटुंब असे आहेत की स्वंयपाक करताना दोन पोळ्या



शिल्लक करतात कारण घरी कोणी आराच तर तो उपाशी जाऊ नये. खासातील खास देण्याचे संस्कार अंगीकारून हे आजही सर्वसामान्य लोक जिवन जगतात. अडीअचणीला कोणाकडून पैशाची देवान घेवाण केली तर समोरच्या व्यक्तीने पैसे परत मागण्या अगोदरच त्याचे पैसे परत करतात. कारण घेतलेले पैसे त्याने स्वतः हुन परत मागीतले तर कुठे तरी स्वाभिमान दुखतो. म्हणून वेळेच्या आत पैसे देऊन स्वाभिमान जागृत ठेवतात. परंतु हा स्वाभिमान व हे संस्कार लोकप्रतिनीधी पार विसरून गेलेले दिसतात. घासाघातील घास देण्याचे संस्कार कुठे आणि समोरच्या च्या ताटातील सर्वच लुबाडण्याचे संस्कार कुठे ? करोडो रुपयांचा भ्रष्टाचार करून जनतेने किती ही भ्रष्ट बोलले तरी ही जनतेसमोर मताची भिक मागायला उभे राहण्याचे धाडस येते तरी कुठून ? पायातील काटा काढणाऱ्याचे उपकार विसरू नये असे संस्कार असणारे सर्वसामान्य लोक आजही आहेत. परंतु लोकांमुळेच निवडून येऊन ऐशोआरामाचे जिवन जगुन, मंत्री होऊन जनसेवा करण्याऐवजी, निवडून दिल्याची जाणीव न ठेवता त्याच लोकांच्या समस्या ही ऐकुन न घेणारे नेते नेमके कोणत्या संस्काराचे पालन करतात ? लोकशाही मध्ये जनता राजा असते लोकप्रतीनिधीं जन सेवक असतात परंतु जनसेवका समोर राजाला हात पसरावे लागतात हे नितीवान माणसाला पटणारे आहे का ? लोकप्रतिनिधी यांनी जनतेचा उदोउदो करायला पाहिजे परंतु येथे राजाकडून जनसेवकाचा उदोउदो होतो हि बाब खुप गंभीर आहे. लोकांच्या मताला थोडीही किंमत येथे नाही. लोकांच्या मताचे सोडा येथे निवडून झाली की लोकांना किंमत नाही. अशी परिस्थिती निर्माण झाली. लाखो महिला मागील काही वर्षांत बेपत्ता झाल्या परंतु याचे गांभीर्य कोणालाच दिसत नाही. हजारो शेतकरी आत्महत्या कधीच गांभीर्याने चर्चा व उपाययोजना नाही, महागाई, बेरोजगारी, भ्रष्टाचार या संदर्भात जनसेवक जनतेचे मतही ऐकायला तयारी नाहीत. निवडणुकीच्या वेळी घरा घरात जाणारे उमेदवार निवडून आल्यावर कुठेच दिसत नाहीत हे संस्कार नेमके आहेत कोणाचे ? जनता मताधिकारा द्वारे आपले काम करेल म्हणून प्रतीनिधी निवडून देतात. कोणी काम करत नाहीत म्हणून अनेकांना डावलतात. परंतु निवडून आल्यावर जनतेच्या मताचा, जनतेच्या समस्येचा कोणताही विचार न करता जनतेने नाकारलेले व जनतेने स्विकारलेले दोघेही एकत्र येतात आणि जनतेला लुटतात. देशात लोकशाही आहे. निवडून आल्यावर तुम्ही वैयक्तिक राहत नाही. निवडून आल्यावर प्रत्येक निर्णय हा जनकल्याणाचा व जनतेला विश्वासात घेऊन करायला पाहिजे परंतु जनतेच्या मताला किंमत न देता वैयक्तिक फायद्यासाठी लुटारु लुटारु एकत्र येऊन देशाला पोखरून आर्थिक कमकुवत करत आहेत. आणि आर्थिक दुर्बलता सर्व सामान्य लोकांच्या लक्षात येऊ नाही म्हणून जाती धर्मात लढवले जाते. सर्वसामान्य जनतेचे प्रश्न कधीच सुटत नाहीत. छोटेछोटे काम निवेदन देऊनही पुर्ण होत नाही मात्र लोकप्रतिनिधी च्या मोठ्या पगाराचे व पेन्शनचे विषय तात्काळ निकाली काढतात. चमत्कारिक पद्धतीने लोकप्रतिनिधी चे पगार व भत्ते वाढवले जातात तेव्हा कोणताही बोजा सरकारच्या तिजोरीवर येत नाही. मात्र गोरगरीब जनतेच्या मुलांना शिक्षच, आरोग्य सुविधा नोकरी द्यायची तर सरकार कडे पैसा नसते. हजारो करोडोचे घोटाळे केलेले लोक मंत्रीमंडळात स्वच्छ होऊन बसतात. आणि ईकडे सर्वसामान्य माणुस स्वतः चे काम करून घेण्यासाठी चकरा मारुन मारुन परेशान होतो. तरीही त्याच्या परेशानीची, त्याच्या वेदनेची, त्याच्या मनाची, त्याच्या मताची किंमत कोणी करत नाही. निधी आहे म्हणून जनतेचे कामे कुठे च लवकर होत नाहीत. परंतु कर्ज काढून लोकप्रतिनिधी च्या पगारात मात्र एका तासात वाढ केली जाते आणि विशेष त्याला विरोधही कोणी करत नाही. अन्न सुरक्षा योजना अंतर्गत प्रतिव्यक्ती अठराशे रुपये वार्षिक देण्याचा निर्णय सरकार घेत आहे. ही सर्वसामान्य लोकांची थट्टाच नाही का ? आमचा आमदार अधिवेशनात जाऊन बसायचे एका दिवसाचे दोन हजार रुपये घेतो. आणि आणि सर्वसामान्य जनतेला अठराशे रुपये ? लोकशाही मध्ये जनतेच्या विकासावरच काम व्हायला पाहिजे परंतु अधिवेशन बघितले तर एकमेकांच्या वैयक्तिक बाबींवर गदारोळ होतो आणि या गदारोळात जनतेच्या समस्या तश्याच पायी तुडवल्या जातात. उपाययोजना करणे साधी चर्चाही घडवून आणली जात नाही. तरुणांचे प्रश्न, महिलांचे प्रश्न, शिक्षण, रोजगार, आरोग्य सुविधेवर बोलायला कोणाला वेळ नसतो. जनतेने वेगवेगळ्या माध्यमातून मांडलेल्या समस्या तशात खितपत पडलेल्या असतात. मात्र प्रतिनिधी च्या समस्या तात्काळ निकाली लागतात. म्हणजे लोकशाही मध्ये लोकांच्या मताला किंमत नाही तर जनसेवक हाच राजावर स्वार होऊन राज्याची लुट करून लोकशाही च्या नावाखाली घराणेशाही व आर्थिक परिस्थिती बळकट होत आहे. आर्थिक विषमतेची दरी वाढून लोकशाही पायदळी तुडवली जात आहेत. तुडवणारे लोक लोकशाही चे बेगडी गुणगान गातात तेव्हा मात्र मनाला चटका बसतो. लोकशाही मध्ये लोकांची किंमत कुठे ? हा प्रश्न पडतो.

# मेनोपॉज...यू मे से नो पॉज.....

आधुनिक केसरी

**बाईपण भारी देवा हा सिनेमा पाहिला आणि सगळ्यांच्या तोंडी एकच चर्चा सुरू झाली. मेनोपॉज त्या बहिणीतील एकीचा हा पिरियड सुरु होत असतो आणि चर्चा तिथे रंगते. पण पडद्यावर रंगणाऱ्या या चर्चा बाहेर आल्या. आता सोशल मीडियावर या बद्दल पोस्ट शेअर करण्यात येऊ लागल्या. तो कसा असतो. काय होत, मग काय करावं, तोंड कसं द्यावं, मानसिकता कशी राखावी वगैरे वगैरे चर्चांना ऊत आल्यासारखं झाले. त्याची वैज्ञानिक कारणं, भल्या भल्या इंग्लिश शब्दांनी त्याचा वैज्ञानिक दृष्टीकोनातून समजावण्याचा प्रयत्न बाईमाणसासाठी होऊ लागला.**

एकदा का पंचेचाळीशी ओलांडली की स्त्रियांना काही शारीरिक त्रास होऊ लागतात. ते त्यांच्या असंतुलित हार्मोन्स मुळे...इस्ट्रोजेन आणि प्रोजेस्टेरॉन अशी दोन संप्रेरके म्हणजे मराठीतील हार्मोन्स निर्माण करत असतात ती क्रिया थांबणे म्हणजे मेनोपॉज. मातृत्व थांबते.या काळात व नंतर स्त्रीयांना अनेक अडचणीतून, शारीरिक मानसिक भावनिक त्रासाला सामोरं जावं लागतं.खरं तर मागच्या वयात तर मातृत्व हे लाभलेलं असतं.पूर्वी सारखं गोकुळा सारखं घर भरलेलं असावं अशी अलिकडच्या स्त्रीची ईच्छा असेल अस वाटत नाही.तसेच अलिकडच्या स्त्रिया विविध ठिकाणी पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून प्रत्येक क्षेत्रात आघाडीवर आहेत.तिथे येणारा ताण ,थकवा, हे कारण ही असावेच. त्यामुळे अलीकडे मेनोपॉज लवकर येतोय.मला याविषयी काही म्हणायचे नाही. ही एक नैसर्गिक क्रिया आहे जन्म झालेल्यांना बालपण, यौवन,प्रौढपण,वृध्दपण हे आहेच आहे. तस हे प्रत्येक स्त्रीला आहेच.

पण पुरुषांचे काय ? हा मला पडलेला प्रश्न आहे.सतत स्त्रियांच्या रजोनिवृत्तीची चर्चा, मासिक पाळीच्या चर्चा,पॅंड मॅंन सारखा चित्रपटही त्यांच्यासाठीच!!! पण पुरुषांच्या बाबतीत असा काही विचार बाईपण भारी चित्रपटासारखा का कोणी करत नाही ?एखादा चित्रपट पुरुषांच्या मेनोपॉज विषयी का येत नाही ? का काही समस्याच पुरूषांमध्ये दिसत नाहीत ?की पुरुष असल्यामुळे दाखवायचे नाही ?की पुरुषांना कुठे तरी कमी लेखले जाईल म्हणून चित्रपट काढायचे नाहीत की चर्चा करायच्या नाहीत. खरं तर पुरूषांमध्ये ही हा पाँज येतोच.

महिलांमध्ये जसे बदल दिसून येतात तसे पुरूषांमध्ये ही दिसून येतात. त्या लक्षणांना "अँड्रोपाँज" म्हणतात. पुरुषांच्या मध्ये हा साधारण पन्नाशीच्या जवळपास येतो.कारण "टेस्टोस्टेरॉन"चे उत्पादन किंवा पातळी कमी होत जाणे हे पुरुषांच्या रजोनिवृत्तीचे वैशिष्ट्य आहे.लैंगिक वैशिष्ट्यांची वाढ करणारी संप्रेरक पातळी घटते आणि हे सुरु होतं.जसा त्रास स्त्रियांना होतो तसाच काहीसा सहन करावा लागतो.झोप न लागणे,त्यात व्यत्यय येणे, त्वचेवर फरक पडणे लैंगिक कार्य बिघडणे,चिडचिड होणे,मुड स्विंग होणे,नैराश्य, एकाग्रता कमी होणे, अपूरी उर्जा, हे पुरुषांना सुध्दा सहन ( भोग भोगावे ) करावे लागतातच.असे विज्ञान म्हणते!!!!!!!

पण आम्हाला पामरांना विचारतोच कोण ?की बाबा तुला काय होतय.मगाशी तू चांगला बोलत होता आता तुला काय झालं ?ह्याचा मुड लगेच कसा बदलतो रे ?मगाशी म्हणत होता चला सुरफाट्या खेळू अन् आता घरी जातो म्हणतोय....असा हिरमोड का करतोय हल्ली ?अरे हा गेल्यावर्षी खेड्यातील लेझीम संघातल्या म्हातार्या माणसां सोबत गणपती विसर्जन मिरवणुकीत लेझीम खेळला. पण आजकाल हा असा का वागतोय कळत नाही. काहीही म्हणल तरी आता त्याचा ना चा पाडा असतो.नको रे आता नको वाटतं,शरीर साथ देत नाही, नंतर अंग फार दुखतं रे.हे यांचे अलीकडे म्हणजे पन्नाशीच्या उंबरठ्यावर ऐकायला येत आहे.

पन्नाशीच्या वेळेस नेमकं आपणास कोणी जाणूनच घेत नाहीत. कारण आपली जेव्हा पन्नाशी असते त्यावेळी प्रत्येक जण आपापल्या कामात दंग असतात. बायको तिच्या नोकरी, घरकाम, मुलं त्याच कॉलेज ,नोकरी वगैरे मध्ये. मुलं मुलांच्या "परेशानीमध्ये" त्याचे आईवडील त्यांच्या पूजाअर्चा, कथा,यात गुंतलेले असतात. समजून घेणारी ती




एकमेव असते पण तिच्या मेनोपॉज मधून तिचे डोके वर निघत नसते मग आपल्या मेनोपॉजचा विचार ती कुठून करणार ? तशी तीच एकमेव साथसंगत करणारी साथी असते. पण हे दोघांच्या समजण्या पलीकडील असते. त्यामुळे विचारपूस होईलच असे नाही. तसेच घराचा खरा कार्यकर्ता तोच एकमेव असतो त्यामुळे त्यालाही सर्व आघाडीवर लढायचे असल्याने मेनोपॉज त्यालाही कळत नाही. तेव्हा ख-या मित्रांनीच साथ खंबीरपणे दिली तर मे नो पाँज होऊ शकेल.

मित्रांनो तुम्हाला थ्री इडियटस् मधील वाक्य आठवतय का पहा"ये दिल हैं ना उसे उल्लू बना के रखो" किंवा मुन्नाभाई एम्.बी.बी.एस्.त्यात ही असच एक वाक्य नेहमीच तो म्हणत असतो."टेंशन नही लेनेका" तसच आपण ही हे असच म्हणत म्हणत पंचेचाळीशी नंतर आपला जोम कायम ठेवला पाहिजे. मनातून स्वतःच उभारलं पाहिजे.मन जसं पन्नाशीच्या अगोदर खंबीर ठेवत होतो तसच ठेवल पाहिजे. कोणतीही गोष्ट करावीशी वाटली तर कसलाही विचार न करता केलीच पाहिजे. तरच हे जे काही "टेस्टोस्टेरॉन" आहे ते संतुलित राहिल.म्हणजे आपले हार्मोन्स योग्य प्रकारे योगदान देतील आणि आपली उर्जा, जोम,ताकद, उत्साह, कायम पन्नाशी पुढेही टिकून राहिल. म्हणजेच आपलं मानसिक वय शारीरिक वयावर मात करेल. अन्यथा आपलीच माती होईल.

लोक काय म्हणतील याचा विचार करत बसून मन मारु नका. आता घर मुल सगळं व्यवस्थित आहे. त्याचा विचार मनातून काढून टाका. मन मोकळं करुन मस्त धुंदीत जगा. वाटलं बँडवर भन्नाट गाणं चालू आहे नाचाव वाटल तर खुशाल ब्रेक फेल गाडी व्हा आणि घूसा. जे बालपणीचे मित्र आहेत.. त्यांना घ्या बरोबर मस्त वाटेल तो आनंद घ्या. नाचताना, गाताना, हसताना, कुणी काय म्हणेल याचा विचार न करता मस्त ऐंजाँय करा. एका जाहिराती मध्ये वारंवार लघवीला जावं लागत म्हणून मित्रांसोबत भटकंतीला जायला टाळणार्या व्यक्तीस योग्य इनर वापरायला सांगून ते लाँग ड्राईव्हला घेऊन जातात आणि आनंद लुटतात. असं केलं म्हणजे आपली "टेस्टोस्टेरॉनची" पातळी धोक्याच्या पातळी ओलांडते की नाही तेच पहा.म्हणून वयाचा विचार टाळा."हर पल में हर हाल में खुशी" एवढच डोक्यात ठेवा. पराभूत विचार टाळा. सुरफाट्या खेळता नाही आल्या तरी निदान खेळतात तिथे आरडाओरडा तरी करु, दहीहंडीच्या वरच्या मजल्यावर जाऊ नका निदान खालच्या थराला मदतीचा हात तरी देऊ,लेझीम, तलवारबाजी, दाणपट्टा,लाठ्याकाठ्या,कबड्डी, हे जरी नाही खेळू वाटले तरी तिथ जाऊन अर्धा तासा ऐवजी दहा मिनिटे तरी प्रदर्शन करु.मन जोमात ठेऊ.म्हणूनच आपण आपल्या पुरुषी मेनोपॉजला ( यू मे से नो मेनोपॉज ) म्हणूयात.

दत्ता तरलगट्टी सर, पंढरपूर

# आदिवासींच्या वाट्याला

आधुनिक केसरी

**जगाच्या मालकाचा दिवस ९ ऑगस्ट रोजी (जागतिक आदिवासी दिन) साजरा करण्यात येत आहे. परंतु खरंच आदीवासी समाज सुखी, समाधानी आहे आहे का ? हा मोठा प्रश्न पडत आहे. २०२२ ला भारतीय स्वातंत्र्याला ७५ वर्ष पूर्ण झाली असली तरी, त्याला राजकीय, सामाजिक, भावनिक,मानसिक, वैयक्तिक असे अनेक पैलू आहेत. त्याबरोबरच ते नेमकं पुन्हा कुणाच्या वाट्याला किती आणि कसं येतं? म्हणजे स्त्रिया ,दलित, अल्पसंख्याक, आदिवासी हा एक वेगळाच विषय आहे. या शिवाय स्वातंत्र्य म्हणजे नेमकं कशात बदल झालेत? हेही बघावं लागतं. कॉलेजमध्ये असताना अल्पसंख्यांक, आदिवासी, त्यांची पाडे, त्यांची संस्कृती, त्यांचे सणवार या सगळ्यांबद्दल खूप उत्सुकता होती. स्वातंत्र्यानंतर त्यांच्यासाठी व मागासलेपणाच्या निवारणासाठी जे घटनादत्त प्रयत्न झाले ते निश्चित झाले. पण याचा अर्थ आदिवासींना सर्वंकष स्वातंत्र्य मिळालं असं नाही.**

सामाजिक स्वातंत्र्याच्या लढ्याला मात्र फक्त सुरुवात झाली असली तरी अजूनही बहुतेक साधने आणि विकासासाठी असणाऱ्या वरवरच्या सोयी सवलती त्यांच्यापर्यंत पोहोचत आहेत किंवा नाही लोकशाही मधील विचार, आचार स्वातंत्र्य दिसत असले, तरी एका मोठ्या समूहाची अदृश्य नियंत्रण शक्ती त्यावर राज्य करतच असते हे देखील एक वास्तव आहे.

खरं तर या समाजाची स्वतंत्राची कल्पनाच वेगळी. नागरी जीवनापासून दूर असलेल्या राना – वनातल्या या लोकांना मुळात स्वातंत्र्य होते. ते स्वतःचे निर्णय स्वतः घेत होते. उलट स्वातंत्र्यानंतर त्यामध्ये राज्यसत्तेचा हस्तक्षेप आला. मूळ प्रवाहात सामील करून घेत असताना त्यांच्या मुळातल्या स्वतंत्र जीवनशैलीचा विचार झालाच नाही. जे त्यांच्यासाठी काही करतात किंवा धोरण आखतात त्यांना आदिवासींच्या मुळातल्या प्रश्नांची जाणीव असेलच असे नाही. पेसा कायद्याची निर्मिती करण्यात आली पण त्याची देखील योग्य वेळेत आणि योग्य प्रकाराने अंमलबजावणी झाली नाही त्यामुळे आदिवासी अजूनही दुर्लक्षितच आहे.

नव्वदच्या दशकात झालेल्या जागतिकीकरणाने आधुनिकतेच्या नावाखाली आदिवासींची स्वतंत्र ओळख, संस्कृतिक वेगळेपण पुसले जाते आहे. मोबाईल टीव्ही इंटरनेटलाच विकास म्हणत आज छोट्या छोट्या पाडांमध्ये डिस्क अँटीने , आणि हातात स्मार्टफोन देखील दिसतात. हे जीन्स घातलेल्या आणि मोबाईल मध्ये रमलेल्या तरुणाईला अजूनही कळत नाही की ही केवळ समृद्धतेची सूज आहे. संयुक्त राष्ट्रसंघाने जागतिक मूलनिवासी वर्ष जाहीर करून, जगातील सर्व देशांनी आपापल्या देशांच्या संविधानामध्ये आदिवासींना मूलनिवासी असे नामकरण करून संयुक्त राष्ट्रसंघाच्या मानवाधिकार जाहीरनामा मध्ये समाविष्ट केले. परंतु भारताने मात्र



इथल्या आदिवासींना असे वाक्य व्याख्या बद्दल केलेले नाही त्यामुळे आपोआपच आदिवासींच्या मानवी अधिकाराच्या संरक्षण आणि संवर्धन आतून सुटका झाली कि काय यात शंका मात्र नक्की येते. खरं तर सर्वोच्च न्यायालयाने देखील असे स्पष्ट म्हटले आहे की आदिवासी हेच इथले मूलनिवासी आहे. सरकारने पावले यासाठी उचलायला हवी. पण सरकार याबाबत उदासीन आहे. आपल्या प्रश्नाचे मूळ नेमके कुठे आहे आणि त्यासाठी आपल्याला काय करायला पाहिजे हेच आपल्या आदिवासींना समजत नाही आणि ते प्रस्थापित लोकांकडून समजूही दिले जात नाही. गेली कित्येक वर्ष हा समाज जनजीवनापासून शहरांपासून एकाकी जीवन जगतो आहे. जंगलांमध्ये पाड्यांमध्ये त्याने आपलें विश्व उभं केलं आहे. कलाविश्व आणि जगण्याचे नवे तत्त्वज्ञान उभारले आहेत. श्रम ,समूह व सहकार या तीन तत्वांच्या आधारावर त्यांचे जग चालतं. या दुनियेत एकेकाळी वर्णव्यवस्था जातिव्यवस्था नव्हती ते केवळ निसर्गाचे पूजक होते.

ब्रिटिश सरकारने भारतात पाय रोवले,तेव्हा त्यांच्या बरोबर आलेल्या ख्रिस्ती मिशनऱ्यांनी भूतदयावादी दृष्टिकोनातून आदिवासींचे सेवाकार्य तर केलेच, पण त्यांचा उद्देश हा धर्माचा प्रचारचा होता. त्यामुळे त्यांनी बहुसंख्य आदिवासींचे धर्मांतर घडवून आणले. युरोपीय वसाहतवाद यांनी नैसर्गिक साधन संपत्ती साठी आदिवासींवर अन्याय अत्याचार सुरू केले. त्यामुळे आदिवासींच्या जीवन पूर्णपणे ढवळून निघालं आणि त्यांच्या ब्रिटिशांविरोधात असंतोष वाढू लागला त्यातूनच तंत्या भिल, खाज्या नाईक, राणी दुर्गावती यासारख्या आदिवासी क्रांतिकारक जन्माला आले आणि त्यांनी इंग्रज सरकारला जेरीस आणले. त्यामुळे सरकार खडबडून जागे झाले आणि आदिवासींना न्याय आणि संरक्षण मिळावे म्हणून वेगवेगळे कायदे केले, विकास योजना सुरू केल्या आणि आदिवासींच्या पारंपरिक लोकसाहित्याचे संकलन देखील करून ते उजडात आणले.

राज्यघटनेतील आरक्षण आणि संरक्षणामुळे स्वातंत्र्योत्तर काळामध्ये आदिवासी विकासाला चालना मिळत असली, तरी शिक्षण रोजगार आरोग्य यासारख्या मूलभूत सुविधा त्यांच्यापर्यंत नीटपणे पोहोचलेल्या नाही. आदिवासी आश्रमशाळेतून मिळणाऱ्या शिक्षणाचा दर्जा कसा ते सांगायला नको, व आदिवासी वस्तीगृह आणि आश्रम शाळा ही आदिवासी मुला मुलींच्या शिक्षणाची केंद्रे बनलेली आहे. आजही पाड्यावर कुणी आजारी पडलं किंवा एखाद्या गरोदर बाईला कळा सुरू झाल्या तर झोळी करून तीन चार किलोमीटर असलेल्या आरोग्य केंद्रात घेऊन जावंच लागतं. तालुक्यापासून चाळीस पन्नास किलोमीटर अंतराच्या आदिवासीबहुल गावांमध्ये पावसाळ्याचे चार महिने आणि पुढचे तीन महिने अतिशय दैन्यावस्था असते.

नाईलाजाने जर गावी जाण्याची वेळ आली तर 2-2 जण लाकडाचा डोंगा बनवून जीव धोक्यात घालून नदी पार करतात. इथल्या लोकांचा पावसाळ्यात जगाशी संपर्क तुटल्यानंतर कोण जगतो कोण मरतो याची जगाला खबर लागत नाही असं अनेकदा झालं आहे आणि होत आहे. दुर्दैव आणि वाईट या गोष्टींचा वाटतं कि हे कटू आणि दुर्लक्षित वास्तव जगासमोर येतच नाही. शहरी जीवन, तिथला आनंद ,तिथले सण-उत्सव उपोषण, आंदोलन, हे हे सर्व दाखवणे सोशल मीडियाला महत्वाचे वाटते, त्याला गरज नसताना अतिरेकी प्रसिद्धीही दिली जाते. पण अतिशय दुर्गम अशा ठिकाणी, भयावह जीवन जगत असणाऱ्या या आदिवासी समाजाला मात्र पूर्णत दुर्लक्ष केले जाते, ही खेदाची गोष्ट आहे यावर विचार व्हायलाच हवा.

प्रा.भगवान केशव गावित, ९३०७००५४३१

# ना.धों. महानोर यांच्या कवितेतील माहेरचे वर्णन



प्रा .सौ. शारदा वानखेडे
संपर्क क्र. 9823066606

आधुनिक केसरी

**निसर्ग कवी ,ग्रामीण कवी व ज्यांच्या कवितेला रानातल्या मातीचा गंध येतो. ते कविवर्य ना. धों महानोर यांचे पूर्ण नाव नामदेव धोंडो महानोर, जन्म १६ सप्टेंबर १९४२ औरंगाबाद जिल्ह्यातील पळसखेड येथे झाला. अनेक पुस्तके व पुरस्कारांचे मानकरी,व औदुंबर साहित्य संमेलनाचे अध्यक्ष असलेल्या महानोर यांचा ' तिची कहाणी 'हा काव्यसंग्रह वाचत असताना एक पुरुष असून सुद्धा स्त्रियांच्या जीवनाचे हळुवार पैलू त्यांनी शब्दबद्ध केल्याचे दिसते. या कवितेत स्त्री व तिचे भावविश्व कवीने रेखाटले आहे. माहेर हा स्त्रीच्या जिव्हाळ्याचा विषय परंतु कौटुंबिक अत्याचार, कोवळ्या वयात अनेक बाळंतपणे, घटस्पोटीता व अकाली वैधव्य आलेल्या स्त्रियांसाठी माहेर कसे असते याचेही वर्णन कवीने केले आहे. या कविता गद्य सदृश्य आहेत.**

वंशाला दिवा हवा म्हणून अनेक बाळंतपणं जेंव्हा एखाद्या स्त्रीवर लादले जातात तेंव्हा तिला बाळंतपणासाठी माहेरी आल्यानंतर तिच्यासाठी माहेर कसं असतं ? हे कवी पुढील ओळीतून सांगतात.

ऐन पंचविशित म्हातारपण सोसताना...
तिचं भरल्या संसारात मन जळून जाताना...
कुठे शब्दही बोलण्याचा तिला अधिकार नाही
प्रत्येक गर्भारपणात माहेरच्या आठवणी ती जळून जाई...

माहेर जरी असलं तरीही तिथे पहिल्या एक- दोन बाळंतपणाचे कोड कौतुक केलं जातं, परंतु मुलगाच हवा म्हणून जर सात -आठ वेळा बाळंतपणं होत असतील तर माहेरातही त्या बाळंतपणाचे कौतुक नसतं. तिला तिथेही अवहेलना सोसावी लागते. सासरचे लोकही मुलगा नाही म्हणून तिला शिव्या शाप देतात. माहेरचेही तिच्या बाळंतपणाला कंटाळतात.

एखादा व्यसनी नवरा जेव्हा स्त्रीला खूप मारझोड करतो, त्रास देतो व माहेरी ही कोणी उरलेलं नसतं तेंव्हा तिच्या मनाची अवस्था काय असते ती पुढील ओळीतून कवीने व्यक्त केली आहे.

माहेरी कोणीही उरलेलं नाही माझे मायबाप तुम्हीच.
बापहो तुम्हीच सांगा मी कोणत्या रस्त्यावर राहू ?
घरदार असून घर पाठीशी लागलेलं कुठल्या काळातलं पाप माझ्या नशिबी आलेलं...

माहेरच हक्काचं कुणी नसल्यामुळे ती स्त्री गावातील लोकांपुढे हंबरडा फोडून मी कुठे राहू ? हा प्रश्न विचारते तिच्या अंग अंगावर नवऱ्याने मारलेल्या खुणा त्याचे व्रण दिसतात. त्याचेही वर्णन कवीने केले आहे. पुढे लग्न होऊन सासरी गेल्यानंतर बऱ्याच वर्षांनी माहेरी आलेल्या स्त्रीच्या मनाची अवस्था कवीने व्यक्त केली आहे.

लग्न होऊन जाताना... पुन्हा माहेरी येताना
गणमन भवरी, उध्वस्त गढीच्या शेजारी.
इतक्या वर्सांनी... वळू नयेत पाय किती वर्ष लोटली तरीही.... डोळ्यांवर पिवळी कावीळ अजूनही पसरलेली

' गरिबाघरची लेक' या कवितेत कवी म्हणतात.

माहेरच्या गरिबीत लगटून राहिलेलं.
तिच्या शब्दांचं मुकेपण...
भयभीत तिला कधी सांगताच आलं नाही

गरिबाघरची लेक जेंव्हा मोठ्याच्या घरी सून म्हणून जाते. तेंव्हा तिचा वारंवार अपमान केला जातो. माहेरच्या लोकांचा उद्धार केला जातो. परंतु माहेरी गरिबी असल्यामुळे ती हे सारे मुकाटपणे सहन करते. तिच्या भावना तिला कोणालाच सांगता येत नाहीत. कोवळ्या वयात वैधव्याचे दुःख जिच्या नशिबी येते. तिच्या विषयीचे वर्णन कवीने पुढील ओळीत केले आहे.

कुटुंबातल्या माणसांची रडारड केली.
तिची समजूत घातली. भरल्या डोळ्यांनी. भरल्या डोळ्यांनी. तिला परोपरी विनवलं.
सासरला राहण्यासाठी. माहेरी न जाण्यासाठी.
अठरा वर्षाच्या दिरासोबत पुन्हा लग्न करण्यासाठी.
वटलेल्या संसारातून निघून गेलेल्या त्याच्या आठवणी डोळ्यात.

पंधरा वर्षांपूर्वी काडीमोड झालेल्या स्त्रीसाठी माहेर कसे आहे ?हे पुढील ओळींमध्ये कवी व्यक्त करतात.

पंधरा वर्षांपूर्वीच तिचा काडीमोड झालेला. आता नजीकच्या खेड्यात एकटीच राहते.
कोणीच न्याय निवाडा केला नाही गावात...
माहेरी ती दिवस-रात्र... काबाडकष्ट करते झोपड्यात.

बऱ्याच वर्षानंतर माहेरी आलेल्या स्त्रीचे वर्णन करताना कवी म्हणतात,

ती सुखरूप तिच्या संसारात.
दूरच्या प्रदेशात. दुसऱ्यांदा माहेरी आलेली चाळीस वर्षात. बदलून गेलेला गावचा चेहरा
तिला ओळखताही येत नाही तिच्या सत्तर वर्षाच्या डोळ्यांनी माहेरचं गणगोतही तिला नीट ओळखता आलं नाही _सगळं बदलून गेलेलं.


बऱ्याच वर्षांनी माहेरी आल्यावर माहेरी झालेले बदल पाहून तिला तिचे गणगोत ही नीट ओळखता येत नाही.

गोकुळासारखं नांदणारे माहेरचे जुनं घर व शेणानं सारवलेलं तुळशी वृंदावन
आता सारं काही बदललेलं दिसतं.

माहेरातल्या अनेक आठवणी विषयी कवी म्हणतात,

तिचं लदबदलं माहेरपण हजार गोष्टींचं.

माहेरच्या अनेक आठवणीने जणू तिच्या अंगावर दरवळता रुणझुणता माहेराचा वारा येतो. आपल्या आईच्या अनेक आठवणी कवी सांगताना दिसतात. गरीब परिस्थितीमुळे आईला स्वतःसाठी कधी नवीन चोळी लुगडं घेता आलं नाही. हे सांगताना कवी म्हणतात,



तुझ्या चोळी लुगड्याला गाठी बांधल्या कितीक
नव घालताना आम्हां साऱ्या जगाचं कौतिक

आईने सारे दुःख मुकपणाने सोसले तिच्याविषयी कवी म्हणतात,

कुठे शिकली गं माये, दुःख सोसण्याच्या वेणा साऱ्यांसाठी हासण्याचा पुन्हा खोटाच बहाणा.

कधी चिडलेल्या आईने आपल्याला खूप मारलं परंतु नंतर तिलाच आपली माया आली. तिचा जीव कासावीस झाला हे कवी पुढील ओळीतून कवी सांगतात,

किती बदडले मला वळ अजून पाठीला
पुन्हा लपेटून तुझा जीव कासावीस झाला.
सारे झोपले तरीहि राती चुलीला पोतरा
निजताना गोंजारून पदरानं घाली वारा.

सासरी गेलेल्या लेकींच्या आठवणी सांगणाऱ्या आईच्या भावना कवितेतून कवीने व्यक्त केल्या आहेत.

लेकी गेल्या दूर देशी जशा चिमण्या आकाशी
त्यांचं नांदणारं घर तरी येते माहेराशी

आपल्या दूर गेलेल्या आईशी हितगुज करताना कवी म्हणतात,

किती दिस आले गेले मीहि थकलो गं आई
माझ्या दुःखाचे गाठोडे तुला सांगणार नाही

आईच्या शेवटच्या क्षणी आईला आपल्याला काही बोलायचे होते व आपल्यालाही आईशी काही बोलायचे होते ते तसेच राहून गेले या भावना ही कविने व्यक्त केल्या आहेत.

निघताना दूर देशी अखेरच्या भेटीगाठी
तुझे पानावले डोळे लपेटून ओटीपोटी
किती सांगायचे होते शब्द थांबले ओठाशी
साऱ्या चिडी पाखरांचे घर तुझ्या खाटीपाशी

आईच्या लुगड्याच्या गोधडीचा स्पर्श कवीला खूप हवाहवासा वाटतो. ते म्हणतात,

तुझ्या जुन्या लुगड्याच्या गोधडीचा परिमळ आणि देव्हाऱ्यासारखं तुझं आयुष्य निर्मळ तुझी शेतीबाडी, झाडी लक्ष पाखरांचा थवा जिवाभावाच्या नात्याचा माझा खरा गोतावळा.

आई निघून गेली तिच्या अनेक आठवणी कवीने कवितेतून व्यक्त केल्या आहेत. त्यांना जिवाभावाच्या नात्यांचा गोतावळा हवा आहे. अशाप्रकारे आपल्या 'तिची कहाणी' या संग्रहात कवीने प्रत्येक स्त्रीसाठी माहेर कसे आहे याचे वर्णन केलेले आहे. त्यांची ही कविता म्हणजे स्त्री जीवनाचे त्यांनी केलेले सूक्ष्म निरीक्षणच आहे.

निसर्गाच्या सानिध्यात राहून काव्य लेखन करणाऱ्या, या निसर्ग कवींने ३ एप्रिल २०२३ रोजी पुणे येथे अखेरचा श्वास घेतला.. त्यांच्या लेखणीस व निसर्गप्रेमास माझे शतशः नमन...

# कुणाला मेंदू गुलाम ठेवू नको । कुणाचा अंधभक्त होऊ नको ।।

आधुनिक केसरी

**आज आपल्याला काही हेतू पुरस्कर राजकारणात धर्मकारणात समाजकारणात पंथात संप्रदायात जातीपतीच्या विळख्यात अडकवल्या जात आहे. चुकीचा इतिहास चुकीचे विचार समोर ठेवून दंगली घडवण्यासाठी आपला वापर होत आहे.आपल्या नवतरुणांना जाती धर्माच्या नावावर पेटवण्याचा प्रयत्न चालू आहे. संतमहापुरुषांवर टीका करून त्यांच्यासमोर इतिहासाचे खोटंनाट करून त्यांच्यासमोर चुकीचा धर्म ठेवून त्यांच्या स्वार्थासाठी इथल्या काही स्वतःला धर्मकारणीं म्हणवणाऱ्यां टिळे टोपी माळा घालणाऱ्या जटाधारी ढोंगी साधूनीं स्वार्थी राजकीय पुढाऱ्यांनी आपल्या स्वार्थाची पोळी भाजण्यासाठी आपल्या तरुण पिढीचा वेगवेगळ्या पद्धतीने उपयोग करून त्यांना दिशाहीन करण्याचं काम चालू आहे.**

मित्रांनो ! आपल्या देशाच्या इतिहासाचे जर बारकाईने सूक्ष्म निरीक्षण केल्यास आढळून येईल की या देशाला सर्वात हानी बाहेरील शत्रू पेक्षा या देशाला जातपातधर्म यांना समोर करून या देशाला आतून पोखणाऱ्यां किड्यांनीच पोहचवली आहे. स्वातंत्र्याच्या पूर्वी आणि स्वातंत्र्या नंतर सुद्धा या देशाला जात पंथ धर्म वंश याच्या वादाचाच जास्त सामना करावा लागला.अनेक वर्षे या देशाचे या मधेच बरबाद झाले आहे आणी होत सुद्धा आहेत. परंतु समोरच्या येणाऱ्या भयानक काळाचा विचार केला तर त्यामधून वाचण्यासाठी आपल्याला या गोष्टी आधी संपून टाकाव्या लागतील. नाहीतर समोर याच गोष्टी ज्वालामुखीच रूप घेऊन आपल्या खाक करतीलत अशी वेळ येईल. ती वेळ तेव्हा जात पात धर्म पाहणार नाही सर्वांना नष्ट करेल आपण कोरोनाच्या संकटावरुन काही भविष्याचा अंदाज लावू शकतो. आज वेळ आहे आपण सर्वांनी समजून घेण्याची .हा भारत देश यामध्ये राहणाऱ्या सर्व धर्म पंथ संप्रदायाच्या लोकांचा आहे.सर्वांनी या वर वाद न करता धर्म पंथ बाजूला ठेवून देशासाठी झटले पाहिजे.




आज धर्माचा धंदा करणाऱ्यांनी संप्रदायांच्या नावावर जगणाऱ्या बुवापंडितांनी आणि जातीच्या नावावर मत मागून आपला स्वार्थ साधणाऱ्यांनी जमेल त्याप्रकारे धर्म जात पंथ समोर करून आपले पातर त्यांनी साधून घेतले आहे.स्वतःच्या भल्यासाठी धर्मपंथाच्या सहाय्याने इथल्या साध्याभोळ्या जनतेला गोवून त्यावर वाद पेटवले आहेत. देवाधिकांचे,संतमहापुरुषाचे नाव घेवून इथल्या एकजुटीने राहणाऱ्या समाजात तेढ निर्माण केले आहे.इथल्या स्वतःला समाजसुधाकर, नेते ,पुढारी, धर्मपंडित बुवामहाराज यांनी धर्मचा पंथाचा पक्षाचा संप्रदायाचा जातीपातीचा उपयोग या देशाच्या भल्यासाठी नाहीतर स्वतःचे पोट भरण्यासाठी धर्मचा पंथाचा पक्षाचा संप्रदायाचा वापर केला आहे.हेच आपल्या सर्वसामान्य माणसाला समजून घेण्याची गरज आहे.

आज पर्यंत या पोटभऱ्या लोकांनी संतांना महापुरुषांना, देशाच्या निवडणुकांमध्ये तसेच प्रत्येक ठिकाणी धर्म पंथ जात पक्ष जोडन्याचे काम करून त्यासाठी आपल्या उपयोग वारंवार करण्यात आला आहे.म्हणून आपण स्वतंत्र देशाचे नागरिक आहोत हे लक्षात घेवून गुलामांन सारख्या आपला कोणी आपला वापर नाही केल्या पाहिजे यासाठी सतर्क राहा यावर माझ्या दोन ओळी वाचा आणी समजून सुद्धा घ्या

**कुणाला मेंदू गुलाम ठेवू नको**
**कुणाचा अंधभक्त होऊ नको**
**भगतसिंगाच्या देशात राहत तू**
**आझाद आहे विसरू नको**

आज आपल्या आपला माथा जागृत ठेवून विचार करण्याची गरज आहे. धर्म जात पंथ ताटात वाढले तर आपले पोट भरणार नाही. दंगलीत गुन्हे दाखल झाले तर हे घडवणारे सोडवायला येणार नाहीत. आपल्या सुखादुखात हे दोनपैसे आपल्याला देणार नाही. म्हणून विचार करा वैयक्तिक व्यवसाया कडे लक्ष द्या. धर्म जातपात हे बंधने तोडून टाका जन्मता सर्व माणसे सारखे माणूस म्हणून सर्वांशी चांगला व्यवहार करा

माझ्या मित्रांनो आता जागृत व्हा. कुणाचे सांगणे बोलणे हे सत्य समजू नका. धर्माचा अभ्यास करा इतिहास वाचा. मग आपले मत ठरवा . कुणाचे ही समर्थन करण्याआधी विचार करा. दंगलीत सहभागी होऊ नका. गुन्हेगारांच्या यादीत येवू नका. आपले वैयक्तिक संबंध टिकवा. कोणाचेही कार्यकर्ते होण्याआधी आपल्या घरचे चांगले कर्तेधर्ते व्हा. विचार करा. धर्मवर्मे एकच असती । परी हे राजकारण त्यात गोवती । संख्याबल वाढवोनी करती ।परस्परांचा वैरभाव ।ग्रामगीता ।।

**महेंद्रा सावके, मो. ९६०४६८०६८३**

# राहुल गांधी यांच्या दिलाशाने राजकीय समीकरणे बदलणार



डॉ. सुधीर अग्रवाल
संपर्क क्र. 9561594306

आधुनिक केसरी

**काँग्रेस नेते राहुल गांधी यांना सर्वोच्च न्यायालयाकडून सर्वात मोठी लाइफलाइन मिळाली आहे. मोदी आडनाव प्रकरणात न्यायालयाने सुनावणी पूर्ण होईपर्यंत राहुल गांधींच्या शिक्षेला स्थगिती दिली जाईल, असे स्पष्ट केले आहे. या एका निर्णयाचे काँग्रेससाठी अनेक अर्थ आहेत. एकीकडे राहुल गांधी पुन्हा एकदा खासदार झाले आहेत तर दुसरीकडे २०२४ च्या लढाईत काँग्रेसला मोठा राजकीय बूस्टर मिळाला आहे.एका निर्णयाने अनेक समीकरणे बदलली. आता सर्वोच्च न्यायालयाच्या या निर्णयाला राजकीय दृष्टिकोनातून समजून घेणे अत्यंत आवश्यक आहे. सध्या लोकसभा निवडणुका तोंडावर आल्या आहेत, एकीकडे एनडीए एकजूट करून आपली ताकद दाखवत आहे.**

तर दुसरीकडे भारत आघाडीने पाटणा आणि बेंगळुरूमध्ये सभा घेऊन आपली ताकद दाखवून दिली आहे. पण सध्या राहुल गांधी पंतप्रधानपदाच्या शर्यतीतून बाहेर पडल्यामुळे काँग्रेसची बार्गेनिंग पॉवर बरीच कमी झाली होती. मात्र आता सर्वोच्च न्यायालयाच्या या निर्णयानंतर अनेक समीकरणे पुन्हा बदलणार आहेत.

काँग्रेस हा सध्या भारतातील आघाडीतील सर्वात मोठा पक्ष आहे, परंतु राहुल गांधींना मोदी आडनाव प्रकरणात शिक्षा झाल्यामुळे, पक्ष आपल्या बाजूने कोणताही चेहरा उघडपणे पुढे करू शकला नाही. त्यांच्यासाठी राहुल गांधी हे सर्वात मोठे स्टार प्रचारक होते, पण एका खात्रीमुळे पक्षाला इतर विरोधी पक्षांपुढे नमते घ्यावे लागले. मात्र आता पुन्हा एकदा काँग्रेस मजबूत झाली असून, राहुल गांधींच्या शिक्षेवर घातलेल्या बंदीचा थेट फायदा देशातील सर्वात जुन्या पक्षाला होणार आहे. **भारत जोडो यात्रेनंतर राहुल कसा बदलला ?**

भारत जोडो यात्रेपासून राहुल गांधींनी आपली प्रतिमा पूर्णपणे बदलल्याचे बोलले जात होते. ज्या प्रकारे त्यांनी देशाच्या दक्षिणेपासून उत्तरेपर्यंत, पूर्वेपासून पश्चिमेपर्यंत अनेक राज्ये व्यापली, त्यामुळे त्यांची लोकप्रियता वाढली. याच लोकप्रियतेच्या जोरावर पक्षाने कर्नाटक निवडणुकीत दणदणीत विजय नोंदवला. आता त्या भेटीचा आणखी फायदा उठवण्याआधीच राहुल यांना त्यांच्या कारकिर्दीतील सर्वात मोठा धक्का मोदी आडनावाच्या बाबतीत बसला. अशा धक्क्याने त्यांची खासदारकी हिसकावून घेतली आणि ते थेट पंतप्रधानपदाच्या शर्यतीतून बाहेर पडले.

तोपर्यंत राहुल खासदार नसल्यामुळे काँग्रेसकडे इतर विरोधी पक्षांसमोर दाखवण्यासारखे फारसे काही नव्हते. विरोधी पक्षांच्या एकजुटीच्या झालेल्या दोन बैठकांमध्ये आपण एकत्र निवडणुका लढवू, समान अजेंडा असेल अशीच चर्चा झाली. पण मोदी विरुद्ध कोण या सर्वात मोठ्या प्रश्नाचे उत्तर कोणीही देऊ शकले नाही. आता इथेच सारा खेळ बदलणार आहे. आता काँग्रेस राहुल गांधींना पंतप्रधानपदाचे उमेदवार म्हणून उघडपणे प्रोजेक्ट करू शकते. विरोधी पक्षातील अन्य नेते हे मान्य करतील की नाही, असा प्रश्न उपस्थित होत आहे.

आता प्रसारमाध्यमांसमोर भारत आघाडीचे अनेक बडे चेहरेही राहुलच्या शिक्षेवर बंदी आणण्याचे स्वागत करतील, जर ते जास्त असेल तर काही ट्विटरपण ट्विट करूनही अभिनंदन करण्याचे काम करणार. पण राजकारणात प्रत्येक निर्णय महत्त्वाचा असतो. या निर्णयाचेही असे परिणाम आहेत जे सध्या विरोधी पक्षाच्या नेत्यांना आवडणार नाहीत. भारत आघाडी परिवारातील पंतप्रधानपदाच्या शर्यतीत राहुल गांधींशिवाय कोणत्या नेत्यांचा विचार केला जात होता ?

त्या यादीत राहुल गांधींशिवाय पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री ममता बॅनर्जी, बिहारचे मुख्यमंत्री नितीश कुमार, दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल, राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार या नेत्यांना सर्वात महत्त्वाचे मानले जात होते. हे असे नेते होते ज्यांना भारत आघाडीचे सर्वात मोठे चेहरे म्हटले जात होते. राहुल यांच्या अनुपस्थितीत यातील कोणत्याही नेत्याला 'मोठी जबाबदारी' दिली जाऊ शकते. पण आता राहुल गांधी परतले आहेत, त्या स्थितीत या सर्व नेत्यांची आहेजपलेल्या स्वप्नांचाही चुराडा झाला आहे.

**नितीशची भंगलेली स्वप्ने**

बिहारचे मुख्यमंत्री नितीशकुमार यांची महत्त्वाकांक्षा



मोठी आहे. नितीश देशाचे पुढचे पंतप्रधान व्हावेत, अशी इच्छा जेडीयूच्या सर्व नेत्यांनी आधीच व्यक्त केली आहे. बिहारमध्ये ज्याप्रकारे पोस्टर्स लावले जातात आणि आपला दावा मजबूत करण्याचा प्रयत्न केला जातो, त्यावरून नितीश विरोधकांचे नेतृत्व करण्यात मागे राहू इच्छित नाहीत, हे स्पष्ट होते. याच कारणामुळे जेव्हा संपूर्ण विरोधकांना एकत्र करण्याचा प्रसंग आला तेव्हा आधी सर्व मोठ्या नेत्यांना भेटण्याचे काम नितीश यांनी केले. त्यानंतर पाटण्यात पहिली बैठकही त्यांच्या नेतृत्वाखाली झाली. नितीश आघाडीतून आघाडीवर असल्याचा संदेश नक्कीच दिला गेला. याशिवाय, नंतर नितीश तेजस्वीला सीएम पद देऊन दिल्लीला रवाना होतील, अशा बातम्याही आल्या होत्या.

राहुल गांधींच्या शिक्षेवर 'सर्वोच्च' स्थगिती आल्याने नाराज काँग्रेसजन, अशी टिप्पणी करत आहेत

पण आता नितीशच्या त्या नॅरेटिव्हचा चांगलाच फटका बसला आहे. राहुल गांधींच्या पुनरागमनाने नितीश यांचा दावा खूपच कमकुवत झाला आहे. काँग्रेस राहुलशिवाय दुसरा चेहरा कोणत्याही किंमतीवर स्वीकारू शकत नाही. काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी राहुल किंवा काँग्रेसला पंतप्रधानपदाचे उमेदवार बनण्याची इच्छा नाही, असे म्हणणे आवश्यक आहे, पण राजकीय समीकरणे असल्याने साहजिकच राहुल यांचा दावा अधिक भक्कम आहे.

**ममतांचा दिल्लीचा रस्ता अवघड**

आता नितीश यांना धक्का बसला आहे, त्यामुळे ममता बॅनर्जी यांच्यासाठीही ही चांगली बातमी नाही. जोपर्यंत राहुल गांधी शर्यतीतून बाहेर होते, तोपर्यंत ममता यांची प्रतिमा अशी होती की त्या भाजपविरोधात सर्वात आक्रमक मानल्या जात होत्या. बंगालमध्ये त्यांनी भाजपला ज्या प्रकारे दारुण पराभव दिला होता, त्यामुळे त्यांच्या दाव्याला बळ मिळाले. वरती, त्या तळागाळातील नेत्या असल्यामुळे, आंदोलक अशी त्यांची प्रतिमा होती, त्यामुळे विरोधी गोटातही ममता यांची स्वीकारार्हता वाढली. मोदींच्या विरोधात ममता हा तगडा चेहरा असल्याचे मानले जात होते. त्यांनाही सर्वात मोठे आव्हान फक्त राहुल गांधी यांच्याकडूनच पेलावे लागले. पण तो बाद झाल्यापासून ममताचा दावा वेगाने पुढे सरकत होता. मात्र आता त्याला पूर्णविराम मिळाला आहे.

**पवार पुन्हा मागच्या सीटवर सरकले**

ममतांप्रमाणेच दिल्लीतही थोडेफार पोहोचण्याची आशा बाळगणाऱ्या राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार यांना मोठा धक्का बसला आहे. पाच दशकांपासून राजकारणात असलेले पवार अनेक प्रसंगी पंतप्रधान होण्याच्या अगदी जवळ होते. मात्र प्रत्येक वेळी संधी हुकल्याने त्यांचे राजकारण केवळ महाराष्ट्रापुरतेच मर्यादित राहिले. यावेळी भाजपचा पराभव करण्यासाठी त्यांचे मार्गदर्शनही अत्यंत महत्त्वाचे मानले जात होते. मात्र राहुल पुन्हा सक्रिय झाल्याने त्यांचे काम केवळ मार्ग दाखवण्यापुरते मर्यादित राहू शकते.

**केजरीवाल यांना पर्याय ठरू शकणार नाही**

आता नितीश, ममता आणि पवार हे मोठे आणि अनुभवी नेते होते, पण काही वर्षांतच आपचे संयोजक अरविंद केजरीवाल यांनीही लोकप्रियतेची शिडी चढली आहे. आधी दिल्लीत आणि नंतर पंजाबमध्ये दोनवेळा प्रचंड बहुमताने सरकार स्थापन केलेमी काँग्रेसचीही पाळेमुळे उखडून टाकली. वर, पक्षाला काही काळापूर्वी राष्ट्रीय पक्षाचा दर्जाही मिळाला आहे. अशा स्थितीत अरविंद केजरीवाल यांची स्वीकारार्हता दिल्ली-पंजाबबाहेरही जाणवत आहे. त्यांची सामान्य माणसाची प्रतिमा लोकांमध्ये पसंत केली जाते, त्यांच्या अनेक योजनाही प्रसिद्धीच्या झोतात आल्या आहेत. पण या सर्व गुणांचा फायदा राहुल पंतप्रधानपदाच्या शर्यतीतून बाहेर होईपर्यंत होता. तोपर्यंत केजरीवाल स्वतःला पर्याय म्हणून पाहू शकत होते. पण राहुलच्या पुनरागमनाने त्यांच्यासाठीही पंतप्रधानांचे दरवाजे बंद केले आहेत.



# सुंदर नाते मैत्रीचे

आधुनिक केसरी

मैत्री पाहायला गेलं तर अगदी दोन अक्षरी शब्द पण या दोन अक्षरी शब्दात जगातील सर्वात पवित्र अशी भावना लपली आहे. जगातील सर्वात सुंदर नातं कोणतं असेल तर ते मैत्रीचं नातं, कारण या नात्यात कोणताही स्वार्थ नसतो. मैत्री कधीही ठरवून होत नाही. मैत्री कशी, कधी, कोणाशी होईल हे कोणीच सांगू शकत नाही. मैत्रीला काळाची, वेळेची, वयाची बंधने नसतात. मैत्रीत जात, धर्म, वर्ण, लिंग असा कोणताही भेदभाव नसतो. लहान मुलांपासून वृद्धांपर्यंत कोणाशीही मैत्री होऊ शकते. समान छंद, समान आवडी, समान विचारधारा आणि परस्परांचे स्वभाव जुळले की मैत्री जमते. रक्ताच्या नात्यापेक्षाही मैत्रीचे



श्याम बसप्पा ठाणेदार
संपर्क क्र. : ९९२२५४६२९५

नाते महत्वाचे आहे. जगात मित्र नाही असा कोणताच व्यक्ती नाही. भारतात तर पौराणिक काळापासून मैत्रीला महत्व आहे. श्रीकृष्ण सुदामा यांची तर मैत्री अजरामर आहे. काळ बदलला तरी मैत्रितील पवित्र भावना आजही तीच आहे. मैत्रीही प्रामाणिक आणि तरळ भावना आहे. मित्रा समोरच आपण आपलं मन मोकळं करू शकतो. मानवी जीवनात क्षणाक्षणाला काहीना काही घडत असते. काही चांगले काही वाईट घडत असते. या बऱ्या वाईट घटनांच्या अपरिहार्यतेचा विचार करता मैत्री आणि मित्र आवश्यक असतातच. मंदिरातील देवासमोर जसे आपण आपले मन मोकळे करतो तसेच आपण आपल्या खऱ्या मित्रजवळही आपले मन मोकळे करतो. आजकाल मैत्रीतही हिशोबीपणा आला आहे. मैत्रीतही स्वार्थ आला आहे. त्यामुळे मैत्रिची पवित्र भावना काळवंडू लागली आहे. स्वार्थाच्या अंधारात मैत्री चाचपडू लागली आहे त्यामुळे मैत्रीतून मिळणारा आनंदही कमी होऊ लागला आहे. स्वार्थी मित्र आपण सहज ओळखू शकतो. स्वतःच्या स्वार्थासाठी जवळ येणारे मित्र आपल्याला संकटकाळात मदत करत नाहीत. जो आपल्याला संकटकाळात मदत करतो तोच खरा मित्र असतो. जीवनाच्या प्रवासात अनेक मित्र भेटतात, निघून जातात पण मनाने जुळलेले मित्र मात्र कायम राहतात. मित्रांमुळे आपल्याला व्यवहार कळतो. अडचणी सुटतात, संकटावर मात करण्याचे धाडस निर्माण होते. मैत्रीमुळे आपली निर्णय क्षमता वाढते. इतकेच काय तर मैत्रीमुळेच माणूसकी जिवंत आहे असे म्हटल्यास वावगे ठरणार नाही. केवळ सहवास म्हणजे मैत्री नव्हे, सहवास आणि मैत्री यात फरक आहे. सहवासाने मैत्री फुलत जाते हे जरी खरे असले तरी मैत्रीसाठी मित्र दररोज जवळ असावाच असे काही नाही. अनेकदा जिवलग मित्र जवळ नसतात. कित्येक दिवस त्यांच्यात बातचीत होत नाही तरीही त्यांची मैत्री कायम असते अगदी श्रीकृष्ण सुदाम्या सारखी. पु .ल. देशपांडे यांनी मैत्री विषयी एक फार सुंदर कविता लिहिली आहे. ते लिहितात रोज आठवण व्हावी असे काही नाही. इतकंच काय रोज बोलणं व्हावं असंही काही नाही. पण मी तुला विसरणार नाही ही झाली खात्री आणि तुला याची जाणीव असणे ही झाली मैत्री. अशी सरळ सोपी पण घट्ट मैत्री टिकवणं, निर्माण करणं फार कठीण नाही आणि फार सोपंही नाही. मनाचा एवढा हळवेपणा नवरा बायकोच्या नात्यामध्ये नाही हो येत, तिथे मित्रच असावा लागतो. कारण इतर कोणत्याही नात्याला आपण नाव दिले की, त्याबरोबर कौटुंबिक, सामाजिक, मानसिक आणि शारीरिक बंधने येतात. या नात्याला मात्र कसले नाव नाही त्यामुळे कसली बंधनंही नाहीत किंबहुना ती तशी नसावीतही. मित्रांशी वाट्टेल त्या विषयावर आपण गप्पा मारू शकतो, मोकळे होऊ शकतो, तिथे स्त्री - पुरुष, जात - पात, वय काही आडवे येत नाही. मनसुबा बनून जातो आणि मन आनंदी होतं. शेवटी काय हो भेटी नाही झाल्या तरी गाठी बसणं महत्वाचं. ज्यांनी हे जाणलं त्यांनी माणसातलं माणूसपण जाणलं. पु ल नी मैत्री विषयी किती छान शब्दात लिहिलंय. मैत्री अशीच असते अगदी सुंदर. ज्याने मैत्रीचे सुंदर नाते जपले त्याचे जीवन आनंदाने फुलून गेले. मैत्रीसारखे सुंदर नाते या जगात दुसरे कोणतेही नाही, ज्याला मैत्री समजली त्याला जीवन समजले.



## एक तरी मित्र असावा...

एक तरी मित्र असावा
संकटकाळी साथ देणारा
आयुष्याच्या प्रत्येक टप्प्यावर
योग्य वाट दाखवणारा

उदास दिसलोच कधी तर
खळखळुन हसवणारा
व आनंदी दिसलोच तर
आनंद दुप्पट करणारा

झालेच कधी भांडण तर
त्याने आपल्याला समजुन घ्यावं
एक तरी मित्र असावा ज्याला
BEST FRIEND FOREVER
म्हणता यावं

ATTITUDE, EGO यांना
नसेल या मैत्रीत स्थान,
एकतरी मित्र असावा
जो करेल या मैत्रीचा सन्मान

एक तरी मित्र असावा
आपल्या मनातील भाव जाणणारा
एक तरी मित्र असावा
संकटकाळी आधार देणारा

- ऋतुजा दिपक
मगर, कन्नड

## मित्र

जीवनाच सार मित्र।
जगण्याचा आधार मित्र॥
आनंदाच्या रहस्याच।
आहे उत्तर मित्र॥1॥
तो नसतो चुकीचा कधी।
असतो बरोबर मित्र॥
रक्ताच्या नात्यांपेक्षाही।
असतो दिलदार मित्र॥2॥
संकटात गद्दार आपले।
पाठीशी असतो मित्र॥
अडचणीच्या वेळी ही।
सोबत दिसतो मित्र॥3॥
असता हात खांद्यावर।
दुःखाचा काळ मित्र॥
सुखाला हर्ष जोडणारी।
सुंदर नाळ मित्र॥4॥
गंध सुगंध पुष्पफुलांचा।
असतो बहार मित्र॥
कधी तळपती दुधारी।
असतो तलवार मित्र॥5॥
वणव्यामध्ये तो गारवा।
सावली समरात मित्र॥
स्वतः जळून तेवणारी।
संघर्षवात मित्र॥6॥
भिऊ नको मी आहे।
असं बोलणारा खास मित्र॥
जीवाला जीव देणारा।
शेवटचा श्वास मित्र॥7॥

कविराज:मनिष आहिरे
सटाणा नाशिक 7588069679

## शब्दप्रभू आमुचा काळाआड गेला

कसा दिन काळा आज
उगवला शब्दप्रभू आमुचा
काळाआड गेला
शेती मातीचा निष्ठावान
सेवेकरी असा अनंतात महान
कवी विलिन झाला
निसर्ग काव्याचे होते तुम्ही
बादशहा श्रावणातच जशी
खुलती डोंगराई
महानोर यांच्या शब्दात
सदैव खुले चालती बोलती
डोंगरात वनराई
कधी जसे नभ उतरे शब्दातून
काव्य अजरामर झाले पळस
खेड्यातून कधी बांधल्या तुम्ही
गाठी दुःखाच्या व्यथा मांडल्या
काव्यातूनी दुःखितांच्या
सौंदर्य धरणीचे फुलविले
काव्यातून पाना फुलाचे रूप
वर्णविल शब्दातून
केलीस अजरामर रान कविता
तुमचा आवाज घुमला
विधान परिषदेतून
वंदन तुम्हास कविवरा
साश्रू नयनांतून
न संपणार दान दिलं मराठी
साहित्यात तुम्ही
युगानुयुगे दरवळत राहील सुगंध
त्याचा दादा तुम्हाला अखेरचा
सलाम या कवीचा

- संदिप नानासाहेब वाकडे
रा.खेडा ता.कन्नड
- 9766992776



## श्वास माझा फुलतो

श्वास माझा फुलतो
आणि दरवळतो
जेव्हा माझ्या प्रीतीच हास्य
तुझ्या गालावर खिळत

जीवनाची वाट माझ्या
तुझ्या येण्याने फुलली
खऱ्या आयुष्याची किंमत
मला तुझ्यामुळे कळली

माझी भक्ती तू
माझी शक्ती तू
माझ्या देहाची अर्ध अंग तू
तुझ्यामुळे माझ्या आयुष्याचा रंग
खुलतो

श्वास माझा फुलतो
आणि दरवळतो
जेव्हा माझ्या प्रीतीच हास्य
तुझ्या गालावर खिळत

लक्ष्मण वाल्डे-कन्नड
मो.नं-8888606068

## महापुर..

माह्या गावात आला असा भयंकर महापुर।
जिवन जगावं कसं जिवाले लागली आता हुरहुर॥
भांडेकुंडे कपडेलत्ते सारं वाहुन गेलं पुरात।
साऱ्यायच्या राज्या आता धडकी भरली उरात॥
घरचे घरं गुरंढोरं वाहुन गेले या प्रकोपात।
असा कसा रे निसर्गा तु केला आमचा घात॥
एकमेकांच्या साहायानं आमचे जिवं तरी वाचले।
आजही आमचे घरं आहेत गायनं साचले॥
शेतीच्या झाल्या नदया पाहुन रडते बळीराज्या।
पिकांच्या जागी खडकं आता पिकवा काया भाज्या॥
पुल गेले वाहुन सारे बंद झाले रस्ते।
जगने झाले कठीन मरने झाले सस्ते॥
खंबे पडले झाडं पडले डिप्या गेल्या वाहुन।
विजवितरणचे कर्मचारी दंग झाले हे चीत्र पाहुन॥
वाटे एकमहीना आता लाईन येतच नाही गावात।
म्हणुन दुकानदारांनी मेनबत्या विकल्या जास्त भावात
पन विजवितरणचे कर्मचारी लागले ना बावा कामाले।
चवदा घंट्यात लाईन त्यांनी आनुन देली आमाले॥
तालुक्यातले अनेक गावं पुराच्या कचाट्यात आले।
तिन घंट्यात होत्याचे न्होते जित्याचे पित्र झाले॥
संसार आला उघड्यावर झालो आम्ही बेचीराख|
दोस्ताच्या आईच्या दफनाची हाती लागली नाई राख॥
पाहणी केली सारी सारे झाले पंचनामे|
आमचे कर्मचारी जिवापाड करत आहेत कामे॥
शासनाले आमची मागणी करा मदत आम्हा भारी।
तुमच्या शिवाय खरं सांगा कोन आम्हा तारी॥
या महापुरान आम्ही आता झालो सारे वजा।
अशी कशी रे निसर्गा तुनं देली कोन्या जन्माची सजा॥
अनिल हेलोडे, जळगांव (जामोद)
मो.नं.9561677878



## किती खळखळाट

परवानाधारीजुगार
फिरत राहे मोकाट
हरणारा अत्यवस्थ
सहन करतो मुकाट

कंपन्या तेजी मध्ये
नफा लाटत अफाट
कुणीबोले जुगार न
खेळबुध्दीचा विराट

वेड लावले पिढीला
अंगप्रत्यंग थरथराट
कर लादला जोरात
तिजोरी भरे बेफाट

चला निमित्ते होईलं
सगळ्यांचाच रे थाट
भुके राहती हरलेले
जिंकताभरलेले ताट

नशीबावर चालेखेळ
बुध्दीचा खडखडाट
बंद कराया हिम्मत
उरात होई धडधडाट

-- हेमंत मुसरीफ पुणे.
9730306996

## रानकवी

एक रानकवी काल
काळाच्या पडद्या आड गेले
त्यांच्या जाण्याने मात्र
संपुर्ण राज्य पोरके झाले

एक प्रगतशील शेतकरी ते होते
त्यांच्या कविताही शेतीमातीसाठी
आजही त्यांनी लिहीलेली गाणी
आहेत संपूर्ण महाराष्ट्राच्या ओठी

त्यांच्या कवितेत होतं निसर्गप्रेम
शेतक-याचं जगणं नि त्याची
शेती
कधी कष्टकऱ्यांचे सुख - दुःख
तर कधी सामाजिक रितिभाती

त्यांच्या रानातील कविता नी
गाणी
आमच्या नेहमी ओठी असतील
रानकवी ना.धो.महानोर आमच्या
सदैव आठवणीत राहतील..!

जन्माला आलेली सगळीच
माणसं
एक दिवस काळाआड होतात
परंतु ना.धो.महानोरां सारखे
व्यक्ती
लोकांच्या मनात अजरा अमर
होतात..!

- ऋतुजा दिपक मगर, कन्नड

## ना. धो. महानोर

उठा- उठा ना.धों.तुम्ही...

झाली अबोल जणू गं,
कविता ही रानातली ...
क्षणभर थांबे आज,
सळसळ पानातली...

राना- रानात हिरवळ,
बहरली किर्ती दाट...
शब्दप्रभू तुम्ही ना.धों.,
शब्द पाहतात वाटं..

निसर्ग वेडा एक कवी,
कसा शांत आज झाला ?
उठा -उठा ना.धो. तुम्ही,
निसर्ग पहा बहरला...

घ्या हातात लेखणी,
लिहा छानसे ते गीत...
कसे विसावला तुम्ही,
तुमची निसर्गावर प्रीत...
तुमची निसर्गावर प्रीत...

सौ. शारदा श्रीकृष्ण वानखेडे-
चोपडे परभणी ९८२३०६६६०६

## माझी कविता

माझी कविता नसते मुळी,
गोड गुलाबी कविता
भोगलेल्या वेदनांचा ती,
दाविते जगाला आरसा
म्हणतात बोलावं माणसानं,
कुढु नये मनामधी
म्हणून घेतला कवीकुळाकडून,
मी कवितेचा वारसा.
स्वत:सुखाय लिहिणे कधी,
लेखणीला जमले नाही
लेक मी बळीराजाचा, काळ्या
भुईचा शेतकरी
वेदना मांडण्या
पोशिंद्याची,घेतली हाती लेखणी
भर उन्हात आली कविता,
भेटण्या तेव्हा शेतशिवारी.
नसते माझी कविता कधी, खेळ
फक्त शब्दांचा
जाहीरनामा मांडते ती, शोषित
साऱ्या बांधवांचा
रोज इथं धजते ती, प्रतिकार
करण्या अन्यायाचा
म्हणून आज ती झाली, आवाज
साऱ्या वंचितांचा.

ज्ञानेश्वर गायके कन्नड
मो.९४०३३८४८८९

## विनवणी तळीरामाची

।।किती सांगू राया।सोडा मदिरा वरची माया ।।
त्यात झाली संसाराची, धूळधाणी ।
थोडी तरी लाज धरा ध्यानी-मनी ।।धृ।।
सोडली हो नोकरी तुम्ही, गेले घर-दार।
व्यसनापायी झाले बरबाद, किती संसार ।।
भूमिहीन झाले बाई, अनेक जमीनदार।डावलून
शेतकरी।।भुलेले पाहून नोकरी ।
भंगले सारे स्वप्न झाली, अधूरी कहानी।।धृ।।
कसं सांगू जन-लोका, किती सासरी सोशीते।
जगाची रित ही, नाव बापाचं राखीते ।।
नशिबाच्या आरशात, दुःख न्याहळते ।
स्त्री वर्तुळाच जीवन ।।कसं घडविल चित्रकारांन ।
नशिबाची तार माझी, छेडली कोणी ।।धृ।।
विनविते सिंधू मी, तुम्हा तळीरामा।
जीवनाची व्याख्या, जरा समजून घ्याना ।।
बरा नव्हे राया, रोज सावळा धिंगाणा ।
लग्न आणि इलेक्शन ।।जणू व्यसनाचे प्रशिक्षण ।
कसा बेभान झाला, माझा कुंकवाचा धनी ।।धृ।।
जीवनभर दुःखाचा, मी वाचला जरी पाढा ।
परी मानते राया तुम्हा, सप्तजन्माचा गं जोडा ।।
होऊन सावित्री, आम्ही पुंजीतो या वडा।
खांद्याला लावून खांदा, निश्चय ध्येयाचा बांधा।
महिला भगिनींनो व्हावं, आता शूर दामिनी ।धृ ।।
कवी:- आप्पाराव रावणराव
भावले, गंगापूर (ज)

## मेलेली माणुसकी

मेलेली माणुसकी कधी जिवंत होईल..?
अन् कधी चांगले दिवस येतील
कोणी करतात कोणाचा अपमान
अन् बुध्दी ठेवतात दुसऱ्याकडे गहाण
मेलेल्या माणुसकीमुळे आता सत्य मिटले
अन् असत्याचा उदोउदो जोरात वाढले
गाडी धावते प्रसिद्धीच्या फलाटावर
अन् वाढला जिकडे, तिकडे पैशाचा भारी जोर
मेलेल्या माणुसकीमुळे अन्याय वाढले
सर्वसामान्य लोकांना चिखलात गाढले
अशी मेलेली माणुसकी कोणत्या कामाची..?
अन् कोण आहे कोणाचा शेवटपर्यंत साथी..?
ज्यांच्यापाशी चने आहेत त्याला दात नाही
दात त्याचे मजबूत तर चने नाही
अशी आहे गोरगरीबांची गाथा
किती..? आपटणार ते माथा
माणुसकी मेलेल्या या जगात
कोणी करतात कोणाचा विश्वासघात
एवढी माणुसकी मेली कोणत्या कामाची
माती करू नका या मानवी जीवनाची
सौ.संगीता संतोष ठलाल, मु.कुरखेडा जि.गडचिरोली, ७८२१८१६४८५

## चांदोबाच्या नगरीत

चांदोबाच्या नगरीत
फुलांची झाडे
सुगंधाने दरवळती
उंच उंच वाडे
चांदोबाच्या नगरीत
रात्रीची शाळा
विद्यार्थी म्हणून
चांदण्या होतात गोळा
चांदोबाच्या नगरीत
ढगांचा लपंडाव
जोराची हवा सुटलाच
होते त्यांची धावाधाव
चांदोबाच्या नगरीत
आकाश निळे निळे
ढगांच्या गर्जनेने
भित्रा ससा पळे

- रवींद्र व्ही. चालीकवार
मु.पो. ता. महागाव
जि.यवतमाळ
मो.9011559106

## मेळ

थेंब जलाचा जागीच दडला
मेळ बिघडला पाऊस अडला
पाण्यावाचून सुकली माती
दे रे मेघा पाऊस मोती
साद घालुनी थकल्या चोची
दुष्काळाने केली गोची
कशी तुझी रे निष्ठुर करणी ?
नक्षत्रांची नाही बोहनी
आशेवरतीच झूरणे, जगणे
नशिबा आले वरती बघणे
-भानुदास धोत्रे
परभणी
7972625086

## वयात येताना...

आधुनिक केसरी

नमस्कार! मी डॉ. विजय दहिफळे 'सुखी जीवनाचा मंत्र' या माझ्या पुस्तकावर आधारित साप्ताहिक सदरात तुम्हा सर्वांचं अगदी मनापासून स्वागत करतो. गेल्या अनेक दिवसांपासून आपण टीव्ही, सोशल मीडिया या माध्यमांमधून भेटत आहोतच, पण आता आपण दर रविवारी दैनिक आधुनिक केसरी मधून भेटत राहणार आहोत. माझ्या गेल्या २०-२५ वर्षांच्या कारकीर्दीमध्ये मला आलेले अनुभव, मला भेटलेली माणसं, वेगवेगळ्या रूपात समोर येणाऱ्या गंभीर लैंगिक समस्या या सर्व गोष्टींचा ऊहापोह मी या सदरातून करणार आहे.

मुलगा किंवा मुलगी जन्माला आली की आनंद होतो. आपण बर्फी, पेढे, जिलेबी वाटतो. हळू हळू ते गोंडस बाळ आई, बाबा, दादा, मामा म्हणायला शिकतं, बघता बघता ते बाळ नर्सरीमधून शाळेत आणि शाळेतून महाविद्यालयात कधी जाऊ लागतं समजतही नाही. आपण सर्व जण या अनुभवातून गेलेलो आहोत आपल्या सर्वांनाच याचे अनुभव आलेले आहेत.




वयात आल्यानंतर शरीरात होणारे बदल, कामभावना अशा अनेक गोष्टीची सुरुवात नैसर्गिकरीत्या शरीरात व्हायला लागते. या बदलामुळे अनेक वेळा मुले गोंधळून जातात. आपल्याला सुद्धा हे बदल कळत असतात पण ते मुला-मुलींना सांगायचे कसे? आलेले अनुभव, माहिती मुलांमुलींपर्यंत पोहोचवायची कशी या विचारानं आपली तारांबळ उडते.

हे जीवन आहे बालपण, यौवन, प्रौढत्व जीवनातले तीन महत्त्वाचे टप्पे आणि ते कोणालाही चुकले नाहीत, अगदी मानवरूप धारण करुन आलेल्या देवांनाही, त्यामुळे वयात आल्यानंतर होणारे जे प्रमुख असे शारीरिक, मानसिक व सामाजिक बदल आहेत त्याबद्दल आपण जाणून घेऊया.

आपण म्हणतो आपल्या मुलाला किंवा मुलीला, बाबांची किंवा आईची चप्पल यायला लागली की समजायचं मुले मोठी झाली. पण मित्रांनो, हो. एवढ्यावर थांबत नाही तर वयात आल्यानंतर जी चलबिचल सुरू होते त्याबद्दल पूर्ण माहिती असणे आवश्यक असते. वयात येणे आणि शिक्षणाची महत्त्वाची वर्षे म्हणजेच इयत्ता ८ वी ते १२ वी हा काळ एकदमच सुरू होतो. याच काळात मन लावून अभ्यास करणं, आपल्या ध्येयपूर्तीच्या दिशेने मार्गक्रमण करणं आणि यांसाठी एकाग्रता, मेहनत, अभ्यास या गोष्टी कराव्या लागतात. एकीकडे ही गोष्ट असते तर त्या वेळी दुसरीकडे शरीरात आमूलाग्र बदल घडत असतात. मुलांमध्ये होणारे बदल चेहऱ्यावर लव येणे, दाढी मिशा येणे, जांघेत व छातीवर केस येणे, चेहऱ्यावर मुरुम (पिंपल्स) येणे. काखेत घाम येणे. हे सगळे नैसर्गिक बदल होत असतात. पण अनेकदा या बदलांनी पहिल्यांदा मुलं घाबरून जातात आणि काही वेळा पालकही घाबरतात. याच काळात मुलांना स्वप्नदोष सुद्धा व्हायला लागतो. पहाटेच्या वेळी वेगवेगळी स्वप्ने पडून हा स्वप्नदोष होतो. पण मुलांनो घाबरू नका. हे वाढत्या वयाचे लक्षण आहे. याच काळात लिंगाचा आकार वाढणे, शुक्राणू तयार होणे आणि त्या शुक्राणूंचे पालनपोषण करण्यासाठी सिमेन अर्थात वीर्य तयार होणे. अंडाशयाचा आकार वाढणे या क्रिया होत असतात आणि हे सर्व टेस्टोस्टेरॉन नावाच्या हार्मोनची क्रिया आहे. याच काळात मुलाचा आवाजही घोगरा होत असतो. मुलामध्ये होणाऱ्या या शारीरिक बदलांप्रमाणे त्याच्यात मानसिक बदलही घडत असतात. तो जास्त वेळ एकटा राहण्याचा प्रयत्न करतो, सर्वांशी बोलत नाही. मिळून मिसळून राहणे कमी होते. बऱ्याच वेळा तो लॅपटॉप, कॉम्प्युटर किंवा व्हॉट्स अप वर चॅटिंग करत राहतो. या काळात कसोटी असते ती पालकांची, त्यांनी या काळात हे बदल पाहात असताना त्यावर राग किंवा मुलाचा द्वेष न करता जे बदल होत आहेत त्याबद्दल मुलांना माहिती करुन देणे आवश्यक आहे. त्यासाठी स्वतःचे अनुभव मुलांना सांगणे व त्यांची काळजी घेणे आवश्यक आहे. जे बदल मुलाच्या शरीरात झालेले आहेत त्याचा अर्थ हा खूप सकारात्मक पद्धतीने घेणे आवश्यक आहे. हे बदल त्याच्या शरीरात झाले याचा अर्थ असा आहे की जगाच्या दृष्टीने तो समंजस झाला. जगाबद्दलची उत्सुकता, कल्पकता तसेच विचार करण्याची व ते विचार मांडण्याची क्षमता त्याच्यामध्ये निर्माण झाली. अशा काळात मुलांसोबत मित्र बनून त्याच्याबरोबर उघडपणे बोलण्याची आवश्यकता असते. सेक्स या विषयाबद्दल या काळात मुलांमध्ये कमालीची उत्सुकता आणि कतुहल निर्माण झालेलं असतं. त्यामुळे याच काळात त्यांनी काय करावं आणि काय करू नये याबद्दलची माहिती देणे आवश्यक असतं. सध्याचा काळ हा तंत्रज्ञानाचा काळ आहे. सोशल नेटवर्किंगचा काळ आहे. सेक्स या विषयावर चांगली आणि उपयुक्त माहिती देण्याऐवजी सेक्स बीभत्सीकरण करणाऱ्या अनेक सोशल साईट्स उपलब्ध आहेत आणि नेमक्या याच साईट्स मुलांकडून पाहिल्या जातात. अशा वेळी मुलांना योग्य अशी समज द्यावी, न रागावता त्यांच्याशी संवाद साधावा म्हणजे मुलांच्या मनात पालकांविषयी एक प्रकारची आदरात्मक भीती निर्माण होते.



डॉ. विजय दहिफळे
युरोलॉजिस्ट,
अँड्रॉलॉजिस्ट अँड
सेक्सॉलॉजिस्ट
9822326248

याच काळात मुलांना हस्तमैथुन करण्याची नैसर्गिक इच्छा निर्माण होते. पण सहसा ही गोष्ट टाळणे आवश्यक असते. हस्तमैथुनाचे पुढे जाऊन वाईट परिणाम कामोत्तेजना आणि पर्यायानं लैंगिक जीवनावर होऊ शकतात. ही बाब मुलांच्या निदर्शनास आणून देणे महत्त्वाचे आहे. हस्तमैथुन क्रियेमध्ये हातांच्या रफ टचमुळे लिंगाला सूज येणे, हार्मोन्स बदलणे, शीघ्रपतन असे त्रास सुरू होतात. तर बऱ्याच जणांना कमजोरी देखील जाणवते आणि मग अशी मुलं लग्नाला सामोरे जाण्यासाठी घाबरू लागतात, त्यांच्या मनात निष्कारण भीती निर्माण होते.

मुलांनो, अति तेथे माती ही म्हण आयुष्यभर लक्षात ठेवा. याच बाबतीत असे नाही तर प्रत्येक बाबतीत ही म्हण लागू पडते. ही गोष्ट सांभाळून जर आपण नैसर्गिक बदलांना सामोरे गेलो तर त्याचा दुष्परिणाम टाळता येतो आणि आपल्याला त्याचा त्रासही होत नाही. शरीरात जेव्हा हे असे बदल होत असतात तेव्हा साहजिक आहे की लक्ष तिथे केंद्रित होणार पण आपलं लक्ष तिथे केंद्रित न करता ते दुसरीकडे आणि चांगल्या ठिकाणी वळवण्याची ताकद निर्माण केल्यास या बदलांचा सकारात्मक पातळीवर सामना करण्याची प्रेरणा तुम्हाला मिळू शकते. मग त्यासाठी काय कराल? सर्वप्रथम म्हणजे तुमच्या शालेय अभ्यासक्रमावर लक्ष केंद्रित करा, मैदानी, साहासी खेळ जे तुम्हाला आवडतात आणि ज्यातून संघभावना वाढीस लागते, मित्र, मैत्रिणी निर्माण होतात असे खेळ खेळा, चारित्र्यावर लिहिलेल्या पुरुष- स्त्रियांची आत्मचरित्रे वाचा, व्यायामाची वेळ निश्चित करून त्याचं वेळापत्रक तयार करा. उत्तम संगीत ऐका, पोहण्यासारखी कला आत्मसात करा, चांगल्या मांडणीचे, चांगले विषय हाताळलेले, उत्तम प्रतीचे सिनेमे पाहा म्हणजे यौवनाचा खराखुरा आनंद तुम्ही मिळवू शकाल.

# आ.फारुक शाह यांच्या हस्ते रस्ते कामाचा शुभारंभ

आधुनिक केसरी न्यूज



**धुळे :** महानगरपालिका क्षेत्रात सोयी सुविधांच्या विकास योजनेअंतर्गत प्रभाग क्रमांक दोन कल्याणी बंगला ते केंद्र विद्यालय डॉक्टर महेंद्र वाढे ते ते केंद्रीय विद्यालय पर्यंत रस्ता कामाचे उद्घाटन आमदार फारुक शहा साहेब यांच्या हस्ते करण्यात आले धुळे शहरातील सुमारे पंचवीस ते तीन वर्ष तीस वर्षापासून असलेल्या कॉलनी आणि झोपडपट्ट्यांमध्ये रस्ते नसल्यामुळे गटारी नसल्यामुळे धुळे शहर नागरिक मूलभूत सुविधांपासून वंचित राहत होते शहरातील नागरिकांना मूलभूत सुविधा पुरविण्यास महानगरपालिकेतील सत्ताधारी पक्ष हे कुचकामी ठरलेले आहेत धुळे शहरातील मोठ्या प्रमाणात होत असलेल्या विकास कामाला बघून शहरातील नागरिकांनी आमदार फारुकसान यांच्याकडे निवेदनाद्वारे आपल्या भागातील रस्ते गटारी पाण्याची सुविधा व अशा मूलभूत सुविधांसाठी फार अपेक्षेने आमदार फारुकसान यांच्याकडे निवेदनाद्वारे मागणी केली होती त्याला आमदार फारुक शहा यांनी धुळे शहरातील अनेक भागात रस्ते व गटारीसाठी व मूलभूत सुविधांसाठी करोडो रुपयांच्या निधी शासनाकडून प्राप्त करून घेतला आहे व आज सुमारे दोन कोटी रुपयांच्या रस्त्यांच्या शुभारंभ आमदार फारुक शहा यांच्या हस्ते होत आहे धुळे महानगरपालिकेचा भ्रष्टाचारी कारभाराला धुळेकर नागरिक कंटाळले असून सत्ताधारी महानगरपालिकेचे नगरसेवक व पदाधिकारी फक्त शहरातील नागरिकांच्या कररुपी पैशांवर डल्ला मारण्याच्या प्रयत्न करीत असून फक्त धुळे शहरातील आमदार फारुक शाह यांच्या प्रयत्नाने व निस्वार्थ लोक लोकांची सेवा करण्याच्या उद्देशाने आज अनेक भागात विकासात विकास कामांचे काम चालू असून धुळेकर नागरिक या कामापासून संतोष आहे महानगरपालिकेच्या पदाधिकाऱ्यांनी पाच वर्षापासून धुळेकरांना विकासापासून वंचित ठेवल्या आहे हे धुळेकर जनता जाणून असून त्यांना येता निवडणुकीत त्यांना घरची जागा दाखविल्याशिवाय राहणार नाही या उद्घाटनाच्या कार्यक्रमात परिसरातील प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते व त्यांनी आपल्या भावना व्यक्त करताना सांगितले की सुमारे 30 ते 40 वर्षापासून अनेक आमदार आले परंतु फारुकसान साहेब यांना आम्ही मागणी केली त्यांनी ताबडतोब मागणी मान्य करत या रस्त्यासाठी दोन कोटी रुपयांच्या निधी उपलब्ध करून दिला त्याबद्दल या भागातील नागरिकांनी आमदार फारुक शहा यांचे आभार मानले या कार्यक्रमाला नगरसेवक गनी डॉलर, डॉ. दीपश्री नाईक, डॉ.बापुराव नाईक, निजाम सय्यद, नजर पठाण, आसिफ शाह, प्यारेलाल पिंजारी, आर. व्ही. पाटील, डॉ.महेंद्र वाढे, अड.चंद्रा, रवींद्र भादाने, भाटू पवार, शिवाजी मोरे, रतीलाल शिंदे, विकास सूर्यवंशी, प्रदीप पवार, डी. टी.पाटील, राकेश खांडेकर, कैलास चव्हाण, राजेश चव्हाण, शिरसाठ सर, शर्मा काकाजी, विजय शिंदे, नरेश पाटील, योगेश शिरसाठ, देविसिंग जाधव, संतोष पाटील, देविदास माळी, एल.एन.गिरासे, बी.डी.राजपूत, सुभाष जाधव, नाना महाजन, धनराज विभांडिक, गणेश भामरे, रोहित सानप, इकबाल शाह, शहजाद मन्सूरी आदी उपस्थित होते.

# खांडी पिंपळगाव येथे कापूस उत्पादकता वाढ व मूल्य साखळी विकास योजनेअंतर्गत शेती शाळा आयोजित

आधुनिक केसरी न्यूज



**खुलताबाद :** दि.४ ऑगस्ट रोजी मौजे खांडी पिंपळगाव येथे राज्य पुरस्कृत कापूस उत्पादकता वाढ व मूल्य साखळी विकास योजनेअंतर्गत शेती शाळा आयोजित करण्यात आली असून यामध्ये गावातील शेतकरी बांधवांनी मोठ्या प्रमाणात सहभाग नोंदवून कृषी सेवक सचिन सरगर यांनी कापूस व फळबाग व इतर पिकाविषयी मार्गदर्शन करण्यात आले. तसेच पिक विमा विषयी माहिती देण्यात आली आणि पिक विमा भरत असताना येणाऱ्या अडचणींचे निराकरण करण्यात आले त्यासोबतच शेतकऱ्यांनी ही पिक पाहणी करावी अशी विनंती करण्यात आली. या शेती शाळेच्या निमित्ताने गावातील सर्व शेतकऱ्यांना PMKSY २.० प्रकल्पांतर्गत फळबाग लागवड व सामूहिक शेततळे योजनेचा लाभ घेण्याविषयी आग्रह करण्यात आला. कार्यक्रमाच्या शेवटी कापूस उत्पादकता वाढ प्रकल्पांतर्गत विविध निविष्ठांचे वाटप करण्यात आले. ही शेती शाळा तालुका कृषी अधिकारी ज्ञानेश्वर तारगे तसेच मंडळ कृषी अधिकारी काकासाहेब इंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आली. या शेती शाळेला कृषी पर्यवेक्षक प्रभाकर घायट कृषी सहाय्यक कृष्ण नागरे व कृषी सेवक सचिन सरगर आणि कापूस उत्पादकता वाढ प्रकल्पांतर्गत समाविष्ट सर्व शेतकरी बांधव उपस्थित होते.



# महसूल सप्ताहनिमित्त बाजार सावंगी विविध कार्यक्रम

आधुनिक केसरी न्यूज

**खुलताबाद :** महसूल प्रशासनाच्या वतीने महसूल सप्ताह निमित्त बाजार सावंगी येथील जिल्हा परिषद प्रशालेत शुक्रवारी (ता:४) सकाळी विविध लोकोपयोगी उपक्रमाची माहिती व अंमलबजावणी साठी महसूल दिन आयोजित करण्यात आला होता दरवर्षी आगस्टच्या पहिल्या आठवड्यात महसूल सप्ताहाचे आयोजन होत असते कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी सरपंच आप्पाराव नलावडे हे होते. या महसूल सप्ता हात सातबारा उतारा दुरुस्ती कर्ज बोजे नोंद घेणे शालेय विद्यार्थ्यांना शैक्षणिक कामासाठी प्रमाणपत्र नवीन आधार कार्ड बनवणे व अद्यावत करणे अनाथ मुलांना प्रमाणपत्र खरीप हंगामाच्या पिकांचा विमा नैसर्गिक आपत्ती व्यवस्थापन व जनजागृती अतिदुर्गम भागात महसूल अदालत घेणे मंडळ स्थळावर फेरफार अदालत घेणे सलोखा योजना प्रचार व प्रसिद्धी आजी-माजी सैनिकांचे विविध उपक्रम राबविणे महसूल अधिकारी व कर्मचारी यांचे सेवाविषयक बाबींची पूर्तता शेत रस्ते नैसर्गिक आपत्ती अनुदान शासकीय कार्यालयास जमीन प्रदान व फेरफार प्रलंबित काढणे वृक्ष लागवड स्वच्छता व सुशोभीकरण आदी बाबींचा समावेश असल्याने तालुका मंडळ निरीक्षक संजय परदेशी यांनी मौलिक विचार ऐकवून सखोल मार्गदर्शन केले. यावेळी दरेगाव येथील शोभाबाई गायकवाड यांना पतीच्या आत्महत्या प्रकरणी तीन लाख शासकीय निधी मंजूर झाल्याने त्यातील पहिला हप्ता त्याचा धनादेश मान्यवरांच्या हस्ते वाटप करण्यात आला. शालेय विद्यार्थ्यांना रहिवासी जातीचे व विविध प्रमाणपत्रांचे वाटप झाले आपापली ई-पिक पाहणी शंभर टक्के पूर्ण करावी असेही सांगितले. बाजार सावंगी महसूल मंडळांच्या सर्व सजांचे फेरफार निकाली काढण्यात आले कार्यक्रमास प्रशालेचे मुख्याध्यापक हरिभाऊ दहिफळे माजी सरपंच वसंतराव नलावडे उपसरपंच कारभारी नलावडे सदस्यपोपट काटकर कृषी सहाय्यक दीपक हिंगे तंटामुक्तीचे प्रकाश नलावडे पोलीस पाटील कारभारी नरवडे तलाठी नारायण पठ्ठे श्री साळुंखे उज्वला वाघमारे श्री सुरडकर श्रीधर पाटील सय्यद लाल हरिदास सराटे विजय जैस्वाल यांचे सह महा-ई-सेवा केंद्रांचे संचालक कृष्णा नलावडे सोपान नलावडे गणेश गायकवाड व शालेय विद्यार्थी शिक्षक उपस्थित होते.

आधुनिक केसरी

## लय भारी सुगरण



सौ. स्नेहा मुसरीफ, पुणे.
संपर्क क्र. 9503434424




**साहित्य :** 3 ते 4 मोठी भरीताची वांगी , अर्धी वाटी तांदूळाचे पीठ , 1 चमचा मैदा , 2 चमचे लाल तिखट ,1 चमचा धने जिरे पूड , मीठ , 1 चमचा ओवा ,पाव चमचा हिंग पावडर , चाट मसाला , ब्रेडक्रम्स् , तेल

**कृती :** प्रथम वांग्याची साल काढून देठाच्या खालील वांग्याचे सुरीने शक्य तितके पातळ कट मारून घ्यावे जेणे करून वर देठ असलेले सोनचाफ्याचे फूल दिसेल सर्व वांगी तयार झाली की मोठ्या भांड्यात भरपूर पाणी घालून त्यात व्यवस्थित मीठ घालावे व त्यात ती बुडवून त्यावर वजन ठेवावे. म्हणजे ती वर तरंगणार नाहीत.

दुसऱ्या पसरट भांड्यात तिखट,मीठ,धनेजीरे पूड, हिंग पावडर, तांदूळाचे पीठ, मैदा सर्व छान एकत्र करून त्यात पातळसर होईल इतके पाणी घालावे . साधारण 10..15 मिनिटांनी वांगी पाण्यातून बाहेर काढून मऊ कापडाने हलक्या हातानी पुसून कोरडी करून घ्यावीत. मिठाच्या पाण्यात ठेवल्यामुळे त्यांना छान कडकपणा येतो. नंतर ही वांगी पिठात छान बुडवून सर्व कापाना व्यवस्थित पीठ लागल्यावर ब्रेडक्रमसमध्ये घोळून डिशमधे ठेवावीत. कढई मध्ये तेल चांगले तापवून घेऊन त्यात एकेक करून मध्यम आचेवर खरपूस केशरी रंगावर कुरकुरीत तळून घ्यावीत. ही सुंदर फुले आकर्षक डिशमधे काढून वरुन चाट मसाला भुरभुरुन हिरवी चटणी व लाल टोमॅटो केचप बरोबर सर्व्ह करावीत. **वैशिष्ट्य :** ही आकर्षक व एकदम नावीन्यपुर्ण डिश पाहून खावीशी वाटेल. खमंग, क्रिस्पी व टेस्ट मे बेस्ट असल्यामुळे कधी संपली हे समजत सुद्धा नाही. वाचून तुम्ही नक्की करणारच, हो ना ? यासाठी वांगी जांभळी, काळी, हिरवी कोणतीही असली तरीही चालतात.

# तिरुपती येथील ओबीसी अधिवेशनात जास्तीत जास्त संख्येने सहभागी व्हावे : डॉ. अशोक जीवतोडे

आधुनिक केसरी न्यूज



**चंद्रपूर :** राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे ८ वे राष्ट्रीय अधिवेशन तिरुपती येथे ७ ऑगस्ट रोजी आयोजित करण्यात आले आहे. या अधिवेशनात ओबीसी समाजाशी संबंधित ४२ मागण्यांचे ठराव मांडून, चर्चा करून संमत केले जातील. या देशव्यापी ओबीसी अधिवेशनात जास्तीत जास्त संख्येने ओबीसी समाज बांधवांनी सहभागी व्हावे, असे आवाहन ओबीसी नेते डॉ. अशोक जीवतोडे यांनी केले आहे. दर वर्षी ७ ऑगस्टला राष्ट्रीय ओबीसी महासंघाच्या माध्यमातून देशभरातील विविध राज्यात ओबीसी समाजाचे राष्ट्रीय अधिवेशन होत असते, हे विशेष.

या अधिवेशनाला आंध्रप्रदेशचे मुख्यमंत्री जगनमोहन रेड्डी, राष्ट्रीय ओबीसी आयोगाचे अध्यक्ष माजी खासदार हंसराज अहिर, आंध्रप्रदेशचे उपमुख्यमंत्री नारायण स्वामी, ओबीसी कल्याण मंत्री सेलुबोयाना वेणुगोपाल कृष्णा, महिला व बालविकास मंत्री श्रीमती के. व्ही. उषाश्री, युवा क्रीडा व सांस्कृतिक मंत्री व्ही. श्रीनिवास गौड, गृहमंत्री रमेश जोगी, राज्यसभेचे खासदार बिडा मस्थान राव, एआयएमआयएम चे अध्यक्ष खासदार असुद्दिन औवेसी, जस्टिस व्ही. ईश्वरय्या, आमदार नाना पटोले, आमदार विजय वडेट्टीवार, राष्ट्रीय समाज पक्षाचे महादेव जाणकार, आमदार परिनय फूके, आमदार अभिजित वंजारी, आमदार सुधाकर अडबाले, आमदार जगन कृष्ण मुर्थी, माजी आमदार डॉ. अविनाश वारजुकर, आदी उपस्थित राहणार आहेत. राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ. बबनराव तायवाडे, महासचिव सचिन राजूरकर, राष्ट्रीय समन्वयक डॉ. अशोक जीवतोडे यांनी 'जो ओबीसी की बात करेगा, वही 'देश पे राज करेगा', असा नारा देत सर्वच राजकीय पक्षांनी ओबीसींच्या मुद्यांकडे वेळीच लक्ष देण्याची मागणीही त्यांनी केली. ओबीसी नेते डॉ. अशोक जीवतोडे म्हणाले की, राज्याच्या सर्व शाखांमध्ये अनुसूचित जाती, जमाती आणि ओबीसींना लोकसंख्येच्या योग्य प्रमाणात आरक्षण व प्रतिनिधीत्व देण्यासाठी जनगणना करावी, ४ मार्च २०२१च्या सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार रद्द करण्यात आलेले ओबीसींचे राजकीय आरक्षण पूर्ववत करण्यासाठी घटनेच्या कलमात सुधारणा करावी किंवा २७ टक्के लागू करावे, ओबीसींसाठी लोकसंख्येच्या प्रमाणात अर्थसंकल्पात तरतूद करावी आणि स्वतंत्र मंत्रालयाची स्थापना करावी, सर्व शासकीय व निमशासकीय संस्थांना जुनी पेन्शन योजना लागू करावी, सर्वोच्च न्यायालयाने घातलेली ५०% आरक्षणाची मर्यादा दूर करण्यासाठी घटनादुरुस्ती करावी, क्रिमिलेअरची मर्यादा १३ सप्टेंबर २०१७ पासून वाढलेली नाही, याबाबतची अट मागे घेईपर्यंत मर्यादा २० लाख रुपये करावी, ओबीसी विद्यार्थ्यांसाठी वसतिगृह आदी ४२ मागण्यांचे अधिवेशनात सर्वकष चर्चा करून ठराव घेतले जातील व ते केंद्र तथा राज्य सरकारला पाठवून पाठपुरावा करण्यात येईल, असे डॉ. अशोक जीवतोडे म्हणाले.

आजपर्यंतच्या विविध आंदोलने, अधिवेशन यांचे फलित म्हणजे आजवर ओबीसीच्या हिताचे ३४ शासन निर्णय निघाले असल्याचेही त्यांनी सांगितले. यावेळी राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे जिल्हाध्यक्ष नितीन कुकडे, डॉ. संजय बर्डे, संजय सपाटे, डॉ. आशीष महातळे, किशोर ठाकरे, रविकांत वरारकर, रवि देवाळकर, रवि जोगी, प्रशांत चहारे, ज्योत्स्ना राजूरकर, मंजुषा डूडुरे, सुनील मुसळे, संदीप माशिरकर, आदी उपस्थित होते.

# डॉक्टर्स असोसिएशनची कर्करोगाच्या रुग्णास उपचारासाठी मदत

आधुनिक केसरी न्यूज

**जिंतूर :** डॉक्टर्स असोसिएशन मधील सर्व डॉक्टर्स यांनी जिंतूर येथील रहिवासी शेख हसनैन शेख मुंतजीर या रक्ताचा कर्करोग असलेल्या नऊ वर्षाच्या मुलास पुढील उपचारासाठी नगद ४० हजार रुपयांची आर्थिक मदत करुन सामाजिक बांधिलकी जपत समाजाप्रती एक उत्तम संदेश दिला. शेख हसनैन हा अवघ्या ६ महीन्याचा असतानाच त्याचे मुंबई येथील वाडिया हॉस्पिटलमध्ये रक्ताचा कर्करोग म्हणून निदान झाले त्यावेळेस पासून आज त्याच्या ९ वर्षापर्यंत त्याला दर पंधरा दिवसाला नियमितपणे रक्त चढवुन घ्यावे लागते. परंतु आज त्याच्या आजाराची तीव्र अवस्था झालेली असून त्याला पुढील उपचार बोनमॅरो ट्रान्सप्लॉट करण्यासाठी श्री भगवान महावीर हॉस्पिटल , बंगलोर येथे जायचे असून त्यांना उपचारासाठी सर्व खर्च 14 लाख रुपये व इतर खर्च लागणार अवाक्या बाहेरचा खर्च व रुग्णाची जेमतेम आर्थिक परिस्थिती बघून जिंतूर डॉक्टर्स असोसिएशनचे अध्यक्ष डॉ शिवप्रसाद दत्तराव सानप व मार्गदर्शक यांनी सर्व डॉक्टर्स यांना आवाहन करून फुल न फुलाची पाकळी या माध्यमातून नगद रोख रक्कम ४० हजार रुपये तात्काळ जमा करून रुग्णास सुपूर्द केली .

हा कार्यक्रम काल धन्वंतरी चिकित्सालयात दु ४ वा. पार पडला यावेळी अध्यक्ष डॉ. शिवप्रसाद सानप व मार्गदर्शक डॉ विक्रम परीहार , डॉ दुर्गादास कान्हडकर , डॉ . पंडित दराडे , डॉ. देवराव क-हाळे , डॉ . संतोष घुगे , डॉ विजय बुधवंत, डॉ . अतुल जाधव , डॉ. इरफान आगाई पटेल, डॉ.बाळासाहेब घुगे, डॉ. परमेश्वर कांगणे , डॉ गजानन जाधव , डॉ जुनैद खान पठाण , पत्रकार सचिन रायपत्रिवार व शेख मुंतजीर उपस्थित होते . हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी डॉ. भारत लहाने, डॉ . निखिल गायकवाड , डॉ . ज्ञानेश्वर माघाडे , डॉ. परमेश्वर गोरे , डॉ योगेश तुरे , डॉ. शैलेश मंत्री, डॉ. संदीप काळेगोरे, डॉ भागवत सांगळे, डॉ. नारायण नागरे , डॉ अविनाश चवंडके , डॉ . नितिन घुगे , डॉ . जिशान पठाण , डॉ. धनंजय घुगे , डॉ सचिन जायभाये, डॉ जयंत हाके , डॉ . प्रविण थोरवे यांनी अथक परिश्रम घेतले.



# सरसकट पंचनामे करण्याची सेनेची मागणी

आधुनिक केसरी न्यूज

**भोकर :** खरीपिकाचे नुकसान झाले असून शासनाने नदीकाठच्या शेतीचे पंचनामे करण्याचे आदेश महसूल विभागाला दिले असल्याने त्याच परिसरात पंचनामे करण्यात येत आहेत. इतर ठिकाणी शेतीचे नुकसान झाले आहे.त्यामूळे सरसकट पंचनामे करून नुकसान भरपाई द्यावी अशी मागणी उद्धव बाळासाहेब ठाकरे शिवसेने तर्फे करण्यात आली आहे. तालुक्यात नुकत्याच झालेल्या अतिवृष्टीमुळे अनेक गावात पाणी शिरून घरासह शेतीचे नुकसान झाले आहे.शासन केवळ नदिलगत असलेल्या शेतीचे पंचनामे करीत आहेत. ईतर ठिकाणीहि झळ पोहोचली आहे त्यामुळे सरसगट नुकसान भरपाई द्यावी अशी मागणी केली जात आहे.तालूक्यात ठाकरे गटाकडून नुकसानग्रस्त भागाचा दौरा करण्यात येत असून याची सुरुवात पिंपळढव( ता. भोकर ) पासून करण्यात आली आहे. यावेळी अँड. परमेश्वर पांचाळ, सुभाष नाईक किनीकर, प्रदीप दौलतदार, साहेबराव पाटील भोंबे, रमेश महागावकर, पुंडलिक पाटील भोसले आदींनी सहभाग घेतला आहे. शेतीचे सर्वे तथा पंचनामे तलाठी नामदेव मुळेकर, ग्रामसेवक ज्ञानेश्वर कल्याणी यांनी केले आहे. विठ्ठल सिद्धमोड सरपंच प्रतिनिधी मारोतराव पाटील भोंबे, चेअरमन साहेबराव पाटील भोंबे, पोलीस पाटील शिलानंद गायकवाड, दत्ता गाणलावाड, विजय प्रेमुलवाड, साईनाथ कोटुरवाड, गोविंद गौड, रवी करेवाड, भैय्या जाधव, पुंडलिक भोसले, साईनाथ गादेपवाड, गणेश आरलवाड, संजय चिकटे, आनंद लोमटे, शिवाजी झंपलवाड, लक्ष्मण ईरलोड, लक्ष्मण पवार, दत्ता गानलावाड, गंगाधर तुरटीकर, लक्ष्मणदादा कोरडे यांनी शेतकऱ्यांना हेक्टरी ७५ हजार रुपये नूकसान भरपाई द्यावी अन्यथा तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला आहे.



# तर महावितरणच्या कार्यालयाला टाळे ठोकू

आधुनिक केसरी न्यूज



चंद्रपूर : महागाईने गांजलेल्या सर्वसामान्यांचा उरलासुरला खिसाही पुरता साफ करण्याच्या उद्देशाने राज्य शासनाने वीज दरवाढ व अतिरिक्त शुल्क लावल्याने जणू शॉकच सामान्य जनतेला देण्याचे ठरवले आहे काय? असा प्रश्न उपस्थित करत वीज बिलावर लावलेले अतिरिक्त शुल्क मागे घ्या अन्यथा चंद्रपुर वीज वितरण कार्यालयाला टाळे ठोकू असा गंभीर इशारा उलगुलान संघटनेचे अध्यक्ष राजू झोडे यांनी दिला आहे. इंधन समायोजन आकार व विविध कर वसुलीच्या नावाखाली परवानगी आणि त्यातही सर्वच वीज कंपन्यांनी दरवाढ करून सर्वसामान्य नागरिक, शेतमजूर, उद्योजक यांना दर महिन्याला २००-३०० रुपयांचा शॉक सरकारने



दिला आहे. एकीकडे देशात दिल्ली व पंजाब राज्यात नागरिकांना २०० ते ३०० युनिट वीज मोफत दिली जाते. तेच आपल्या महाराष्ट्रात का घडू शकत नाही? असा प्रश्न राजू झोडे यांनी उपस्थित केला आहे. वीज महामंडळावरील कर्जाचा डोंगर सामान्य माणसामुळे झालेला नाही. त्यास महामंडळाची यंत्रणाच जबाबदार आहे. जर विजेची चोरी व गळती कागदोपत्री घोडे न नाचवता नियंत्रणात आणली तर सहज नागरिकांनाही दिल्ली, पंजाबप्रमाणे दिलासा मिळू शकतो, पण सरकार तसे विचार करू शकत नसून सर्वसामान्य नागरिकांचा गळा घोटण्याचे काम सरकार करत आहे.त्यामुळं वीज बिलावर लावलेले अतिरिक्त शुल्क मागे घ्या, वीज बिल कमी करा अन्यथा महावितरणच्या कार्यालयाला टाळे ठोकू असा इशारा राजू झोडे यांनी दिला आहे.

# शिरपूरमध्ये गावठी बंदुकांसह संशयित ताब्यात

आधुनिक केसरी न्यूज

**धुळे:** शिरपूर येथे पुन्हा दोन गावठी बंदुका आणि जिवंत काडतुससह संशयिताला पोलिसांनी ताब्यात घेतले. संशयितांकडे गावठी बंदुका येतात कुठून, त्याचे मूळ शोधण्याची गरज व्यक्त होत आहे. राजेश बोरसे ( २४, रा. सरस्वती कॉलनी, सेंधवा,मध्यप्रदेश ) असे संशयिताचे नाव आहे. शिरपूर शहर पोलीस ठाण्याचे निरीक्षक ए. एस. आगरकर यांना संशयिताविषयी माहिती मिळाल्यानंतर त्यांनी शिरपूर बस स्थानक परिसरात सापळा लावला. बोरसे हा संशयितरित्या फिरताना दिसला. त्याची चौकशी केली असता त्याने समाधानकारक उत्तरे न दिल्याने पोलिसांचा संशय बळावला. त्यांनी त्याची तपासणी केली. त्याच्याकडे दोन गावठी बंदुका आणि एक जिवंत काडतूस आढळले. पोलिसांनी बंदुका, काडतूस आणि भ्रमणध्वनी असा ६६ हजाराचा मुद्देमाल जप्त केला. बोरसेने गावठी बंदुका विक्री करण्याच्या उद्देशाने आणले होते, अशी प्राथमिक माहिती त्याने पोलिसांना दिली. पोलिसांनी गुन्हा दाखल केला आहे.



# शिंदे गटात हजारो कार्यकर्त्यांचा पक्षप्रवेश

आधुनिक केसरी न्यूज

जिंतूर : येथे तीन ऑगस्ट गुरुवार रोजी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे गटाच्या शिवसेना संपर्क कार्यालयात जिंतूर तालुक्यातील हजारो कार्यकर्त्यांनी परभणी जिल्हा लोकसभा समन्वयक माजी आमदार हरिभाऊ लहाने काका यांच्या उपस्थितीत शिंदे गटाच्या शिवसेनेमध्ये प्रवेश केला. जिंतूर तालुक्यातील विरोधी पक्षातील हजारो कार्यकर्त्यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेब यांच्या विकास कामावर विश्वास ठेवून माजी आमदार हरिभाऊ लहाने काका यांच्या उपस्थितीत जिंतूर तालुक्यातील शिवसेना संपर्क कार्यालय येथे महिला तालुकाप्रमुख अक्षता राजेश चक्कर पाटील यांच्या पुढाकाराने व नेतृत्वावर विश्वास ठेवत शिवसेना पक्षात प्रवेश केला. यावेळी महिला तालुकाप्रमुख अक्षता राजेश चक्कर पाटील यांनी सर्वांचे अभिनंदन करत पक्षात प्रवेश करून घेत पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या व येणाऱ्या काळात अनेक नेते, कार्यकर्ते, पदाधिकारी मोठ्या संख्येने शिंदे गटाच्या शिवसेनेत पक्ष करणार असल्याचे सांगितले. या कार्यक्रमात ज्येष्ठ शिवसेना कार्यकर्ते किरणजी देशमुख, राजाभाऊ शिंदे, रुस्तुमराव कदम, युवा नेते गणपतराव जाधव, निलेश चव्हाण, जामखेड सरपंच बापूराव चौरे, आनंद चौरे, अशोक कदम, यादवराव थिटे, गजानन गाडेकर, अंकुश राठोड, कल्याणराव देशमुख, अशोक कांदे, दिगंबर आघाव आदी कार्यकर्ते उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन श्री दशरथ महाराज बुधवंत जामकर यांनी केले तर माजी आमदार हरिभाऊ लहाने यांनी पक्ष केलेल्या सर्व कार्यकर्त्यांचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.



# अण्णा भाऊ साठे जयंतीनिमित्त वृक्षारोपण व विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप

आधुनिक केसरी न्यूज

**घोडेगाव :** राजमाता वरिष्ठ महाविद्यालय येथे लोकशाहीर, साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या जयंतीनिमित्त व साई सेवा बहुविध प्रतिष्ठान संचलित घोडेगाव, अध्यक्ष तथा जिल्हा सरचिटणीस, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष साईनाथ पाटील जाधव साहेब यांच्या वाढदिवसानिमित्त शाळा व महाविद्यालयात वृक्षारोपण करण्यात आले व गरजू , होतकरू विद्यार्थ्यांना वही व पेनाचे शाळा व महाविद्यालयात वाटप करण्यात आले. 01/08/2023 रोजी राजमाता जिजाऊ वरीष्ठ महाविद्यालय , राजीव गांधी कनिष्ठ महाविद्यालय व सद्गुरू जनेश्वर माध्यमिक विद्यालय घोडेगाव येथे लोकशाहीर, साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या जयंती दिनानिमित्त व साई सेवा बहुविध प्रतिष्ठान संचलित घोडेगाव, अध्यक्ष तथा जिल्हा सरचिटणीस, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष श्री साईनाथ पाटील जाधव साहेब यांच्या वाढदिवसानिमित्त शाळा व महाविद्यालयात वृक्षारोपण करण्यात आले व गरजू , होतकरू विद्यार्थ्यांना वही व पेनाचे शाळा व महाविद्यालयात वाटप करण्यात आले यावेळी लोकशाहीर साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या जयंती दिनानिमित्त त्यांच्या प्रतिमेला पुष्पांजली वाहून अभिवादन करण्यात आले. नंतर गरजू, होतकरू विद्यार्थ्यांना शाळा व महाविद्यालयातर्फे वह्या व पेनाचे वाटप करण्यात आले. प्राचार्य डा.श्री घुगे सर यांनी आपले मनोगत व्यक्त केले. नंतर मुख्यध्यापक श्री खैरनार सर यांचे भाषण झाले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन श्री कासार सर यांनी केले. प्रशासकीय अधिकारी, प्राचार्य, मुख्यध्यापक , प्राध्यापक, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांकडून साईनाथ पाटील जाधव थोर महापुरुषांच्या प्रतिमा भेट देण्यात आल्या. कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने झाली. मान्यवरांच्या हस्ते महाविद्यालय परिसरात वृक्षारोपण करण्यात आले. यावेळी प्रशासकीय अधिकारी, प्रा. संदिप जाधव सर, प्राचार्य डा. डी.डी. घुगे सर, शाळेचे मुख्याध्यापक खैरनार सर, वाकळे सर , कासार सर, जिते सर , प्राध्यापिका ठाकूर मॅडम, प्रा.टी.एल. जाधव सर, प्रा.नलावडे सर, प्रा फुलारे सर, प्रा. अमोल जाधव सर, सोनवणे सर, श्रीखंडे मामा आणि राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी यांची उपस्थिती होते.

# खंडाळा येथे ग्रामसेवक युनियनच्या निवडी जाहीर

आधुनिक केसरी न्यूज

**लोणंद :** खंडाळा येथे महाराष्ट्र राज्य ग्रामसेवक युनियन ( डि एन ई १३६ ) या संघटनेची खंडाळा तालुका कार्यकारिणीत नूतन निवडी जाहीर करण्यात आलेल्या आहेत.तालुक्यातील कार्यकारिणीत रिक्त झालेल्या पदांवर बिनविरोध निवडी झाल्या असून युनियनच्या खंडाळा मानद अध्यक्षपदी विक्रम गायकवाड, सचिव पदी संतोष गाढवे, महिला उपाध्यक्ष पदी सीमा धायगुडे आदींच्या बिनविरोध निवडी करण्यात आलेल्या आहेत.

तसेच महिला सदस्य म्हणून इंदुमती पडळकर आणि पुरूष सदस्य म्हणून शांताराम जाधव यांची नियुक्ती केली आहे. या निवडीबद्दल गटविकास अधिकारी अनिल वाघमारे, सहाय्यक गटविकास अधिकारी प्रकाश बोंबले, विस्तार अधिकारी सनिल बोडरे व महादेव चौधरी आदींनी सर्वांचे अभिनंदन केले. महाराष्ट्र राज्य ग्रामसेवक युनियन ( डि एन ई १३६ ) या संघटनेचे खंडाळा तालुका अध्यक्ष दिपक सोनवणे यांच्या अध्यक्षतेखाली ह्या निवडी झालेल्या असून निवडणूक निरीक्षक म्हणून शिवाजी जाधव आणि रियाज मोमीन यांनी कामकाज पाहिले. निवडीवेळी राज्य संघटक बबन धायगुडे, विभागीय उपाध्यक्ष नंदकुमार यादव, तालुका सहसचिव सुनील कुदळे सर्व ग्रामसेवक, ग्रामसेविका उपस्थित होते.

हिवराळे क्लिनिक
ॲण्ड हर्बल हेल्थ केअर
9130174444
डॉ. के.बी. हिवराळे
आयुर्वेद जनरल फिजिशियन,
ॲक्युपंक्चर तज्ज्ञ
B.A.M.S., N.D.,C.M.S.& Ed(MUMBAI)
R.No.2366/12/2000
एमसीए/2022/10/बी/000839 बॉम्बे नर्सिंग होम
परवाना क्र.218, औरंगाबाद
उपलब्ध सुविधा
- जुनाट सांधे दुखी (गुडघे दुखी)
- आम वात उदर रोग
- दमा व ॲलर्जी (जुनाट)
- चिकन गुनिया
- मनोकयीईक आजार
- त्वचा व गुप्त रोग
- स्त्रीयांचे आजार
- स्थूलपणा, मूळव्याध
- वंध्यत्व, संतती प्राप्ती
- कॅन्सर सल्ला, मुतखडा
- वजन वाढविणे
- वजन कमी करणे
- केसांच्या सर्व तक्रारी
- लहान मुलांची
- स्मरणशक्ती वाढविणे

पंचकर्म सुविधा (मुख्यकार्य) 1) वमन, 2) विरेचन, 3) बस्ती, 4) नस्य, 5) रक्तमोक्षन
अजिंठा रोड, सारा कॉलनी, फुलंब्री, ता. फुलंब्री, जि. औरंगाबाद



# नातेवाईकांच्या आक्रमक पवित्र्यामुळे विहीर मालक, ठेकेदारावर गुन्हा

आधुनिक केसरी न्यूज



**इंदापूर :** म्हसोबावाडी, ता. इंदापूर येथील विहीरीचे रींग कोसळून झालेल्या दुर्घटनेनंतर त्यातील चार मजुरांच्या अपघाती मृत्यूला कारणीभूत असलेले विहीर मालक गिरीश विजय क्षीरसागर तसेच रींग चे काम करणारे कंत्राटदार विश्वास गायकवाड यांच्यावर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यात आला असल्याची माहिती भिगवण पोलिस स्टेशनचे सहायक पोलीस निरीक्षक दिलीप पवार यांनी दिली. या प्रकरणी विहीर मालक गिरीश क्षीरसागर याला अटक करण्यात आले आहे.

म्हसोबावाडी येथील विहिरीच्या रिंग बांधण्याचे काम सुरु असताना मातीचा ढिगारा ढासळून त्याखाली जावेद अकबर मुलानी, सोमनाथ लक्ष्मण गायकवाड, परशुराम बन्सीलाल चव्हाण, लक्ष्मण मारुती सावंत राहणार बेलवाडी ता इंदापूर हे चार मजूर गाडले गेले होते. हे सर्व मजूर सायंकाळी घरी उशिरापर्यंत पोहोचले नसल्याने कुटुंबीयांनी व नातेवाईकांनी त्यांना भ्रमणध्वनी वरून फोनकॉल केले परंतु त्यास प्रतिसाद न मिळाल्याने त्यांना शोधण्यासाठी काम करत असलेल्या विहीरी जवळ गेल्यावर अपघाताची माहिती मिळाली. मंगळवारी घडलेल्या या घटनेची माहिती नातेवाईकांना त्याच रात्री उशिरा मिळाली होती. भिगवण पोलीस ठाण्यात याची खबर मिळताच त्यांनी तातडीने सर्व प्रशासकीय यंत्रणाना माहिती देत मजुरांच्या शोध कार्याला सुरवात केली होती. अक्राळविक्राळ विहीर आणि गाडल्या गेलेल्या मजुरांना जिवंत काढण्यासाठी प्रशासन सर्व ते प्रयत्न करीत होते. पुणे येथून यासाठी NDRF पथकाला पाचारण करण्यात आले होते. सलग तीन ते चार दिवस अनेक प्रयत्न करूनही कामगारांना जिवंत काढणे प्रशासनाला शक्य झाले नाही आणि जवळपास ७० तास चाललेल्या बचाव आणि शोध पथकाच्या हाती यातील चारही मजुरांचे मृतदेह मिळून आले. यावेळी शवविच्छेदनासाठी नातेवाइकांनी मृतदेह ठेवलेल्या अँम्ब्यूलंस समोर लोटांगण घेत न्याय देण्याची मागणी केली.तसेच या अपघाताला कारणीभूत असलेल्या सदर विहीर मालक आणि कंत्राटदार यांना आपल्या ताब्यात देण्याची मागणी केली. तसेच अपघात घडलेल्या विहीरीच्या ठिकाणीच मृतांच्या नातेवाईकांना विहीर मालक व कंत्राटदार यांनी झालेल्या जिवीत हानीबावत त्यांच्या कुंटुबीयाना मदत जाहीर करावी अशी मागणी लावून धरली होती व तोपर्यंत मृतदेह हलवणार नसल्या बाबत नातेवाईक आक्रमक झाले होते . परंतु वेळीच पोलीस प्रशासन आणि महसूल प्रशासनाच्या वरीष्ठ अधिकाऱ्यांनी नातेवाईकांची व ग्रामस्थांची समजूत काढून या संदर्भातील किचकट बाबी व कायदेशीर प्रक्रिया समजावून सांगितले व या प्रकारणी दोषींवर कठोर कारवाई करण्याची व शासनातर्फे विविध योजनांमार्फत योग्य ती मदत करण्याची ग्वाही दिली.याच संदर्भात भिगवण पोलिसांनी विहीर मालक गिरीश क्षीरसागर आणि रिंगचे कंत्राट घेणाऱ्या विश्वास गायकवाड विरोधात याठिकाणी काम करताना मजुरांच्या जीवाला धोका होवू शकतो याची कल्पना असताना आणि कोणत्याही प्रकारची सुरक्षेच्या बाबींचा उपयोग न केल्यामुळे मजुरांच्या मृत्यूस कारणीभूत ठरल्यामुळे सदोष मनुष्यवधाचा गुन्हा नोंद केला आहे. तर क्षीरसागर याला तातडीने अटक करण्याची प्रकिया पूर्ण केली आहे.

# खरात यांनी महाविद्यालयास दिली ७५ ग्रंथांची भेट

आधुनिक केसरी न्यूज

**जाफराबाद :** येथील सिद्धार्थ महाविद्यालयात सिल्लोड शिक्षण संस्थेचे संस्थेचे संस्थापक, अध्यक्ष मा.दादासाहेब म्हस्के व संस्थेचे सन्मानिय सचिव डॉ.राहुल भाऊ म्हस्के यांच्या प्रमुख उपस्थितीत महाविद्यालयाचे नव नियूक्त प्राचार्य पदी रुजू झालेल्या डॉ.र.तु.देशमुख यांचा तसेच महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी पत्रकार श्री. विजय खरात यांनी ७५ ग्रंथाचे महाविद्यालयाच्या ग्रंथालयास भेट दिले त्यानिमित्ताने विजय खरात यांचा सहपत्नीक सत्कार मा.दादासाहेब म्हस्के, सचिव डॉ.राहुल भाऊ म्हस्के यांच्यासह मान्यवरांच्या शुभहस्ते सत्कार करण्यात आला.

या प्रसंगी संस्थेचे सचिव मा.राहुलभाऊ म्हस्के यांनी शिक्षण प्रक्रियेत प्राध्यापक, प्राचार्य यांची भूमिका विशद करून शिक्षण क्षेत्रातील नव्या आव्हानांना सामोरे जावेच लागेल त्यासाठी आपण सज्ज असले पाहिजे असे आवाहन केले.

तसेच विजय खरात यांनी ग्रंथ रूपी पुस्तके भेट देताना मनोगत व्यक्त करतांना सांगितले की मी माझी पत्नी दोन मुली व एक मुलगा आम्ही सर्व न्यू हायस्कूल ते सिध्दार्थ महाविद्यालयाचे आजी-माजी विद्यार्थी असून विद्यार्थ्यांमध्ये वैचारिक, सामाजिक, आर्थिक, सांस्कृतिक प्रगल्भता निर्माण व्हावी या उदात्त हेतूने देशात आप-आपल्या कार्यकाळात वैचारिक सामाजिक आर्थिक सांस्कृतिक क्रांती घडवून आणलेल्या थोर महापुरुषांच्या जीवन गाथा, विचारधारा प्रगट करणारी ७५ ग्रंथ महाविद्यालयास भेट देऊन उत्तरदायित्व निभावल्या चे म्हटले आहे.

या कार्यक्रमांचे सत्कारमूर्ती व महाविद्यालयाचे नवनिर्वाचित प्राचार्य, डॉ.र.तु. देशमुख यांनी महाविद्यालयात रुजु झाल्या पासून ते प्राचार्य पदी निवड होई पर्यंतचा इतिहास मांडला.

या कार्यक्रमाचे औचित्य साधुन आमच्या महाविद्यालयाचे माजी विद्यार्थी पत्रकार श्री. विजय खरात यांनी महाविद्यालयास ७५ ग्रंथाचे महाविद्यालयाच्या ग्रंथालयास दान दिले. या श्रेष्ठ दान बद्दल संस्थापक, अध्यक्ष मा.दादासाहेब म्हस्के, संस्थेचे सचिव, प्रा.डॉ. राहुलभाऊ म्हस्के, प्राचार्य, डॉ.र.तु.देशमुख यांनी पत्रकार विजय खरात यांचा यथोचित सत्कार करून गौरव केला.

कार्यक्रमाचे अध्यक्ष सिल्लोड शिक्षण संस्थेचे संस्थापक अध्यक्ष मा.दादासाहेब म्हस्के यांनी आपल्या अध्यक्षीय समारोपात महाविद्यालयाच्या सुरवातीपासून ते आज पर्यंतच्या विकासाचा आलेख सर्वांसमोर मांडला.आणि सिध्दार्थ महाविद्यालयाच्या जडणघडणीत समाजघटकातील सर्व स्तरातील समाजबांधवांना अपेक्षित असलेले नाविन्यपूर्ण नवं तत्रंज्ञान्ययुक्त जागतिक स्पर्धात्मक युगात पुढे जाण्यासाठी लाभदायी ठरेल अशा विविध अंगांनी परिपुर्ण बौध्दीक क्षमता निर्माण व्हावी उद्दातहेतून महाविद्यालयाची घोडदौड सुरू आहे आणि विद्यार्जनाच्या माध्यमातून अशी च सूरू अशी शाश्वती आपल्या अध्यक्षीय भाषणात दादासाहेब म्हस्के यांनी दिली.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ.शाम सर्जे यांनी केले.

याप्रसंगी डॉ.पी.वाय.गडकरी, चद्रकांत चौतमल, प्रविण कुमार काकडे यांनीही मनोगत व्यक्त केले. या कार्यक्रमास डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद येथील माजी सहायक अभियंता डिगंबर बापु जगदाळे व डी.बी.रामदीन. माजी पंचायत समिती सभापती चंद्रकांत चौतमोल, संपादक विजय खरात, पत्रकार प्रशांत डोंगरदिवे, सामाजिक कार्यकर्ते दादाराव गडकरी, हेमचंद्र चिंधोटे, अशोक फुलमाळी याचीही उपस्थिती होती. या कार्यक्रमाचे सुत्रूसंचलन प्रा.संदिप पाटील यांनी केले. तर आभार प्राध्यापिका सौ.सुनंदा सोनुने यांनी मानले.




# डॉ. दिनेश परदेशी यांच्या सन्मानार्थ शुभेच्छा कार्यक्रम



आधुनिक केसरी न्यूज

**वैजापूर :** माजी नगराध्यक्ष तथाऔरंगाबाद मध्यवर्ती सहकारी बँकेचे संचालक व सर्व धर्म समभावाचे प्रतीक म्हणून शहरातील सर्व जाती, धर्म, पंथ व समुदायाला आपलेसे करणारे डॉ. दिनेश परदेशी हे जीवघेण्या अपघातातून बचावले व तंदुरुस्त होऊन पुन्हा सामाजिक, धार्मिक कार्य अत्यंत जीवे भावे त्यांनी आरंभ केले. या प्रित्यर्थ शुक्रवारी येथील मिल्लतनगर व शमीम सौदागर यांच्या वतीने व सौदागर कुटुंबीय यांच्या वतीने ते एका मोठ्या दुर्घटनेतून सहीसलामत तंदुरुस्त होऊन पुन्हा कार्यरत झाल्या बद्धल सौदागर परिवाराने अत्यंत कौटुंबिक दृष्टीकोन समोर ठेऊन त्यांचा सत्कार व सन्मान केला. या प्रसंगी मुस्लिम समाजाचे मिल्लतनगर वासी उपस्थित होते. अध्यक्षस्थानी माजी उपनगराध्यक्ष साबेरखान, अक्ककुव्वा, चे, मौ, महमद अली, हाफिज सलींम, नबी पटेल, नाजींम साहब, हाजी इम्रान कुरेशी, अकिल शेख, आमिर अली, सलीम वैजापूरी, यांची प्रमुख उपस्थिती होती.

प्रास्ताविक शमीम सौदागर यांनी केले व सूत्र संचलन ठाकूर धोंडीरामसिंह राजपूत यांनी केले. या प्रसंगी उपस्थित सर्वांनी डॉ. दिनेश परदेशी यांचा सत्कार करून त्यांना आरोग्यदायी जीवन लाभो अशी देवाकडे प्रार्थना केली. शेवटी शमीम सौदागर यांनी आभार मानले. या प्रसंगी सिकंदर सौदागर, अस्लम सौदागर, फेरोज सौदागर, हाफिज नबील यांच्या सह सौदागर समाजातिल नागरिक उपस्थित होते.

# षौष्टिक तृणधान्य पंधरवड्यानिमित्त कृषि विभागामार्फत मार्गदर्शन




आधुनिक केसरी न्यूज

**सोयगाव :** तालुक्यातील सोयगाव येथे तालुका कृषी अधिकारी मदन सिसोदिया, मंडळ कृषी अधिकारी रमेश गुंडीले यांच्या मार्गदर्शनाखाली आंतरराष्ट्रीय पौष्टिक तृणधान्य वर्ष अंतर्गत तालुक्यात गावागावात 1 ऑगस्ट ते 14 ऑगस्ट पर्यंत विद्यार्थी पौष्टिक आहार व राजगिरा पीक जागरूकता मोहीम राबवण्यात येत आहे त्याचेच औचित्य साधून सोयगाव येथील जिल्हा परिषद शाळेत विद्यार्थ्यांना पौष्टिक तृणधान्याचे आहारातील महत्त्व व तृणधान्य ही काळाची गरज ओळखून तृणधान्य पिकांचा पेरा वाढवण्यासंदर्भात कृषि सहाय्यक मयुर पाटील यांनी सविस्तर असे मार्गदर्शन करून विद्यार्थ्यांना तृणधान्य आहारात वापर व जनजागृतीसाठी शपथ दिली. तसेच राजगिरा पिकाचे महत्त्व व उत्पादित झालेल्या राजगिरा पिकाचे सूक्ष्म अन्नप्रक्रिया उद्योगातून होणारा फायदा याविषयी तालुका तंत्रज्ञान व्यवस्थापक अमोल महाजन यांनी मार्गदर्शन केले कार्यक्रमास गावाचे सरपंच, शाळेचे मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# एसएनडीटी महिला विद्यापीठासाठी 50 एकर जमीन प्रदान

## पालकमंत्री मुनगंटीवार यांनी मानले महसूलमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांचे आभार

आधुनिक केसरी न्यूज

**चंद्रपूर :** श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठासाठी (एस.एन.डी.टी.) 50 एकर जमीन उपलब्ध करून देण्यात आली आहे. यासंदर्भातील शासन निर्णय शुक्रवारी जारी करण्यात आला. विशेष म्हणजे शासन निर्णयाची प्रत महसूलमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनीच राज्याचे वने व सांस्कृतिक कार्य मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्याकडे स्वतः सुपूर्द केली. एस.एन.डी.टी. विद्यापीठासाठी जमीन उपलब्ध करून दिल्याबद्दल पालकमंत्री मुनगंटीवार यांनी महसूल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांचे आभार मानले आहेत.

मौजा विसापूर, ता. बल्लारपूर येथील सर्वे क्रमांक 466 मधील महापारेषण कंपनीच्या ताब्यातील भुसंपादीत जमिनीपैकी 50 एकर भुसंपादीत जमीन एस.एन.डी.टी. विद्यापीठाला प्रदान करण्यात आली आहे. एस.एन.डी.टी. विद्यापीठासाठी जमीन उपलब्ध व्हावी,



यासाठी पालकमंत्री श्री.सुधीर मुनगंटीवार यांनी शासनाकडे सातत्याने पाठपुरावा केला होता. अखेर त्यांच्या पाठपुराव्याला यश आले असून 50 एकर जमीन उपलब्ध करून देण्यात आली आहे.

नेताजी सुभाषचंद्र बोस डिजीटल मुलींची शाळा, बल्लारपूर येथे श्रीमती नाथीबाई दामोदर ठाकरसी महिला विद्यापीठ, मुंबई यांच्या माध्यमातून महर्षी कर्वे महिला सक्षमीकरण ज्ञानसंकुलाचे लोकार्पण 10 जून 2023 रोजी पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या हस्ते करण्यात आले होते. 107 वर्षांपूर्वी म्हणजेच सन 1916 मध्ये एस.एन.डी.टी. विद्यापीठाची स्थापना झाली. महर्षी कर्वे यांनी घरोघरी जाऊन दरमहा एक रुपया गोळा करून विद्यापीठाला सक्षम केले. पहिले कॅम्पस पुणे येथे सुरू झाले. त्यानंतर मुंबई, श्रीवर्धन व चंद्रपूरमध्ये ज्ञानसंकुल सुरू करण्यात आले आहे.

या विद्यापीठाच्या माध्यमातून महिलांना कौशल्यपूर्ण शिक्षण मिळण्यासाठी तसेच महिलांचे ख-या अर्थाने सक्षमीकरण करण्यासाठी पालकमंत्री श्री. मुनगंटीवार आग्रही होते. 64 प्रकारचे कौशल्यपूर्ण अभ्यासक्रम या विद्यापीठाच्या माध्यमातून देण्यात येत असून विद्यापीठाच्या निर्मितीसाठी कुलगुरू डॉ. उज्वला चक्रदेव यांनी तसेच त्यांच्या टीमने सातत्याने चंद्रपूरमध्ये भेटी दिल्या.

बल्लारपूर-विसापूर मार्गावर 50 एकर जागेमध्ये 560 कोटी रुपये खर्च करून, राज्यातीलच नव्हे तर देशातील महिलांना गौरव वाटेल, असे अप्रतिम विद्यापीठ तयार करण्यात येत आहे. ज्यांनी महिलांचा सन्मान वाढविला त्या सर्वांच्या ज्ञानाचा दीपस्तंभ प्रतिकाच्या रूपामध्ये त्या संकुलात लावण्यात येणार आहे. तसेच थोर महिलांची मार्गदर्शक मूल्ये पुतळ्यासह लावण्याची व्यवस्था देखील करण्यात येणार आहे. महिलांच्या पारंपारिक खेळांसाठी वातानुकुलीत इनडोअर स्टेडियम येथे उभारण्यात येईल.

चंद्रपूर येथे प्रस्तावित एसएनडीटी विद्यापीठाच्या शैक्षणिक संकुल परिसरासाठी शासकीय जमीन उपलब्ध करून देण्याचा शासन निर्णय आज निर्गमित करण्यात आला. महसूल मंत्री श्री. राधाकृष्ण विखे पाटील यांनी स्वतः आज या शासन निर्णयाची प्रत ना.मुनगंटीवार यांना विधिमंडळातील कार्यालयात वितरित केली. या गतीमान निर्णयासाठी ना.राधाकृष्ण विखे पाटील यांचा मनःपूर्वक आभारी आहे, असे पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांनी म्हटले आहे.

# एकाच रात्रीत पकडले १३ आरोपी

आधुनिक केसरी न्यूज

**लोहा :** न्यायालयाने १३ आरोपी विरूद्ध काढलेले अजामीन पात्र वॉरंट एकाच रात्रीत माळाकोळी पोलिसांनी बजावले आहेत. एकाच रात्रीत १३ वॉरंट एकदाच बजावणाऱ्या माळाकोळी पोलिसांचे कौतुक होत आहे.

दि. २ ऑगस्ट ते ३ ऑगस्टच्या रात्री माळाकोळी पोलिसांनी एक विशेष मोहीम राबवली लोहा न्यायालयाने १३ आरोपी विरुद्ध अजमीन पात्र वॉरंट जारी केले होते म्हणजे ते आरोपी न्यायालयात हजर होत नव्हते,त्यानुसार माळाकोळी चे सहाय्यक पोलीस निरीक्षक संजय निरपत्रेवार, पोलीस उपनिरीक्षक मुंडे, आडे, पोलीस अंमलदार दिलीप केंद्रे, कापडे, ढेंबरे, क्षीरसागर, राठोड चिटलवाड, बोंबले, माने, शेळके आणि शेख आदींनी ही मोहीम राबवतांना १३ आरोपींना ताब्यात घेऊन न्यायालयात हजर केले.

पकडण्यात आलेल्या अजमीपत्र वॉरंटचे आरोपी पुढील प्रमाणे-आत्माराम मोतीराम शिंदे ,नामदेव आत्माराम शिंदे, रा. हिप्परगा ता. लोहा जि. नांदेड, हनुमंत साहेबराव पोले रा.कुरूळा, तालुका कंधार जि. नांदेड, विकास राम केंद्रे रा.उमरदरा ता. जळकोट जि. लातूर, बालाजी देवराव गुळवे , देवराव गणपती गुळवे, सुरज दादाराव पांढरे राहणार रिसनगाव ता. लोहा जि.नांदेड, रावसाहेब बापूराव धुळगंडे आशिष बापूराव धुळगंडे, बालाजी किशन दाभाडे राहणार माळेगाव ( यात्रा )ता. लोहा जि. नांदेड, बळीराम तातेराव डोईफोडे राहणार लिंबोटी ता. लोहा जि. नांदेड, राजू गोविंद चव्हाण रा.हिराबोरी तांडा ता.लोहा जिल्हा नांदेड, गोविंद किशन कदम राहणार सावरगाव ( न. ) ता. लोहा जि.नांदेड असे आहेत.

जिल्हा पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे,अप्पर पोलीस अधीक्षक अबिनाश कुमार,कंधार चे पोलीस उपअधीक्षक मारोती थोरात यांनी माळाकोळी पोलिसांचे एकाच रात्रीत १३ वॉरंट जारी असलेले आरोपी पकडण्यासाठी कौतुक केलेले आहे.

# आजी-माजी सैनिकांसाठी सदैव तत्पर राहील : बैसाणे

आधुनिक केसरी न्यूज

**कन्नड :** तालुक्यातील दुय्यम निबंधक कार्यालयामध्ये महसूल सप्ताह दिनानिमित्त सैनिक हो तुमच्यासाठी उपक्रमांतर्गत आजी-माजी सैनिकांसोबत चर्चा सत्र व गौरव सत्कार आयोजित करण्यात आला.

यावेळी युवराज बैसाणे, दुय्यम निबंधक अधिकारी कन्नड, रविराज सुपेकर, दुय्यम निबंधक अधिकारी खुलताबाद, संजय चव्हाण कनिष्ठ लिपीक दुय्यम निबंधक कार्यालय कन्नड तसेच संजय शिंदे, साईनाथ अल्हाड, प्रशांत बोडखे व शिवाजी महाविदयालय वाय सी एम चे संचालक योगीराज सोमवंशी , जिजामाता शिक्षण प्रसारक मंडळाचे सचिव सागर जाधव यांची प्रमुख उपस्थिती होती. या वेळी बैसाणे यांनी चर्चा सत्रात सांगितले की, महसूल विभागाची नाळ ही आज तळागाळातील जनतेशी थेट जुळलेली आहे. त्यामुळे महसूल व इतर विभागाने वर्षभर केलेल्या विविध लोकाभिमुख कामकाजाचा आढावा जनतेसमोर ठेवण्यासाठी दरवर्षी १ ऑगस्ट हा



महसूल दिन म्हणून राज्यभरात साजरा करण्यात येतो. यावर्षी मात्र महसूल सप्ताह आयोजित करून या अभियानाला व्यापक स्वरूप देण्याचा निर्णय विभागाने घेतला आहे. शासनाच्या विविध योजना संदर्भात विद्यार्थ्यांना शैक्षणिक कर्जात मुद्रांक शुल्क माफी, सलोखा योजने अंतर्गत मुद्रांक शुल्क माफी याबाबत माहिती दिली.

तसेच श्री. सुपेकर यांनी महिलांना निवासी सदनिका विकत घेताना मुद्रांक शुल्क माफी तसेच नोंदणी व मुद्रांक विभागाच्या विविध ऑनलाईन उपक्रमांबाबत माहिती दिली. तसेच या कार्यक्रमाला उपस्थित सैनिकांनी देशाकरीता केलेल्या गौरवास्पद कामगिरीबद्दल त्यांना शाल व श्रीफळ देऊन गौरवण्यात आले. तसेच आजी माजी सैनिकांच्या नोंदणी व मुद्रांक विभागाशी संलग्न असलेल्या कामासाठी आम्ही सदैव तत्पर आहोत अशी ग्वाही श्री.बैसाणे व श्री.सुपेकर यांनी दिली.

नोंदणी व मुद्रांक विभागाच्या विविध योजना, मुद्रांक शुल्क माफी, ऑनलाईन सुविधा याबाबत माहिती प्राप्त झाल्याने उपस्थित सैनिक बांधवांनी दुय्यम निबंधक अधिकाऱ्यांकडे समाधान व्यक्त केले. सदर चर्चासत्रास रामु राठोड, सुखदेव आरके, मधुकर नायक, काकासाहेब पवार, प्रकाश केवट, अरूण निकम, विजय वेताळ, अशोक वेताळ, रोहीदास पाटील, किसन सुरडकर, साहेबराव शिंदे, नारायण निळ इत्यादी आजी माजी सैनिक मोठया संख्येने उपस्थित होते .

# साहित्यरत्न अण्णा भाऊ साठे यांना जयंतीनिमित्त लोह्यात अभिवादन

आधुनिक केसरी न्यूज

**लोहा :** शहरातील गोरोबाकाका मंदीर परिसर जूना लोहा नवी आबादी या ठिकाणी लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या १०३ व्या जयंती निमित्त सामाजिक कार्यकर्ते शिवराज दाढेल लोहेकर यांच्या पुढाकारातून आयोजित कार्यक्रमात प्रथमतः अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेचे व सर्व महामानवांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करून अभिवादन करण्यात आले.प्रसंगी मान्यवरांचा पुष्पहार व लाल दस्ती घालून आयोजकांच्या वतीने सत्कार करण्यात आला.शालेय विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले.विशेषांकाचे मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. यावेळी लोकनियुक्त नगराध्यक्ष सूर्यवंशी,ज्येष्ठ नगरसेवक बबन निर्मले,नगरसेवक भास्कर पाटील पवार, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे तालुकाध्यक्ष रमेश माळी,यांनीही अण्णाभाऊ साठे यांच्या जीवन चरित्रावर प्रकाश झोत टाकला. प्रसंगी नगरसेवक संभाजी पाटील चव्हाण,जिवन पाटील चव्हाण,नगरसेवक अमोल व्यवहारे, नगरसेवक नबीसाब शेख, नगरसेवक केतन खिल्लारे, नगरसेवक नारायण यलरवाड, ख.वि. संघाचे संचालक तथा माजी सरपंच भिमराव पाटील शिंदे,किशनराव पाटील मुरकुटे, राष्ट्रवादी,युवक कांग्रेस तालुकाध्यक्ष शिवराज पाटील,लक्की फुलवरे,ज्ञानेश्वर भिसे,अमोल कांबळे,निलेश देशमानेसह समाज बांधव उपस्थित होते.

गुप्तरोगाबाबत
काहीही लपवू नका



(रविवारी मोफत तपासणी)



डॉ. शेख ए.एच.

या अशा अडचणी असतात ज्या कोणाला सांगता येत नाहीत व न सांगितल्याने त्या वाढत जातात पण काळजी करू नका डॉक्टरपासून काहीही लपवू नये, ते आपले सर्व प्रश्न सहज सोडवितात. डॉ. शेख आजपर्यंत 200 पेक्षा अधिक पुरस्काराने सन्मानित, प्रचंड अनुभवी व अत्यंत माफक खर्चात इलाज करतात, आजपर्यंत लाखों पेशंटनी याचा अनुभव घेतलाय, आपली माहिती अत्यंत गुप्त ठेवली जाते, आयुर्वेदाने सर्व रोग नष्ट होतात, (रविवारी मोफत तपासणी).
आपल्या सर्व चिंताचा एकमेव उपाय म्हणजे डॉ. शेख यांचे नवजीवन आयुर्वेदीक डीस्पेंसरी. आजच भेट द्या व खात्री करा.

नवजीवन आयुर्वेदिक डिस्पेन्सरी
सेंट्रल बसस्टँड समोर, हॉटेल मिर्झा जवळ, औरंगाबाद.
फोन : (0240) 2350042, मो. : 9021111549 www.drshaikhah.in

शहरातील विश्वसनीय बिग सुपर मार्केट
महावीर
घर संसार



किराणा | सुका मेवा | मसाले | क्रॉकरी
प्लास्टिकच्या वस्तू | स्टीलच्या वस्तू | ॲल्युमिनियमच्या वस्तू
घरगुती उपकरणे | साफ सफाईचे सर्व साहित्य | आणि बरेच काही

सुमित 7620111118 राजेश जैन 7588348738
रमेश जैन (क्रॉकरी) 9860481142 7620111117
व्हॉट्सअपवर ऑर्डरसाठी 9850017181
वितरण स्थितीसाठी 9021395308
घाऊक चौकशीसाठी 7620111118
www.mahavirbestprice.com sumitparakh73@gmail.com
S.P. रोड, चेलीपुरा, शहागंज, छत्रपती संभाजीनगर
प्लॉट क्रमांक A25, MIDC पोलिस स्टेशन समोर, चिकलठाणा, छत्रपती संभाजीनगर